सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, २१ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २३३ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



सांप्रदायिक आधारावर हिंदू संस्कृतीने कधीही विश्वाच्या मानवसमूहाला विश्वासी व अविश्वासी अशा दोन भागांत वाटले नाही. तिचा दृष्टिकोन नेहमी जोडण्याचा राहिला आहे. ज्याप्रकारे विभिन्न नद्या भिन्न भिन्न उगमापासून निघून पुढे प्रवाहित होत शेवटी समुद्राला मिळतात, त्याचप्रकारे भिन्न भिन्न आवडीनुसार वेगवेगळ्या वाकड्यातिकड्या किंवा सरळ मार्गाने जाणारे लोक शेवटी तुझ्याकडेच येत तुझ्यात मिसळतात.

**- स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# रस्त्यावर आंदोलन; संसदेत गदारोळ

## । कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनाला हिंसक वळण । दोन्ही सभागृहांचे कामकाज स्थगित



नीट परीक्षेतील कथित अनियमिततेमुळे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी तसेच सोनम वांगचुक यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी आयोजित निदर्शनांदरम्यान झालेल्या संघर्षानंतर रस्त्यावर विखुरलेले दगड आणि राडारोडा

**नवी दिल्ली, २० जुलै**

नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनाला सोमवारी हिंसक वळण लागले. आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून संसदेच्या दिशेने कूच करण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांनी जोरदार लाठीमार केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या सोडल्या. या चकमकीत अनेक आंदोलक जखमी झाले असून, पोलिसांनी जंतर-मंतर येथील आंदोलकांचे मंच आणि तंबू उखडून टाकत परिसर रिकामा केला आहे. दरम्यान, निदर्शकांशी झालेल्या संघर्षात ५० पेक्षा जास्त पोलिस जखमी झाल्याचा दावा दिल्ली पोलिसांनी केला आहे. दुसरीकडे संसदेच्या दोन्ही सभागृहांत राम मंदिर दान अपहार, नीट परीक्षा आणि आंदोलकांवरील गोळीबार या मुद्यांवरून विरोधकांनी गोंधळ घातला. परिणामी दोन्ही सभागृहांचे कामकाज स्थगित करावे लागले.

सोमवारी सकाळपासूनच जंतरमंतरवर हजारोंच्या संख्येने आंदोलक एकत्र आले होते. मोर्चाला परवानगी नाकारल्याने संसदेकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला होता. फिरोज शाह रोडवर आंदोलकांनी दिल्ली पोलिसांच्या जवानांवर दगडफेक केली. यादरम्यान आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. कॉक्रोच पार्टीच्या या आंदोलनामुळे मध्य दिल्लीतील अनेक भागांत प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. कनॉट प्लेसमध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जनपथ, संसद मार्ग आणि रायसीना रोडवर उशिरापर्यंत ३० ते ४० हजार आंदोलक होते. आंदोलकांनी जनपथवर जोरदार दगडफेक केली. येथे पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडत लाठीमार केला. आंदोलकांनी केलेल्या दगडफेकीत अनेक पोलिस आणि आंदोलक जखमी झाले आहेत. आंदोलक सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी करीत होते. (वृत्तसंस्था)

### दीपकेला ताब्यात घेतले नाही

अभिजित दीपकेला पोलिसांनी ताब्यातही घेतलेले नाही आणि अटकही केलेली नाही, असे कॉक्रोच पार्टीचा प्रवक्ता सौरव दासने स्पष्ट केले. यापूर्वी त्याने दिल्ली पोलिसांनी दीपकेला ताब्यात घेतल्याची माहिती दिली होती. निःशस्त्रांवर लाठीमार; 'कॉक्रोच'चा आरोप या संपूर्ण कारवाईवर कॉक्रोच पार्टीने तीव्र संताप व्यक्त केला आहे. पोलिसांनी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या निःशस्त्र कार्यकर्त्यांवर अमानुष लाठीमार केल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

## लोकसभेत गदारोळ

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अयोध्येच्या राममंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराचे लोकसभेत तीव्र पडसाद उमटले. यामुळे सभागृहाचे कामकाज आधी पाचवेळा स्थगित करण्यात आल्यानंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.




लोकसभेत सकाळी ११ वाजता कामकाज सुरू होताच काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. राममंदिरातील गैरव्यवहारावर चर्चा करावी, अशी या सदस्यांची मागणी होती. सदस्यांनी सभागृहाच्या परंपरेचे पालन करावे, असे आवाहन लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला करत होते. पण विरोधी सदस्य ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. तुम्हाला सभागृहाचे कामकाज चालू द्यायचे नाही, चर्चा करायची नाही, असे सांगत अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित केले. त्यानंतर १२.३० आणि १ वाजता पुन्हा गोंधळामुळे दिवसभरासाठी कामकाज स्थगित करावे लागले.

## राज्यसभेत खडगे आक्रमक



आज सकाळी ११ वाजता राज्यसभेच्या कामकाजाला प्रारंभ होताच काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा मुद्दा उपस्थित केला. पेपरफूट प्रकरण हे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित मुद्दा आहे. जंतरमंतरवर हजारो विद्यार्थी जमले आहेत, पण पोलिसांनी त्यांच्यावर लाठीहल्ला केला, विद्यार्थ्यांना मारण्याचा, त्यांचे आंदोलन दडपण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असा आरोप विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी केला. विरोधी पक्षांचे सदस्य या मुद्यावर अतिशय आक्रमक होते. गोंधळ सुरूच राहिल्याने राज्यसभेचे कामकाजही दिवसभरासाठी स्थगित केले.

## दहशतवादी कट उधळला; शस्त्रे जप्त

**बारामुल्ला, २० जुलै**

जम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील कांडी जंगल परिसरात सुरक्षा दलांनी एका संयुक्त कारवाईत दहशतवादाविरोधात मोठे यश मिळवले आहे. गुप्त माहितीच्या आधारे जंगलात लपवून ठेवलेली शस्त्रे, आयईडी आणि मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करण्यात आला असून शोधमोहीम सुरुच आहे. या कारवाईमुळे एक संभाव्य दहशतवादी कट वेळेपूर्वीच हाणून पाडण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही संयुक्त कारवाई भारतीय लष्कराची ५२ वी राष्ट्रीय रायफल्स, बारामुल्ला पोलिस, सीआरपीएफची ५३ वी बटालियन आणि एसएसबी यांनी संयुक्तपणे केली. दहशतवाद्यांनी कांडीच्या जंगलात शस्त्रे आणि स्फोटके लपवल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. शोधमोहिमेदरम्यान, सुरक्षा दलांनी जंगलातून दोन आयईडी, दोन पिस्तूल आणि ७.६२ मिमीच्या ५३० जिवंत गोळ्या जप्त केल्या. सर्व शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात पुन्हा घसरण

**मुंबई** : खाजगी क्षेत्रातील बँकांचे जून तिमाहीचे निकाल आणि मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक बाजारातून मिळालेल्या कमकुवत संकेतांचा भारतीय शेअर बाजारावर सोमवारी मोठा परिणाम पाहायला मिळाला. बँक शेअर्समधील तुफान विक्रीमुळे सोमवारी प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ९० डॉलरच्या पार गेल्याने गुंतवणूकदारांचा उत्साह मावळला, ज्यामुळे बाजाराच्या सुरुवातीलाच निफ्टी २४,२०० च्या पातळीखाली घसरला. मात्र, सत्राच्या दुसऱ्या भागात खरेदीचा ओघ वाढल्याने बाजाराने सुरुवातीचे मोठे नुकसान भरून काढण्यात यश मिळवले.

### चारधाम यात्रा भूस्खलनामुळे स्थगित

**देहराडून** : उत्तराखंडमध्ये, खवळलेल्या सरयू नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याने एक मूल बेपत्ता झाले आहे, तर वीज पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. सततच्या पावसामुळे झालेल्या भूस्खलनामुळे चार राष्ट्रीय महामार्गांसह सुमारे १५० रस्ते बंद झाले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने सोमवारी चार धाम यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. मार्ग सुरक्षित झाल्यावर ही यात्रा पुन्हा सुरू होईल.

# अभिजित दीपकेचे उपोषण मागे



कॉक्रोच जनता पार्टीच नेता अभिजित दीपकेने आपले अडीच दिवसांचे उपोषण सोमवारी मागे घेतले आहे. पर्यावरणवादी नेते सोनम वांगचुक यांना पोलिसांनी शनिवारी सकाळी जंतरमंतरवरून सफदरजंग रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्या जागेवर दीपके उपोषणाला बसले होते. उपोषणाच्या अडीच दिवसानंतर सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली वांगचुक यांच्या हस्ते सरबत पीत दीपके यांनी आपले उपोषण मागे घेतले.

### माझे उपोषण सुरूच राहणार : वांगचुक

नीट-यूजी परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने सरकारसोबत चर्चा केल्यानंतरही, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. आंदोलक विद्यार्थी नेत्यांना एकतर संसदेत जाऊन खासदारांची भेट घेण्याची परवानगी दिली जावी किंवा खासदारांनी स्वतः दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात येऊन त्यांची भेट घ्यावी, या मागण्या पूर्ण होईपर्यंत आपले आमरण उपोषण सुरूच राहील, अशी घोषणा वांगचूक यांनी केली आहे.

**संसदभवनात कडेकोट सुरक्षा**

काक्रोच जनता पार्टीचे समर्थक संसदभवनाला लागून असलेल्या रेलभवनजवळच्या चौकात पोहोचल्यानंतर प्रशासनाची तारांबळ उडाली. या चौकात आंदोलनकांना रोखण्यासाठी प्रचंड पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. संसदभवनात प्रवेश करणारे सर्व मार्ग कठडे लावून बंद करण्यात आले.

एवढेच नाही तर संसदभवनात प्रवेश करणारे तीनही प्रवेशद्वारेही बंद करण्यात आली.

## क्षेपणास्त्र हल्ल्यात चार भारतीय खलाशी ठार

**कीव्ह, २० जुलै**

युक्रेनमधील ओडेसा बंदराजवळ एका मालवाहू जहाजावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात चार भारतीय नागरिक ठार झाले तर एक जण गंभीर जखमी झाला. १९ जुलैला सायंकाळी एमव्ही गोल्डन लिओ नावाचे जहाज ओडेसा बंदर सोडत असताना हा हल्ला झाला. या घटनेमुळे काळ्या समुद्राच्या प्रदेशातील वाढता धोका आणि व्यापारी जहाजांच्या सुरक्षेबद्दल पुन्हा एकदा चिंता वाढली आहे. भारत सरकारने या हल्ल्याबद्दल तीव्र खेद व्यक्त केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, हल्ल्याच्या वेळी एमव्ही गोल्डन लिओवर पाच भारतीय नागरिकांसह एकूण १७ कर्मचारी होते. (वृत्तसंस्था)

# डोवाल यांना 'टिळक' पुरस्कार

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार वितरण

**पुणे, २० जुलै**

दहशतवादविरोधी कारवाया, गुप्त मोहिमा आणि देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (लोकमान्य टिळक स्वराज्य संघ) वतीने शनिवार, १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त मुकुंदनगर येथील कटारिया हायस्कूलच्या मैदानावर दुपारी १२ वाजता पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे.

ऑपरेशन सिंदूर, ऑपरेशन हॉट परसूट, बालाकोट हवाई हल्ला तसेच डोकलाममधील राजनैतिक वाटाघाटींसह देशाच्या सुरक्षेशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण घटनांमध्ये डोवाल यांनी निर्णायक भूमिका बजावली आहे. दहशतवादविरोधी कारवाया आणि गुप्त मोहिमांमधील त्यांच्या योगदानाबद्दल तसेच देशाला सामर्थ्यवान करण्याच्या राष्ट्रकार्यासाठी त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे डॉ. रोहित टिळक यांनी सांगितले.

१९८३ पासून प्रदान करण्यात येणाऱ्या या पुरस्काराचे पहिले मानकरी एस. एम. जोशी होते. आतापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी, अटलबिहारी वाजपेयी, सोनिया गांधी, डॉ. मनमोहन सिंह, प्रणव मुखर्जी, शरद पवार, नितीन गडकरी, नारायण मूर्ती, डॉ. के. सिवन, बाबा कल्याणी, डॉ. सायरस पूनावाला आणि सुधा मूर्ती यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

अजित डोवाल यांनी भारतीय पोलिस सेवा आणि गुप्तचर क्षेत्रात ३३ वर्षांहून अधिक काळ सेवा बजावली आहे. १९६८ मध्ये भारतीय पोलिस सेवेत दाखल झाल्यानंतर १९७२ मध्ये ते गुप्तचर विभागात रुजू झाले. मिझोराम, सिक्कीम, पंजाब आणि जम्मू-काश्मीर येथे त्यांनी महत्त्वाच्या क्षेत्रीय जबाबदाऱ्या सांभाळल्या. (तभा वृत्तसेवा)

## बोगद्यात भूस्खलन, १२ कामगार अडकले

**गंगटोक, २० जुलै**

सिक्कीमच्या नामची जिल्ह्यात सोमवारी भूस्खलनामुळे बांधकाम सुरू असलेल्या समरदुंग रस्ता बोगद्याचे प्रवेशद्वार बंद झाले. त्यामुळे सुमारे १२ कामगार आत अडकले. नैसर्गिक वायू गळती झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. वायू गळतीमुळे बचाव आणि मदत कार्यात अतिरिक्त सावधगिरी बाळगली जात आहे. घटनास्थळी प्रशासनासह अनेक एजन्सींची पथके तैनात केली असून युद्धपातळीवर बचाव कार्य सुरू आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, भूमिगत खडक आणि जमिनीच्या थरांमधील हालचालींमुळे नैसर्गिक वायू गळतीची शक्यता आहे. यामुळेच बोगद्यात प्रवेश करणे कठीण झाले आहे. बचाव कार्यादरम्यान, अनेक बचाव कर्मचाऱ्यांनी चक्कर येण्याची आणि बेशुद्ध होण्याची तक्रार केली. त्यामुळे बचावकार्य सावधगिरीने सुरू ठेवले. (वृत्तसंस्था)




न्यू यॉर्क येथे अतिशय चुरशीच्या फिफा विश्वचषक फुटबॉल अंतिम सामन्यात गतविजेत्या अर्जेंटिनावर १-० ने मात करून स्पेनने दुसऱ्यांदा विश्वचषकावर आपले नाव कोरले. विजयाचा आनंद साजरा करताना स्पेनचे फुटबॉलपटू

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

## अंतरंग

३ अमेरिकेने वाढवली हल्ल्यांची तीव्रता
४ प्रश्न, प्रतिमा आणि प्रतिभा (अग्रलेख)
६ मेस्सीचा गोल्डन बूटही गेला अन् बॉलही
८ चेसी क्रॅक बसेस प्रकरणी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय

# समृद्धीवर भीषण अपघात; सहा ठार

**पुलगाव, २० जुलै**

पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील समृद्धी महामार्गावर विरूळ शिवाराजवळ सोमवारी पहाटे ३.३०च्या सुमारास भीषण अपघात झाला. उभ्या असलेल्या कारला भरधाव ट्रकने मागून जोरदार धडक दिली. यात कारमधील चार आणि ट्रकमधील दोन अशा सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकला आग लागल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली होती.

समृद्धी महामार्गावरील मुंबई कॉरिडॉरमध्ये इथेनॉलने भरलेला ट्रक पलटी झाल्यामुळे त्या ठिकाणी वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यामुळे नागपूर कॉरिडॉरवरील वाहतूक थांबवून मुंबई कॉरिडॉरमधून वाहने सोडली जात होती. याच दरम्यान भरधाव ट्रकने समोर उभ्या असलेल्या कारला मागून जोरदार धडक दिली. अपघातात ट्रक चालक संजय कुमार, क्लिनर समरजित पाल तसेच कारमधील राजेश टिपले, पत्नी शुषमा, मुलगी जानवी आणि कार चालक अंकुश राऊत या सहा जणांचा मृत्यू झाला. धडक इतकी भीषण होती की, ट्रकला तत्काळ आग लागली. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. (तभा वृत्तसेवा)

# पुणे घाटमाथ्यावर दोन दिवस ऑरेंज अलर्ट

## शहरात हलक्या सरींमुळे वातावरणात गारवा

**पुणे, २० जुलै**

पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यावर मंगळवार, २१ जुलै आणि बुधवार, २२ जुलै या दोन दिवसांत जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता असल्याने हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. शहरात सोमवार, २० जुलै रोजी दिवसभर ढगाळ वातावरण राहिले. दुपारच्या सुमारास पावसाने हजेरी लावल्यानंतर अधूनमधून हलक्या सरी आल्या. त्यामुळे शहरातील वातावरणात गारवा निर्माण झाला असून, उकाड्यापासून पुणेकरांना काहीसा दिलासा मिळाला.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावरील आणि लगतच्या उत्तर किनारी आंध्र प्रदेशावरील चक्रीय स्थितीपासून ईशान्य अरबी



समुद्रापर्यंत समुद्रसपाटीपासून सुमारे ५.८ किलोमीटर उंचीवर द्रोणी निर्माण झाली आहे. ही द्रोणी महाराष्ट्र, मराठवाडा आणि दक्षिण गुजरातमधून जात असल्याने राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. गेल्या २४ तासांत कोकण-गोव्यात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. पुणे जिल्ह्यातील घाट भागात पावसाचा जोर तुलनेने अधिक राहिला. पुढील दोन दिवस घाटमाथ्यावर जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुणे शहरात सोमवार, २० जुलै रोजी कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. मंगळवारी किमान तापमानात किंचित वाढ होण्याची शक्यता असून, कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही. शहराचे कमाल तापमान ३० अंश, तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. शहरात पुढील दोन दिवस आकाश अंशतः ढगाळ राहून दुपारनंतर किंवा संध्याकाळी हलक्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. (तभा वृत्तसेवा)

### पुणे जिल्ह्यातील पावसाची नोंद (मिमिमध्ये)

**२० जुलै २०२६**
सकाळी ८.३० ते सायंकाळी ५.३०

| | | | |
|---|---|---|---|
| कुरवंडे | ४३.५ | राजगुरुनगर | १.५ |
| भोर | २०.५ | हवेली | १.५ |
| गिरिवन | १२.५ | शिरूर | १.० |
| माळीण | ४.० | बारामती | १.० |
| एनडीए | ४.० | दुधुळगाव | ०.५ |
| निमगिरी | ३.० | पाषाण | ०.४ |
| चिंचवड | २.५ | शिवाजीनगर | ०.४ |

# ‘संगीत संजे’ने अक्कलकोटकर मंत्रमुग्ध

## श्रोत्यांची प्रचंड गर्दी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जुले-**
अनेक कन्नड भावगत, भक्तीगीत व चित्रपट गीतांनी गायक राजेश कृष्णन यांच्या ‘संगीत संजे’ या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले. कार्यक्रमास श्रोत्यांनी प्रचंड गर्दी केलेली होती. अनेकांनी उभे राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. कर्नाटकचे गायक राजेश कृष्णन व निवेदिका प्रतिभा, गायक साक्षी, नदीर बानू, हर्षवर्धन आणि सहकारी बेंगळूर यांचा ‘संगीत संजे’ ह्या कन्नड कार्यक्रमाने दुसरे पुष्प झाले.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन म.नि.प्र. अभिनव बसवलिंगेश्वर महास्वामी विरक्त मठ (तुप्पीन मठ) नागणसूर, अंजली बाजारमठ, नगराध्यक्षा, मैंदर्गी नगरपरिषद, सुरेश नागूर, उपनगराध्यक्षा, मैंदर्गी नगरपरिषद, ऋतुराज उर्फ बंटी राठोड, उपनगराध्यक्ष, रश्मी हिप्परगी, सभापती पंचायत समिती, सागर कल्याणशेट्टी उपसभापती, पंचायत समिती, डॉ. विवेक करपे सोलापूर, सिद्धाराम पाटील, डॉ. अक्षय हणमशेट्टी सोलापूर, डॉ. बसवराज पाटील, मैंदर्गी, विकास बुळ्ळा, जि.प. सदस्य, मल्लिकार्जुन आळगी, मैंदर्गीचे नगरसेविका सपना मोरे, रोहिणी निंबाळ, शिवम्मा बमनळ्ळी, अप्पू पराणे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्रींची प्रतिमा, नटराज व लता मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

म.नि.प्र. अभिनव बसवलिंगेश्वर महास्वामी विरक्त मठ (तुप्पीन मठ) नागणसूर यांच्या हस्ते न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा सत्कार करण्यात आला. लोकप्रिय कन्नड भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते गायक राजेश कृष्णन व निवेदिका प्रतिभा, गायक साक्षी, नदीर बानू, हर्षवर्धन आणि सहकारी बेंगळूर यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार केला. पुरोहित सोमकांत कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन झाले.

तोळणूर येथील अंध गायक रेवणसिद्ध फुलारी यांनी कला सादर केली. याबरोबर सोलापूर येथील इम्पॅक्ट मोशन सोलापूर यांचे कलाकार श्रीनिवास कुणी, प्रसाद लिमये, ओंकार अलगडे, गौरव मोरे, गणेश निंबाळे, अजिंक्य सातपुते, विशाल कुलकर्णी, कौस्तुभ बारगळे यांनी गणपती वर्गणीचे सादरीकरण अस्सल सोलापुरी भाषेत केले. या कलाकारांचा देखील सत्कार न्यासाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, कोमल क्षीरसागर, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, व्यंकटेश पटवारी, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, अशोकराव उटगे, ओंकारेश्वर उटगे, मनोज निकम, अप्पी उंबराणीकर, किरण पाटील, प्रा.शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, प्रवीण देशमुख, शीतल फुटाणे, अतिश पवार, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, वैभव मोरे, अँड.संतोष खोबरे, अँड. फहीम पिरजादे, अनिल शिंदे, पिंटू शिंदे, गोविंद शिंदे, रोहित भोरे, रोहित खोबरे, अंकुश केत, अंकुश चौगुले, बाबू बाजारमठ, बाबू मसुती, राजू पवार, महेश दणके, सिद्धेश्वर मोरे, योगेश पवार, संजय मोरे, चंद्रकांत करजगी, सादिक बागवान, सत्तार शेख, अमोल पाटील, लक्ष्मण मचाले, मुरली चव्हाण, मारुती बोरकर, वासू कडबगांवकर, केदार तोडकर, मैनुद्दीन कोरबू, सर्फराज शेख, शिवराज स्वामी, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, श्रीशैल कुंभार, बाबा कारंडे, सोमशेखर जमशेट्टी, सोनू राचेट्टी, विद्याधर गुरव, प्रदीप सलबत्ते, विशाल गवळी, प्रा. प्रकाश सुरवसे, प्रा. मनोज जगताप, शरणप्पा फुलारी, सुरज धाये, महादेव वाले, वाहिदबाशा शेख, मल्लिनाथ पाटील, प्रशांत स्थावरमठ, संकेत पवार, राजू पवार, आनंदराव कुंभार, रवी पोळ, संभाजी पवार, लक्ष्मण शिंदे, अभिषेक चव्हाण, निखील शिंदे, रमेश हळसंगी, असद फुलारी, बाळासाहेब घाटगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, विशाल कलबुर्गी, बसवराज क्यार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी प्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केली.

### गुणीजन व विद्यार्थ्यांचा गौरव

मल्लप्पा बंडेप्पा जीगजंबगी, सचिन म्हेत्रे, पत्रकार, चपळगाव, नितीन शिंदे, लक्ष्मण म्हेत्रे सह शिक्षक सातनदुधनी यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ७ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने केला.

### आज बानुगडे-पाटील यांचे व्याख्यान

दि. २१ जुलै रोजी मंगळवार सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत ख्यातनाम व्याख्याते प्रा.नितीन बानुगडे-पाटील यांचे ‘छत्रपती शिवाजी महाराज’ या विषयावर व्याख्यान सादर होणार आहे.



# अन्नछत्र वर्धापन दिनानिमित्त न्यासाच्या नियोजित इमारतीचे भुमीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जुलै -**
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाचे औचित्य साधून बांधकामाधीन महाप्रसादगृहाच्या इमारतीलगत ५ मजली न्यासाच्या नियोजित प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

कार्यक्रमास विरक्त मठाचे श्री म.नि.प्र. पूज्य बसवलिंग महास्वामी, जेष्ठ गायिका उषा मंगेशकर, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी मोहन पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी अण्णू महाराज, साई ग्रुप, पुणे संस्थापक अध्यक्ष- अरुण आडकर, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, खजिनदार लाला राठोड, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, शुभम नांगरे, पालखी संयोजक, नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी, रामदास तांबे, प्रकल्प संचालक इंजी.प्रशांत काळे, राजेंद्र पाटील, ऋषिकेश शिंदे, समर्थ कुंभार, न्यासाचे बाबुराव चौगुले आदी उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, क्रांती वाकडे, धनश्री पाटील, सरोजनी मोरे, दिव्या मोरे, कल्पना मोरे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, प्रा. शरणप्पा आचलेर, मनोज निकम, प्रवीण देशमुख, शितल फुटाणे, सुमित घाटगे, रोहित खोबरे, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, शिवराज स्वामी, राहुल गांधी, निखील पाटील, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, मैनुद्दीन कोरबू, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, कुमार सलबत्ते, शहाजीबापू यादव, महादेव अनगले, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, प्रसाद मोरे, संजय गोंडाळ, केदार तोडकर, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार, आकाश सूर्यवंशी, विनायक भोसले, भरत राजेगावकर, मल्लिकार्जुन बिराजदार, प्रशांत साठे, वासू कडबगांवकर, गोविंदराव शिंदे, प्रा. मनोज जगताप, ज्ञानेश्वर भोसले, श्रीधर गुरव, अश्पाक काझी, सर्फराज शेख, आकाश गडकरी, सिद्धाराम टाके, बालाजी पाटील, प्रीतेश किलजे, विलास राठोड, रमेश केत, संदीप सुरवसे, अप्पा गवळी, आबा सूर्यवंशी, बंडू बंडगर, शुभम सावंत, किरण साठे, सागर याळवार, विजय इंगळे, अमर मसरे, सोनू पवार, सौरभ माने, रमेश हळसंगी, संतोष माने, राहुल इंडे, असद फुलारी, समर्थ चव्हाण, सुमित कल्याणी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ‘आरोग्य सेवा सप्ताह’

**आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली साईसंजीवनी हॉस्पिटलचा पुढाकार**

### गावोगावी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २० जुलै -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राहुल मांजरे पाटील यांच्या साईसंजीवनी हॉस्पिटल, बार्शी यांच्यावतीने दि. २० ते ३१ जुलै या कालावधीत ‘आरोग्य सेवा सप्ताह’ आयोजित केला आहे. उपक्रमांतर्गत बार्शी तालुक्यातील विविध गावांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन केले आहे. नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवेचा लाभ मिळणार आहे.

शिबिरांमध्ये हृदयरोग, कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब, हाडे व सांधे, मणक्याचे आजार, जनरल सर्जरी, मूत्ररोग आदी आजारांची तपासणी व तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना मोफत उपचाराची सुविधा देण्यात येणार आहे. आषाढी एकादशीनिमित्त २५ जुलै रोजी भगवंत मंदिर, बार्शी येथे वारकऱ्यांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिर होत आहे. वारकऱ्यांना आवश्यक आरोग्य तपासणी, औषधोपचार व वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे.

दि. २० जुलै झाडी, २१ जुलै उपलाई ठोंगे, २२ जुलै खांडवी, २३ जुलै खडकलगाव, २४ जुलै ४२२ व देशमुख प्लॉट, बार्शी, २५ जुलै भगवंत मंदिर, बार्शी (वारकऱ्यांसाठी विशेष शिबिर), २६ जुलै धस पिंपळगाव, २७ जुलै आगलावे बावी, २८ जुलै काटेगाव, २९ जुलै चारे, ३० जुलै मळेगाव, ३१ जुलै साकत, अशी शिबिरे होत आहेत. उपक्रमाचा लाभ नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन साईसंजीवनी हॉस्पिटल, बार्शी यांनी केले आहे.

### सार्वजनिक ठिकाणांच्या नामकरणासाठी धोरण ठरवा

**सोलापूर, दि. २० जुलै-**
सार्वजनिक रस्ते, चौक, उद्याने व इतर सार्वजनिक ठिकाणांच्या नामकरणाबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने महापालिका आयुक्तांकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, मागील तीन सर्वसाधारण सभांमध्ये नामकरणाचे ७० प्रस्ताव, तर सध्याच्या सभेसाठी ३० नवीन प्रस्ताव विचाराधीन आहेत. सार्वजनिक मालमत्तांना राष्ट्रपुरुष, समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक, संत, महापुरुष तसेच देश-समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचीच नावे द्यावीत. वैयक्तिक व्यक्तींच्या नावांचे प्रस्ताव वारंवार येत असल्याने प्रशासनाचा वेळ, मनुष्यबळ व सार्वजनिक निधी खर्च होत असल्याने त्यावर मर्यादा आणाव्यात. यावेळी माजी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, उपाध्यक्ष फिरोज सय्यद, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री, महसूलमंत्र्यांच्या ऐतिहासिक निर्णयामुळे सोलापूरकरांची स्वप्नपूर्ती

### आमदार देवेंद्र कोठे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**
सुमारे १०० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या आणि ४० ते ५० हजार नागरिकांची मागणी असलेला बी टू चा प्रश्न महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोडवून ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सोमवारी काढण्यात आलेल्या शासन निर्णयामुळे यावर शिक्कामोर्तब झाला असल्याची माहिती आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली.

हा निर्णय घेताना १९८९ चा रेडीरेकनर दर लावल्यामुळे नागरिकांना अतिशय





नाममात्र रुपयांमध्ये जागा ताब्यात मिळणार आहे. प्रत्येकाचे लाखो रुपये वाचणार असल्यामुळे सोलापूरकरांची कोट्यावधी रुपयांची बचत होणार आहे. चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न या निर्णयामुळे सुटला आहे. वर्षानुवर्षे या निर्णयाकडे डोळे लावून बसलेल्या सर्वसामान्य हजारो सोलापूरकरांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. हा निर्णय म्हणजे विकसित सोलापूरच्या प्रवासातील मैलाचा दगड ठरणार आहे. अनेकांना अशक्य वाटणारा निर्णय दोन वर्षात करून घेता आला त्याचे मनस्वी समाधान आहे. नागरिकांचे हेलपाटे होऊ नयेत म्हणून एक खिडकी योजनेच्या माध्यमातून मदत करण्यात येणार आहे. बी टू चा प्रश्न सोडवण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष सहकार्य मिळाले. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आभारही आमदार देवेंद्र कोठे यांनी मानले.

# शाळकरी अल्पवयीन मुलींचा सुरक्षा गंभीर प्रश्न



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २० जुलै -**
संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंगळवेढा शहरात रोडरोमीयांचा वाढता सुळसुळाट आणि त्यातून निर्माण होत असलेला सामाजिक अनिष्टविवेक आता नागरिकांच्या शांततेस मोठा धाक बनला आहे. याप्रकरणी शहरातील विविध नागरिक संघटनांच्या वतीने मंगळवेढा पोलीस स्टेशन, शैक्षणिक संस्था आणि एसटी स्टँड व्यवस्थापकासमक्ष निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की अनेक ठिकाणी शाळा परिसर, शिकवणी वर्गांच्या सभोवताल, आणि एसटी स्टँडच्या आसपास काही युवकांकडून विद्यार्थिनींचा पाठलाग, छेडछाड व असभ्य वागणूक वाढली आहे. शाळेच्या सुटल्यानंतर किंवा मधल्या सुट्टीत मुलींना सुरक्षितपणे घरी पोहोचवणे आता मोठे आव्हान बनले आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि शिकवणी वर्गात परिसरात उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. यावेळी सिद्धेश्वर आवताडे, रमेश जोशी, मल्लय्या स्वामी, नारायण गोवे, विठ्ठल गायकवाड, प्रकाश मुळीक, सतीश दत्तू, विलास देशमुख, प्रमोद सावंजी, हर्षद डोरले, गणेश सावंजी, चंद्रकांत काकडे, बाळासाहेब नागणे, समाधान हेंबाडे, क्रांती दत्तू, राजवीर हजारे, देवदत्त पवार, प्रफुल्ल सोमदळे आदी उपस्थित होते.



# ‘श्रीं’च्या दर्शनासाठी कामगार वस्त्यांमध्ये गर्दी

### संत गजानन महाराजांचे ‘पंढरी’कडे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै -**
शेगावीचा राणा संत गजानन महाराज पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने ‘श्रीं’च्या दर्शनासाठी कामगार वस्त्यांमध्ये मोठी गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. मुखी हरिनाम, कपाळी केशरी गंध, टाळ-मृदंगाचा गजर, गजानन महाराजांचा जयघोष करत दोन दिवसांचा सोलापूर मुक्काम आटोपून शेगावी राणा श्री.गजानन महाराज सोमवारी दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी दमाणी नगरातून पंढरीच्या दिशेने प्रस्थान ठेवले.

रेल्वे पुलाच्या कामामुळे यंदा गजानन महाराजांची पालखी सात रस्ता, जुना एम्प्लॉयमेंट चौक, पार्क चौक, रामलाल चौक, भैय्या चौक, रेल्वे स्टेशन, रामवाडी येथील मोदी रेल्वे बोगदा, रामवाडी पोलीस चौकीमार्गे लक्ष्मी-विष्णू चाळ येथे जय महाराष्ट्र तरुण मंडळाच्या प्रांगणात काही वेळासाठी विसावली. याठिकाणी चाळकरी आणि टाळकरी एकत्र आल्यामुळे भाविक भक्तीरसात चिंब झाले होते.

बी टू चा प्रश्न मार्गी लागल्यामुळे तसेच रेल्वे पुलाच्या कामामुळे प्रथमच गजानन महाराज पालखी कामगारांच्या चाळीत आल्यामुळे रहिवाशी भक्तीरसात न्हाऊन निघाले होते. ठिकठिकाणी पालखीचे रांगोळ्याच्या पायघड्या टाकून आणि पुष्पवृष्टी करून पालखीचे स्वागत करण्यात येत होते. लक्ष्मी विष्णू चाळीतून दमानी नगरकडे निघाली. मरिआई चौक, गवळी वस्ती मार्गे पालखी दमानी नगरातील दमानी अंध शाळेत विसावली. यावेळी वारकऱ्यांना भोजन देण्यात आले.

# भंगार चोरी प्रकरणी आरोपी जगन्नाथ बनसोडे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल न करण्याचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**
सोलापूर महानगरपालिकेतील स्टोर रूम मधून भंगार चोरी प्रकरणी गुन्हा दाखल असलेले आरोपी तथा महापालिकेच्या अतिक्रमण विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्याविरुद्ध दोषारोप पत्र दाखल न करण्याबाबतचा आदेश उच्च न्यायालय कोल्हापूर बेंच ने सोलापूर पोलिसांना दिला आहे. मनपातील भंगार चोरी प्रकरणी अतिक्रमण प्रमुख जगन्नाथ बनसोडे सह महापालिकेतील इतर कर्मचारी व टेम्पोचालकावर दि. १८ मे २०२६ रोजी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता .

सदर फिर्यादीस आरोपी जगन्नाथ बनसोडे यांनी कोल्हापूर येथील उच्च न्यायालयात ॲड निलेश जोशी यांच्यावतीने आव्हान देवून फिर्याद रद्द करण्याची मागणी केली आहे. भंगार चोरी झाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे व वस्तूंची शहानिशा न करता तसेच तथाकथित चोरी झालेल्या वस्तू या जागेवरच असल्यामुळे नक्कीच चोरी झाली का? कि कायदेशीर मार्गाने वस्तू घेऊन जाण्यात येत होत्या, याबाबत चौकशी न करता चोरी झाले असा खोटा आरोप करुन दबावापोटी पोलीसांनी फिर्याद दाखल करून घेतली असल्याचे कागदपत्रांच्या आधारे ॲड निलेश जोशी यांनी आपल्या युक्तिवादात उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायमूर्ती संदेश पाटील यांनी प्रस्तूत प्रकरणी पोलिसांना नोटीस काढून जगन्नाथ बनसोडे यांच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल न करण्याचे आदेश दिलेले आहेत.

याप्रकरणी आरोपी जगन्नाथ बनसोडे यांच्या वतीने ॲड निलेश जोशी, ॲड शक्ती कोळेकर व ॲड स्मिता शिंदे यांनी काम पाहिले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अमेरिकेने वाढवली हल्ल्यांची तीव्रता



## सैनिकाच्या मृत्यूनंतर वाढली आक्रमकता

### सलग नवव्या रात्री इराणवर हल्ले

इराणवर सलग नवव्या रात्री हल्ले करण्यात आले, अशी माहिती अमेरिकी सैन्याच्या सेंट्रल कमांडने सोमवारी पहाटे सांगितले. इराणची लष्करी कमांड केंद्रे, हवाई संरक्षण आणि पाळत ठेवणारी किनाऱ्यावरील ठिकाणे, सागरी क्षमतांना लक्ष्य करण्यात आले, असे सेंट्रल कमांडने सांगितले. ■

अमेरिकी हल्ल्यात उद्ध्वस्त झालेला इराणमधील पूल

### होर्मुझची सामुद्रधुनी संघर्षाचे कारण

होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इराणची पकड ढिली करण्यास भाग पाडण्याच्या उद्देशाने ट्रम्प यांनी इराणमधील वीज केंद्रे आणि पूल यांना लक्ष्य करण्याची धमकी दिली आहे. युद्धापूर्वी जागतिक स्तरावर व्यापार होणाऱ्या तेलाचा पाचवा हिस्सा याच मार्गावरून जात असे. अलिकडील हल्ल्यांवरून असे दिसून येते की, अमेरिकन लष्कर त्या योजनेची अंमलबजावणी करीत आहे. ■

**दुबई, २० जुलै**

अमेरिकी लष्कराच्या आणखी एका जवानाचा मृत्यू झाल्यानंतर चिडलेल्या अमेरिकेने इराणवरील हल्ल्याची तीव्रता वाढवली आहे. या हल्ल्यांत वायव्य इराणमधील एका शहराला लक्ष्य करण्यात आले. या शहरात क्षेपणास्त्रांचा भूमिगत तळ असल्याचे सांगितले जाते. अमेरिकी हल्ल्यांना इराणनेही जोरदार प्रत्युत्तर दिले. अमेरिकी नौदलाच्या पाचव्या आरमाराचे मुख्यालय असलेल्या बहरीन आणि कुवैतवर इराणने हल्ले केले.

अमेरिका आणि इराण टप्प्याटप्प्याने तीव्र स्वरूपाच्या युद्धाकडे जात असल्याचे नव्याने झालेल्या हल्ल्यांमधून स्पष्ट झाले. संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी मागील महिन्यात झालेला तात्पुरता करार दोन्ही देशांनी मोडला आहे. परस्परांवरील हल्ल्यांमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणात ठप्प झाली आहे. लाखो लोकांसाठी आवश्यक असलेल्या नागरी पायाभूत सुविधांवर दोन्ही बाजूंनी हल्ले करण्यात आले. दुसरीकडे या संघर्षामुळे बेंचमार्क ब्रेंट क्रूड सोमवारी प्रति बॅरल ९० डॉलर्सच्या वर पोहोचले. या संघर्षामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाला अधिकच खतपाणी मिळाले आहे.

इराणच्या पाडलेल्या ड्रोनमधील स्फोटके निकामी करण्यासाठी नियंत्रित स्फोट घडवताना एका सैनिकाचा मृत्यू झाला, असे अमेरिकी लष्कराने सांगितले. आम्ही आज रात्री पुन्हा त्यांच्यावर जोरदार हल्ले केले, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले. हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या सन्मानार्थ हे हल्ले करण्यात आले, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

राजधानी तेहरानपासून सुमारे ५२० किमी अंतरावर वायव्येकडील ताब्रिज शहराच्या परिसरात अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात किमान एका व्यक्तीचा मृत्यू झाला, असे वृत्त इराणची सरकारी वृत्तसंस्था आयआरएनएने दिले आहे. ताब्रिजमध्ये इराणच्या निमलष्करी रिव्हॉल्युशनरी गार्डद्वारे चालवले जाणारे क्षेपणास्त्रांचे भूमिगत तळ आहेत. अमेरिकेच्या हल्ल्यांमध्ये खुझेस्तान प्रांतातील बंदर इमाम खोमेनी, होर्मोजगन प्रांतातील सिरिक व जास्क आणि सिस्तान व बलुचिस्तान प्रांतातील कोनारक व चाबहार यांनाही लक्ष्य करण्यात आले असण्याची शक्यता आहे, असे वृत्त 'आयआरएनए'ने दिले आहे.

हल्ले सुरू झाले असतानाच सोमवारी पहाटे ओमानच्या किनारपट्टीजवळील होर्मुझमध्ये एका जहाजाला आग लागली. ओमानच्या किनाऱ्याजवळ लागलेल्या या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, अशी माहिती ब्रिटनच्या लष्करो दिली. हा सागरी मार्ग इराणचे नियंत्रण टाळण्यासाठी अमेरिकन लष्कराने जहाजांना वापरण्यास सुचवला होता. (वृत्तसंस्था)



जोरहाट जिल्ह्यात टिटाबारजवळील पाण्याखाली गेलेला जोरहाट-शिवसागर राष्ट्रीय महामार्ग. यावरून लोकांना कसरत करून वाहने काढावी लागली

# आसाममध्ये पूरस्थिती गंभीर

## लष्कर तैनात, रेल्वेसेवा ठप्प

**गुवाहाटी, २० जुलै**

सोमवारी झालेल्या संततधार पावसामुळे आसामच्या वरच्या भागात पूरस्थिती अधिकच गंभीर झाली. त्यामुळे मदत व बचावकार्यात राज्य यंत्रणांना सहकार्य करण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले. या भागातील रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला असून, अनेक गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले, त्या रद्द करण्यात आल्या किंवा त्यांची सेवा मध्येच थांबवण्यात आली.

यावर्षीच्या पुरात आतापर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला आहे. चराईदेव, धेमाजी, दिब्रुगड, जोरहाट, शिवसागर, तिनसुकिया आणि उदलगुरी जिल्ह्यातील ५७,१०० हून अधिक लोकांना पुराचा फटका बसला आहे, अशी माहिती आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एएसडीएमए) दिली. राज्यातील अनेक चहाचे मळे पुराच्या पाण्याखाली गेले आहेत. नागालॅण्डमधून येणाऱ्या नद्यांच्या पाणी पातळीत अचानक वाढ झाली असून, त्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत, अशी माहिती 'टी असोसिएशन ऑफ इंडिया'च्या आसाम शाखेने दिली. दोरीका नदीवरील तटबंध फुटल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आणि नाझिरा भागातील चहाच्या मळ्यांचा मोठा भाग पाण्याखाली गेला, असे त्यात म्हटले आहे.

मुसळधार पावसामुळे दुथडी भरून वाहणाऱ्या दिखो नदीचे पाणी तिनसुकिया विभागातील शिवसागर जिल्ह्यातील सिमालुगुरी शहरात शिरले, असे ईशान्य सीमा रेल्वेने सांगितले. पुराचे पाणी स्थानक परिसर आणि रेल्वे वसाहतीत शिरले आहे. या भागातील रेल्वे मार्गही पाण्याखाली गेले आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, पुढील आदेशापर्यंत सिमालुगुरी-नामटियाली आणि सिमालुगुरी-सेलेनघाट या मार्गांवरील रेल्वे वाहतूक स्थगित करण्यात आली आहे, असे रेल्वेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. दिब्रुगड आणि तिनसुकिया येथून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या ब्रह्मपुत्रेच्या उत्तर काठावरील रंगिया-रंगापारा मार्गावरून वळवण्यात आल्या आहेत, तर अनेक स्थानिक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत किंवा त्यांची सेवा मध्येच थांबवण्यात आली आहे.

मंत्रिमंडळातील चार सहकारी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून बचाव व मदत कार्यावर देखरेख करत आहेत. बाधित जिल्ह्यांमधील सर्व खासदार आणि आमदारांना वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी पूरग्रस्त भागात उपस्थित राहण्यास सांगितले आहे, असे आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### शिवसागरमध्ये ५१० लोकांची सुटका

"शिवसागरमध्ये एसडीआरएफ आणि अग्निशमन व आपत्कालीन सेवा दलाने ५१० लोकांची सुटका केली आहे. दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्यासाठी अतिरिक्त बोटी आणि लष्कराची हेलिकॉप्टर्स तैनात करून बचावकार्य सुरूच आहे, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाने समाज माध्यमावर दिली. ■

### चराईदेवमध्ये एनडीआरएफची पथके

चराईदेवमध्ये सर्वाधिक फटका बसलेल्या भागांत एनडीआरएफ, त्यांची राज्यस्तरीय समकक्ष यंत्रणा आणि लष्कराची पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच बाधित रहिवाशांची सुरक्षितता व कल्याण सुनिश्चित करण्यासाठी मदतकार्य सुरू आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. ■

### सोनम वांगचुकच्या पत्नीवर हल्ल्याचा दावा पोलिसांनी फेटाळला

**नवी दिल्ली :** येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान, पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांच्यावर पोलिसांनी हल्ला केला आणि त्यांचे केस ओढले, अशा समाज माध्यमांवरील दाव्यांचे दिल्ली पोलिसांनी सोमवारी खंडन केले. एका निवेदनात पोलिसांनी सांगितले की, सोनम वांगचुक यांच्या पत्नीवर दिल्ली पोलिसांच्या कर्मचाऱ्यांनी हल्ला केला आणि त्यांचे केस ओढले, अशा समाज माध्यमांवरील बातम्या पूर्णपणे असत्य आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत, असे निवेदनात म्हटले आहे. ■

# वांगचुक यांचा वैद्यकीय अहवाल द्या

## दिल्ली उच्च न्यायालयाचा सफदरजंग रुग्णालयाला निर्देश

**नवी दिल्ली, २० जुलै**

दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी येथील सफदरजंग रुग्णालयाला सोनम वांगचुक यांचे पॅथॉलॉजिकल अहवाल आणि आरोग्यविषयक माहिती सादर करण्याचा निर्देश दिला. वांगचुक यांना खाजगी रुग्णालयात हलवण्याबाबत त्यांची पत्नी गीतांजली आंग्मो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मंगळवारी निर्णय घेतला जाईल, असेही स्पष्ट केले.

मध्यवर्ती सरकारी रुग्णालयात सुरू असलेल्या उपचारात हस्तक्षेप करण्यास उच्च न्यायालयाने रविवारी दिलेल्या आदेशाविरुद्ध आंग्मो यांनी दाखल केलेल्या अपिलावर खंडपीठ सुनावणी करीत होते. अहवालात आजच्या नमुन्यांच्या विश्लेषणाचा समावेश असावा, असे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्या. तेजस कारिया यांच्या खंडपीठाने म्हटले. वांगचुक यांना खाजगी आरोग्य सुविधेमध्ये हलवण्याबाबतच्या अंगमो यांच्या याचिकेला परवानगी द्यायची की नाही, यावर मंगळवारी निर्णय घेतला जाईल, असे खंडपीठाने नमूद केले.

सफदरजंग रुग्णालयात सुरू असलेल्या उपचारांमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार देणाऱ्या एकल न्यायाधीशांच्या रविवारच्या आदेशाला आंग्मो यांनी आव्हान दिले आहे. एम्सचे प्रभारी संचालक आणि वांगचुक यांच्यावर सध्या उपचार करणारे एम्समधील आपत्कालीन विभागातील डॉक्टरांना सुनावणीस उपस्थित राहण्याचा खंडपीठाने निर्देश दिला. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### प्रियांकाच्या वाढदिवसानिमित्त निकची खास पोस्ट

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राच्या वाढदिवसानिमित्त पती आणि गायक निक जोनासने समाज माध्यमावर एक खास व्हिडीओ शेअर करून शुभेच्छा दिल्या आहेत. या व्हिडीओमध्ये प्रियांका स्पेनमध्ये एका यॉटवर सुट्ट्यांचा आनंद घेताना दिसते आहे. प्रियांकाच्या वाढदिवसानिमित्त तिच्या आगामी 'वाराणसी' चित्रपटातील तिचा पहिला लूकही प्रदर्शित करण्यात आला आहे. अलीकडेच एका पॉडकास्ट दरम्यान, निक आणि प्रियांकाने त्यांच्या प्रेम कथेबद्दल सांगितले होते आणि २०१६ मध्ये त्यांच्यात संवाद कसा सुरू झाला हे सांगितले. निक जोनासने त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर एक छोटा व्हिडीओ पोस्ट केला. हा व्हिडीओ स्पेनमधील आहे. तिथे दोघे सुट्ट्या घालवत आहेत. ■



### सलमानच्या प्रकृतीबद्दल चाहते चिंतेत



**मुंबई :** सलमान खानचे अनेक व्हिडीओ आणि फोटो समाज माध्यमावर व्हायरल होत आहेत. अलिकडेच अभिनेत्याचा एका व्हायरल व्हिडीओमध्ये लेटेस्ट लूक पाहायला मिळाला. त्याचा हा लूक पाहून चाहत्यांना आनंद नाही तर, धक्का बसला. तो एका कार्यक्रमात गेला होता. यात त्याने क्रिम रंगाचा शर्ट आणि जीन्स परिधान केले होते. त्याच्या डोक्यावर टोपी देखील होती. त्याचा चेहरा आणि थकलेले डोळे पाहून त्याच्या चाहत्यांनी चिंता व्यक्त केली. या व्हिडीओमध्ये सलमान खान थकलेल्या अवस्थेत दिसत आहे. त्याचा हा अवतार पाहून चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. चाहत्याने, सलमान खान आजारी आहे. तो आता म्हातारा होतो आहे, अशी कमेंट केली आहे. ■

### वाढदिवसाचे फोटो सोशल मीडियावर



**मुंबई :** वाढदिवस साजरा करणाऱ्या कतरिना कैफने पती विकी कौशल आणि मुलगा विहानसोबत तिच्या सेलिब्रेशनची झलक समाज माध्यमावर शेअर केली. पोस्टमध्ये विकीसोबतचे तिचे फोटो आणि मुलगा विहानसोबत घालवलेले काही खास क्षण दिसले. फोटोंसोबत कतरिनाने एक भावनिक नोटही लिहिली. मी नेहमी देवाचे आभार मानते की त्याने मला तुझ्यासारखा अनमोल साथीदार दिला. हा माझा सर्वात सुंदर वाढदिवस आहे, असे तिने लिहिले. मुलगा विहानच्या जन्मानंतर कतरिनाचा हा पहिला वाढदिवस होता. वाढदिवसाच्या निमित्ताने कतरिनाने पीच रंगाचा ड्रेस घातला होता. तिने मोकळे केस आणि कमी ॲक्सेसरीजसह तिचा लूक साधा ठेवला. पोस्टमध्ये विकी कौशलसोबतचा एक फोटोही समाविष्ट होता, जो सेलिब्रेशननंतरचा असल्याचे सांगण्यात आले. यात दोघेही कॅज्युअल आउटफिटमध्ये एकत्र दिसले. ■




# 'अपार'साठी संमती आवश्यक

## अंमलबजावणी करण्याचे निर्देश देणार: सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली, २० जुलै**

प्रत्येक गोष्टींकडे संशयाने बघू नका, अन्यथा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाला (सीबीएसई) ओडिशा उच्च न्यायालयाच्या निर्देशाची देशभरात अंमलबजावणी करा, असे निर्देश देण्यात येईल, असा इशारा सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. या निर्देशानुसार, 'अपार' आयडी तयार करण्यासाठीच्या संमतीपत्रात पालकांना संमती नाकारण्याचा किंवा योजनेतून बाहेर पडण्याचा पर्याय स्पष्टपणे देणे आवश्यक आहे, असेही स्पष्ट केले.

या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व व्ही. मोहना यांच्या न्यायासनासमोर झाली. ओडिशा उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जर 'अपार' योजना खरोखरच ऐच्छिक असेल, तर संमतीपत्रात पालकांना नकार देण्याचा किंवा बाहेर पडण्याचा पर्याय स्पष्टपणे दिला पाहिजे. सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, काही विद्यार्थ्यांच्या पालकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकील इंदिरा जयसिंग यांनी वकील पारस नाथ सिंग यांच्या मदतीने असा युक्तिवाद केला की, सर्वोच्च न्यायालयाच्या २०१९ च्या आधार निकालात अल्पवयीन मुलांना आधार मिळवण्यासाठी सक्ती केली जाऊ शकत नाही, असे म्हटले आहे. परंतु, मुलांना एका वैधानिक नसलेल्या योजनेत नावनोंदणी करण्यास भाग पाडले जात आहे.

**योजनेचे 'ऐच्छिक' स्वरूप केवळ कागदावरच**

त्यांनी पुढे सांगितले की, अपार आयडी आधारशी जोडलेले असल्यामुळे ते कथितरित्या पडताळणीच्या उद्देशाने मागितले जात असल्याने या योजनेचे ऐच्छिक स्वरूप केवळ कागदावरच आहे. तथापि, न्यायासनाने नमूद केले की, प्रत्येक विद्यार्थ्याला एक अद्वितीय शैक्षणिक ओळख प्रदान करणे हा एक वैध उद्देश पूर्ण करत असल्याचे दिसते. तसेच शैक्षणिक नियोजन आणि नोंदींचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी हे एक चांगले पाऊल आहे. ज्या उद्देशांसाठी डेटा गोळा केला गेला आहे, त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही उद्देशांसाठी त्याचा वापर केला जाऊ शकत नाही. देशात डेटा संरक्षण कायदे अस्तित्वात आहेत, असे न्यायासनाने नमूद केले. (वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्र्यांवर टीका; आमदाराला अटक

**तुथुकुडी, २० जुलै**

मुख्यमंत्री विजय यांच्यावर टीका केल्याप्रकरणी पोलिसांनी डीएमके आमदार मार्कंडेयन यांना अटक केली आहे. मतदारांचे आभार मानण्यासाठी १८ जुलैला तुथुकुडी जिल्ह्यातील कोविलपट्टी येथे डीएमकेची एक जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत आमदार मार्कंडेयन यांच्या भाषणामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे.

मार्कंडेयन म्हणाले होते की, केवळ तामिळनाडूच्याच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या इतिहासात इतका नालायक मुख्यमंत्री कधीच झाला नाही. मी विधानसभेत त्यांच्या वडिलांना शोधत आहे. विजय यांना काय वाटतं, आम्ही विदूषक आहोत?, आम्ही त्यांना विधानसभेत बघू, असा इशाराही त्यांनी दिला होता. यापूर्वीही राज्य सरकारने टीव्हीके सरकार आणि मुख्यमंत्री विजय यांच्या विरोधात बोलणाऱ्यांवर कारवाई केली आहे. थुथुकुडी टीव्हीचे उत्तर जिल्हा सचिव बालसुब्रमण्यम यांनी थुथुकुडी जिल्हा गुन्हे शाखा पोलिसांकडे तक्रार दाखल केली. (वृत्तसंस्था)

# रेल्वे तिकीट दलालांवर धडक कारवाई




**साडेचार वर्षांत १६७६ गुन्हे दाखल**

**१० कोटींची तिकिटे जप्त**

**मुंबई, २० मुंबई**

रेल्वे तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या दलालांचे कंबरडे मोडण्यात मध्य रेल्वेच्या सुरक्षा दलाला (आरपीएफ) मोठे यश आले आहे. गेल्या साडेचार वर्षांत आरपीएफने अवैध तिकीट विक्री करणाऱ्यांवर मोठी मोहीम उघडली असून, २०२२ ते जून २०२६ या कालावधीत तब्बल १,६७६ गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत कोट्यवधी रुपयांची अवैध तिकिटे जप्त करण्यात आली असल्याची धक्कादायक माहिती माहिती अधिकारातून उघड झाली आहे.

आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मध्य रेल्वे मुख्यालयाकडे यासंदर्भात माहिती मागवली होती. त्यातून हा मोठा खुलासा झाला आहे.

प्राप्त आकडेवारीनुसार, आरपीएफने तिकीट दलालांवर सातत्याने कारवाईचा बडगा उगारला आहे. या साडेचार वर्षांच्या कालावधीत आरपीएफने ९ कोटी ६२ लाख १ हजार ६५३ रुपयांची ई-तिकिटे, तर ८८ लाख ४९ हजार २९९ रुपयांची जेसीआर तिकिटे असा एकूण साडेदहा कोटींच्या घरात जाणारा मुद्देमाल जप्त केला आहे.

या अवैध व्यवसायात केवळ बाहेरील दलालच नव्हे, तर काही घरभेदी रेल्वे कर्मचारीही सामील असल्याचे निष्पन्न झाले आहे. २०२२ मध्ये १, २०२३ मध्ये २ आणि २०२४ मध्ये ४ अशा एकूण सात रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. याशिवाय, हजारो दलाल आणि अधिकृत एजंटांवरही बेकायदेशीर तिकीट विक्रीप्रकरणी गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली. (तभा वृत्तसेवा)

### दलाल, एजंटविरूद्ध कारवाया

- २०२२ : ३१८ दलाल आणि ५२ एजंट
- २०२३ : ३५६ दलाल आणि १४१ एजंट
- २०२४ : ४११ दलाल आणि २०४ एजंट
- २०२५ : ४२९ दलाल आणि १३ एजंट
- २०२६ (जुलैपर्यंत) : १२७ दलाल

### वर्षनिहाय दाखल झालेले गुन्हे

- २०२२ : ३०९ गुन्हे
- २०२३ : ३९९ गुन्हे
- २०२४ : ५०२ गुन्हे (सर्वाधिक कारवाई)
- २०२५ : ३५६ गुन्हे
- २०२६ (जूनअखेर) : ११० गुन्हे

> आरपीएफकडून दलालांवर सातत्याने आणि प्रभावी कारवाई होत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. या काळ्या बाजाराला कायमचा आळा घालायचा असेल, तर प्रवाशांनी दलालांकडून तिकिटे घेण्याचे टाळावे. रेल्वेच्या अधिकृत खिडकीवरून किंवा अधिकृत वेबसाईटवरूनच तिकीट खरेदी करावे.
>
> **-अनिल गलगली,** आरटीआय कार्यकर्ते

### उच्च न्यायालयाचा ममतांना झटका

**कोलकाता, २० जुलै**

तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी गटाला कलकत्ता उच्च न्यायालयाने सोमवारी मोठा झटका दिला. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) गोठवलेली पक्षाची तीन बँक खाती चालवण्यास अंतरिम परवानगी देण्यास न्यायालयाने नकार दिला.

पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने तृणमूल काँग्रेसची एकूण ₹४४०.४२ कोटींची तीन बँक खाती गोठवली आहेत. पक्षाच्या काही बँक खात्यांमार्फत होणारे कथित अप्रामाणिक आर्थिक व्यवहार, बेकायदेशीर निधी उभारणी आणि निधीच्या संशयास्पद हस्तांतरणाच्या तपासाचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणात दोन्ही पक्षांनी आपला युक्तिवाद पूर्ण केल्यानंतर न्यायमूर्ती कृष्णा राव यांनी १३ जुलैला याचिकेवरील अंतरिम आदेश राखून ठेवला. एप्रिल २०२३ ते जून २०२६ दरम्यान तृणमूलच्या बँक खात्यांमधून संबंधित कंपनीकडे अंदाजे १६० कोटी रुपये हस्तांतरित केले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# प्रश्न, प्रतिमा आणि प्रतिभा

'सेलिब्रिटी' किंवा 'उत्सवमूर्ती' नावाचे वलय व्यक्तिमत्त्वाला प्राप्त झाले म्हणजे आपल्या प्रत्येक शब्दाला अधिकाराची धार आपसूकच प्राप्त होते असा समज समाजमाध्यमांच्या जमान्यात बळावणे साहजिक आहे. आपल्या अफाट प्रतिभाशक्तीच्या आणि जगण्याचे शिकविलेल्या प्रत्येक धड्यातील अनुभवांना प्रतिभेचे लेणे चढवून घेतलेल्या शब्दांच्या आधारावर व्यक्त होणाऱ्या काही आदरणीय व्यक्तिमत्त्वांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर कालातीत स्वरूपाचे काही भाष्य केले. गेल्या शतकाच्या अखेरच्या पंचविशीत, कविवर्य विंदा करंदीकर, कवी वसंत बापट, मंगेश पाडगांवकर यांसारख्या कवींच्या संवेदना त्या काळातील एकूणच सामाजिक, राजकीय परिस्थितीच्या रेट्याने पिचलेल्या समाजाच्या वेदना पाहून आणि प्रत्यक्ष अनुभवूनही अस्वस्थ झाल्या आणि त्यांच्या प्रतिभेला स्वानुभवाने लगडलेल्या शब्दांचे ताकदवान पंख लाभले. त्या भराऱ्यांतून या वेदना कवितांच्या रूपाने शब्दांचा साज घेऊन दाहकपणे समाजासमोर आल्या. त्यांच्या कोणत्याही शब्दावर सुपारीबाजपणाचा आरोप ठेवण्याची हिंमत त्या शब्दांनी जखमी झालेल्यांना किंवा पोळलेल्यांनादेखील करता आली नसती, एवढा प्रामाणिकपणा त्यांच्या शब्दांत होता. कवीच्या शब्दात अशी ताकद तेव्हाच निर्माण होते, तेव्हा त्याचे शब्द स्वतंत्र, स्वाभिमानी आणि प्रामाणिक संवेदनशीलतेने लगडलेले असतात! त्यामुळे त्यांच्या प्रतिभेला मान्यता मिळतेच आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवतीचे 'उत्सवमूर्ती' असण्याचे वलय असे उजळून निघते. विंदांच्या अशा कितीतरी कवितांनी समाजाच्या वेदना मांडल्या, सत्तेवर आणि सत्ताधीशांवर संयत आसूडही ओढले. वसंत बापटांच्या कवितांनाही तशीच, स्वाभिमानाची, अस्वस्थ जाणिवांची आणि वेदनेची धार होती. पाडगावकरांनी आपल्या शैलीत हीच परंपरा जपली आणि कवी हा केवळ त्या क्षेत्रातील 'सेलिब्रिटी' नसतो, तर समाजाचा 'जागल्या' म्हणून काम करण्याची स्वयंस्फूर्त जबाबदारी पेलणारा राखणदार असतो, हे सिद्ध झाले. सर्वसामान्य समाज आपल्यापुढील समस्यांशी झगडण्याच्या आणि संघर्षाच्या वेदनांना सामोरे जाण्याच्या कसरतीत आपली सारी शक्ती पणाला लावत असताना काहीसा दुबळा होऊन जातो. आपल्या समस्यांचे ओझे वाहणे अवजड होत असताना समाजाच्या समस्यांचे ओझे पाठीवर घेण्याची त्याची उमेद कमीच झालेली असते. अशा वेळी, मौन राहिले तर या समस्यांना वाचा फुटणार कशी आणि समस्याग्रस्तांना वाली राहणार कोण अशी स्थिती जेव्हा येते, तेव्हा कवीच्या प्रखर जाणिवांना प्रतिभेचे पंख फुटतात.

गेल्या शतकातील अखेरच्या काही दशकांत अशा जळजळीत जिवंतपणाशी जवळीक असलेल्या कविता आता काळाच्या प्रवाहात मात्र काहीशा गढूळल्या आहेत किंवा कसे, याची शंका यावी असा सूर घेऊन समाजमाध्यमांवर 'व्हायरल' वगैरे होताना दिसतात. गढूळलेल्या कवितांच्या समाजमाध्यमांवरील गर्दीला दर्दी काव्यप्रेमींची दाद मिळत नसली, तरी त्या फोफावतात आणि त्याचीच चर्चा अधिक होते. कवितेसारख्या साहित्यविश्वातील श्रेष्ठ क्षेत्राची अशी अवस्था होत असतानाही, विंदा, बापट, पाडगावकरांसारख्या श्रेष्ठ कवींच्या कालातीत कवितांच्या रांगेत त्यांना बसविण्याचे प्रयत्न होत असतील, तर ते अधिक चिंताजनकही आहे.

मराठी साहित्यात कविवर्य विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकरांसारख्या सिद्धहस्त, प्रतिभावान कवींनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कविता खऱ्या अर्थाने समृद्ध केली. आधुनिक काळात कवींच्या गर्दीत आता नेते किंवा अभिनेत्यांसारख्या 'सेलिब्रिटीं'च्या शब्दप्रतिभेलाही पंख फुटू लागले असले तरी त्यांच्या शब्दांतून उमटणाऱ्या सामाजिक, राजकीय पर्यावरणाविषयीच्या चिंतेवरच शंकेची पुटे चढलेली दिसत आहेत. विंदांच्या कवितेनेही त्या काळात, 'जनतेचे राज्य' नावाच्या कवितेचे झणझणीत अंजन समाजाच्या डोळ्यात घातले होते. त्यांच्या 'सगळेच कसे सपक सपक' या कवितेने समाजाच्या अस्वस्थ सुस्तीवर आणि राजकारणातील मूल्यहीनतेवर चिंता व्यक्त केली होती. 'देशाचा नेता कसा? सपक जनता कशी? सपक' या शब्दांतून उमटणाऱ्या प्रामाणिक अस्वस्थतेचीही त्या काळी चर्चा झाली. त्यातील नकारात्मक सुरांवर बोटेदेखील ठेवली गेली आणि त्यांना त्याबद्दल टीकादेखील सहन करावी लागली. आणिबाणीसारख्या काळ्या कालखंडामुळे उमटलेल्या अस्वस्थपणातून शब्दबद्ध झालेल्या कवितांमधून काही शब्द वगळावेही लागले, पण त्यांच्या कवितेवर कधीच सुपारीबाजपणाचा किंवा धंदेवाईकपणाचा ठपका बसला नव्हता. पाडगांवकर, विंदा किंवा बापट यांसारख्या कोणाही कवीच्या कवितेतून निर्माण झालेल्या वादाला स्वार्थाचा किंवा आर्थिक लोभ वा लाभाच्या संशयाचा स्पर्शदेखील नव्हता आणि हे समाजाला खात्रीपूर्वक ठावूक होते. सत्तेला आरसा दाखविणे हे कवीचे कर्तव्य असते हे खरेच, पण सोयीस्करपणे असा आरसा हाती घेऊन तो कोणा विशिष्ट वेळी सत्तेसमोर धरणे त्यांना कधीच जमले नाही. आजच्या काळातील अनेक कवितांमध्ये राजकीय सोयीनुसार वापरणे सोयीचे व्हावे अशा शब्दांची लयलूट दिसते, तेव्हा ज्या माध्यमांच्या मंचावरून त्या जगजाहीर होतात, त्याच मंचावर त्यांचे वाभाडेदेखील निघतात. केवळ उत्सवमूर्ती किंवा सेलिब्रिटी म्हणून एखाद्या क्षेत्रातील प्रतिष्ठा प्राप्त झाली की त्याचे वजन वापरून कोणत्याही क्षेत्रात लुडबूड करण्याचा अधिकार स्वतःकडे घेण्याची प्रसिद्धीची एक सोपी रीत अलिकडे विकसित होताना दिसत आहे. समाजाला ते जेव्हा जाणवते, तेव्हा अशा गल्लाभरू शब्दांचे वजन आपोआप कमी होतेच, पण कवितेसारख्या समृद्ध दालनाची प्रतिष्ठादेखील पणाला लागते. अलिकडच्या काही कविता केवळ सरकारांना किंवा सत्तेलाच लक्ष्य का करतात, त्यांना समाजातील उणिवा दिसत नाहीत का, त्या उणिवांनी त्यांची तथाकथित प्रतिभावंत मने अस्वस्थ होत नाहीत का, असे अनेक प्रश्न यामुळेच अलिकडे वारंवार विचारले जाऊ लागले आहेत. ते वास्तविक असेल, तर ते वर्तमानाच्या प्रवाहात वाहवत जाण्यासारखेच ठरेल. कवितेच्या प्रांताने अशा वाहवत जाण्यापासून सावध राहावयास हवे. कोणे एके काळी कवी हा समाजसौख्याचा राखणदार म्हणून ओळखला जात असे. आता समाजास कवितांचा राखणदार म्हणून काम करावे लागणार असेल, तर कवितांचा पुढचा काळ कसा असेल याचा गंभीर विचार व्हावयास हवा. व्यवस्थेला प्रश्न विचारणे हा साहित्याचा स्वभावच असतो. मात्र, या प्रश्नांना प्रामाणिक अस्वस्थतेची जोड असावयास हवी. अन्यथा, प्रसंगानुरूप निर्माण होणारे प्रश्न अशाच प्रसंगांच्या वेळी कोठे दडी मारतात अशी शंका घेण्यास वाव मिळतो. जुन्या काळातील कवींनी कोणत्याच राजकीय पक्षाशी स्वतःस बांधून घेतले नव्हते, त्यामुळे कोणा एका पक्षाची पाठराखण करण्यासाठी आपल्या प्रतिभेला वेठीस धरणे किंवा कोणा एका पक्षाच्या विरोधासाठी प्रतिभेचा लिलाव मांडणे त्यांना कधीच जमलेदेखील नाही. जेव्हा समाजासमोरील प्रश्न उग्र होतात, तेव्हा लोकभावना शब्दांत मांडणे ही आपली पहिली भूमिका आहे, हे त्यांना माहीत होते. कवितेच्या प्रांताचे तसे संस्कारच होते. असे संस्कार पुन्हा एकदा जागविण्याची गरज अधूनमधून अधोरेखित होऊ लागली आहे. कारण, बदलत्या संदर्भांमुळे आणि असहिष्णुतेमुळे सध्याचे वाद अधिक गडद होऊ लागले आहेत, संवेदनशीलताही नाजूक होत चालली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करू नये, पण अभिव्यक्तीचा अतिरेकही होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. कारण साहित्याच्या प्रांताची तशी परंपरा आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

# सत्ताबदलाची आशा की नवी निराशा?

**प्रा. जयसिंग यादव**

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह (बालेन शाह) यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले.

आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.



नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळमधील सद्यस्थिती ही दक्षिण आशियातील तरुण पिढीच्या आक्रोशाचे आणि लोकशाही व्यवस्थेकडून असलेल्या अवास्तव अपेक्षेचे प्रतीक आहे. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वांत मोठी हमी असू शकते. नेपाळने गेल्या काही वर्षांमध्ये दक्षिण आशियातील सर्वाधिक वेगाने बदलणारे राजकारण अनुभवले आहे. शाह यांच्या नेतृत्वाला मोठा जनाधार मिळाला; मात्र अवघ्या काही महिन्यांमध्ये त्याच तरुणांपैकी मोठा वर्ग रस्त्यावर उतरला आहे. ज्यांनी बदलाची स्वप्ने पाहून नव्या नेतृत्वाला सत्तेपर्यंत पोहोचवले, तेच आता सरकारच्या विरोधात उभे राहिल्याने नेपाळच्या लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अलिकडील आंदोलनाची ठिणगी एका तरुणाच्या आत्मदहनाच्या घटनेतून पडली असली, तरी त्यामागे दीर्घकाळ साचलेला सामाजिक आणि राजकीय असंतोष आहे. भूमिहीनांच्या बेदखलीच्या कारवाया, पोलिसांच्या कथित कठोर वर्तनाविरोधातील नाराजी आणि शासनाच्या निर्णयप्रक्रियेबद्दलचा रोष एकत्र येत आंदोलनाचे व्यापक रूप घेत गेले.

शाह यांचा उदय हा नेपाळच्या पारंपरिक राजकारणावरील अविश्वासाचा परिणाम होता. दीर्घकाळ सत्तेत राहूनही प्रमुख पक्ष बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई आणि प्रशासनातील अकार्यक्षमता दूर करू शकले नाहीत. त्यामुळे 'सोशल मीडिया'वर सक्रिय, थेट संवाद साधणारे आणि पारंपरिक राजकीय घराण्यांपासून दूर असलेले शाह हे बदलाचे प्रतीक बनले. निवडणुकीतील त्यांचा विजय हा केवळ राजकीय नव्हता, तर नेपाळमधील तरुणांच्या अपेक्षांचा विजय मानला गेला; मात्र सत्ता मिळवणे आणि सत्ता चालवणे यात मोठा फरक असतो. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारकडून लोकांच्या अपेक्षा अत्यंत मोठ्या होत्या. भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर कारवाई, पारदर्शक प्रशासन, रोजगारनिर्मिती, सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा आणि सामाजिक न्याय या आघाड्यांवर जलद परिणाम दिसतील, अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात प्रशासनातील जटिलता, आर्थिक मर्यादा आणि धोरणात्मक अडथळ्यांमुळे अपेक्षित वेगाने बदल घडू शकले नाहीत. यामुळे समर्थकांमध्येच निराशा वाढू लागली. नेपाळमधील सध्याचे आंदोलन ही केवळ एका घटनेविरोधातील प्रतिक्रिया नाही. ते विश्वासभंगाचे आंदोलन आहे. लोकशाहीत जनतेचा पाठिंबा कामगिरीवर टिकून राहतो, हे या घटनांमधून स्पष्ट होते. नेपाळमध्ये बेरोजगारी हे अजूनही मोठे आव्हान आहे. मोठ्या प्रमाणावर नेपाळी युवक रोजगारासाठी परदेशात जात आहेत. देशांतर्गत उद्योग आणि गुंतवणुकीचा वेग अपेक्षेइतका वाढलेला नाही. महागाई, अतिक्रमण हटवण्याच्या मोहिमांमुळे अनेक कुटुंबांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वांत मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# मधमाशी निसर्गाची अमूल्य देणगी

पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने पर्यावरणातील विविध घटकांवरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे मानवाच्या आहारामधील अन्नसाखळीवरही होणारे दुष्परिणाम आता समोर येऊ लागले आहेत. ते एवढे गंभीर आहेत की, संपूर्ण मानवजातीला ते अभिशाप ठरू शकतात. त्यातील एक अभिशाप म्हणजे नष्ट होणारी मधमाशी. मानवाच्या अन्नसाखळीमधील महत्त्वाचा दुवा असणारी मधमाशी एक लहानसा कीटक जरी दिसत असला तरी त्याच्या अफाट कार्याची आम्हाला माहिती नाही. मधमाशी ही निसर्गाची अनमोल देणगी असून, मानवजातीच्या अस्तित्वासाठी मानवानेच तिचे रक्षण करणे प्रथम कर्तव्य ठरते. अल्बर्ट आईन्सटाईन यांनी म्हटले आहे की, 'ज्या दिवशी पृथ्वीवरून मधमाशा नष्ट होतील, त्यानंतर चार वर्षांमध्ये मानव जात नष्ट होईल'. हे त्यांचे विधान मधमाशांचे पर्यावरणामधील महत्त्व अधोरेखित करते. मधमाशी केवळ मध देणारे कीटक नसून, आपल्या पर्यावरणाचा मुख्य आधारस्तंभ आहे. फुलांमधून मध गोळा करताना होणारे परागीभवन ही प्रक्रिया मुख्यतः मधमाशांद्वारे पार पाडली जाते. मानवाची अन्नसाखळी आणि जैवविविधता टिकवून ठेवणे ही त्यांची सर्वाधिक मोठी कामगिरी आहे. एकप्रकारे मानवजातीसाठी निसर्गाने दिलेले एकप्रकारचे वरदान म्हणावे लागेल. पीक आणि फूलझाडांच्या पुनरुत्पादनासाठी निसर्गामधील मधमाशांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आपल्या अन्नाच्या शोधात मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उडतात. या क्रियेमध्ये फुलांचे परागकण त्यांच्या अंगाला चिकटतात आणि नंतर ते एका फुलावरून दुसऱ्या फुलावर पसरतात. या नैसर्गिक प्रक्रियेमुळे वनस्पतीमध्ये फळधारणा व बियाणे तयार होतात.

संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या अहवालानुसार जगामधील जवळपास एक तृतीयांश अन्न उत्पादन हे मधमाशांच्या परागीभवनावर अवलंबून आहे. फक्त मानवजातच नव्हे तर जंगलामधील वन्यजीव आणि पक्ष्यांसाठी लागणारे फळे, बिया, फुले यासारखे अन्न हे त्यांच्यामुळेच तयार होते. त्यामुळे मधमाशांचे अस्तित्वच संपले तर वनस्पतीचे पुनरुत्पादन थांबून या भूतलावरच्या अनेक प्रजाती नष्ट होतील. सध्या नेमकी याच दिशेने आपली वाटचाल सुरू आहे. सेंद्रिय शेतीवरून रासायनिक शेतीकडे वळल्यानंतर हा प्रश्न अधिक गंभीरतेने समोर आला आहे. तो दिवसेंदिवस अधिक बिकट होत आहे. या आधुनिक युगामध्ये झालेल्या पर्यावरणामधील बदल हा मधमाशांसाठी अतिशय घातक आहे. त्यामुळे निसर्गामधील मधमाशांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने कमी होत आहे. मानवजातीने भविष्यासाठी हा विषय गंभीरतेने न घेतल्यास त्याचे अतिशय घातक परिणाम आम्हाला भोगावे लागू शकतात. आजच्या आधुनिक युगामध्ये मानवाने आपल्या स्वार्थासाठी निसर्गाचा समतोल पार बिघडवला आहे. शेतीमध्ये रासायनिक खते आणि विषारी कीटकनाशकांचा अनिर्बंध वापर केला जात आहे. याचा थेट विषारी परिणाम मधमाशांवर होत आहे. तसेच अमाप जंगलतोडीमुळे मधमाशांचे नैसर्गिक अधिवासही नष्ट होत आहेत. मधमाशी म्हटले की, तिच्यापासून फक्त मधच मिळतो, हीच भावना लोकांच्या मनामध्ये घर करून बसली आहे. त्यांचे मुख्य कार्य परागसिंचन करणे हे अजूनही दुर्लक्षितच आहे. मधमाशा हे प्रदूषित परिसरामध्ये आपले पोळे बांधत नाही. त्यांना प्रदूषणमुक्तच जागा लागते. त्यामुळे मधमाशांचे पोळे हे स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध जैवविविधतेचे निर्देशक समजले जाते. मधमाशांची निर्मिती ही मनावर अनंत उपकारापैकी एक आहे. त्याची आम्हाला अजूनही साधी जाणीव झाली नाही. जगामध्ये दररोज फुटणारी लाखो टन बारुद, वाढणारी सिमेंटची जंगले, विषारी रसायनांचा झालेला अतिरेक त्यामुळे मधमाशांचा अधिवास दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. याकडे अजूनही फारसे गांभीर्याने बघितले जात नाही, हे एक कटुसत्य आहे. त्यामुळे मधमाशांचा अंत हा मानव जातीचा अंत आहे, हे पक्के ध्यान्यात ठेवले पाहिजे. पर्यावरणाचा समतोल राखून जर आम्ही वाटचाल केली तर मधमाशांचे निसर्गचक्र कायम ठेवण्यात मानवच हातभार लावू शकतो. निसर्गचक्रामध्ये मानवी हस्तक्षेप किती दिवस निसर्ग सहन करणार आहे. त्यास असेच जर सतत ओरबाडत राहिले तर त्याच्या कोपाला मानवच बळी पडणार आहे. त्यामुळे वेळीच सावरून निसर्गाशी केलेली मैत्री मानवाच्या कल्याणाचा मार्ग मोकळा करू शकते. ■

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# वस्त्रोद्योगातील कौशल्य आणि करीअरच्या संधी

**दत्तात्रेय आंबुलकर**

आज जागतिक स्तरावर भारतातील तयार कपडेनिर्मिती उद्योगाने व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. यासंदर्भातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, भारतातील तयार कपड्यांच्या कौशल्यासह त्याला लाभलेली भारतीय धर्तीच्या कलाकुसरीने जगालाही भुरळ घातली. यामागे देशांतर्गत विविध शैलीच्या कलेची व कारागिरीची या व्यवसायाला परंपरागत स्वरूपात लाभलेली साथ आजही कायम असून, भारतीय तयार कपडे उद्योगाला अधिक रंगतदारच नव्हे, तर अर्थपूर्ण बनवत आहे.

सकृद्दर्शनी व संख्यात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, भारतातील तयार कपडे उद्योगाचे देशाच्या 'सकल घरेलू उत्पादन' म्हणजेच 'जीडीपी'मध्ये २.३ टक्के, तर देशांतर्गत एकूण औद्योगिक उत्पादन क्षेत्रात १३ टक्के एवढे उल्लेखनीय योगदान आहे. मुख्य म्हणजे, भारताच्या एकूण निर्यातीमध्ये तयार कपड्यांच्या निर्यातीचे प्रमाण १२ टक्के एवढे आहे. राष्ट्रीय स्तरावरील रोजगार-संख्येच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, या उद्योगात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरूपात काम करणाऱ्या कामगार-कारागिरांची संख्या ४५ दशलक्षच्या घरात आहे. यावरूनसुद्धा या भारतीय व्यवसायाची वैश्विक व्यापकता स्पष्ट होते. याचाच परिणाम म्हणजे, विद्यार्थ्यांपासून व्यावसायिकांपर्यंत साऱ्यांसाठी आज तयार कपडे हे क्षेत्र आकर्षणाचा विषय ठरला आहे. यालाच नव्याने जोड मिळाली ती सरकारच्या सकारात्मक धोरणांची! त्यामुळे तयार कपडे बनविण्याच्या व्यावसायिक प्रक्रियेला मोठी व वाढती बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजा समजून घेऊन तयार कपड्यांना नवे व आकर्षक रूपडे प्राप्त झालेले दिसते. मुख्य म्हणजे, या व्यवसाय क्षेत्रातील ग्राहकीला वयोमर्यादेचे असे बंधन नसते. त्यामुळे ग्रामीण-शहरी, गरीब-श्रीमंत अशा सर्व गट आणि वयोगटांतील ग्राहकांना तयार कपड्यांची बाजारपेठ केवळ सामावूनच घेते असे नव्हे, तर सतत आकर्षितसुद्धा करते.

परिणामी, आज फार मोठ्या संख्येने युवकांपासून महिलांपर्यंत तयार कपडे क्षेत्राकडे स्वाभाविकपणे आकर्षित होत आहेत. याला या व्यवसाय क्षेत्रातील विशेष शिक्षण-प्रशिक्षण क्षेत्राची विशेष साथ लाभली आहे. या क्षेत्रातील वाढत्या व नव्या व्यावसायिक गरजा लक्षात घेऊन 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन मॅनेजमेंट' अंतर्गत 'डिपार्टमेंट ऑफ फॅशन मॅनेजमेंट स्टडीज'ची स्थापना करण्यात येऊन त्याद्वारे नव्या विद्यार्थ्यांशिवाय या क्षेत्रात काम करणाऱ्या कारागिरांना विशेष प्रशिक्षण, मार्गदर्शन केले जाते. यामुळे शिक्षार्थींच्या ज्ञान आणि कौशल्यात तर भर पडतेच. शिवाय, त्यातून नव्या व आकर्षक स्वरूपाच्या कपडेनिर्मिती व निर्यातीला चालना मिळू लागली आहे, हे विशेष. यामध्ये आता तयार कपड्यांच्या किरकोळ व ठोक निर्मितीद्वारे त्यांची फायदेशीर विक्री करण्याच्या दृष्टीने विक्री-व्यवसायाचे विशेष मार्गदर्शन केले जाते.



अशाप्रकारे तयार कपडेनिर्मिती व्यवसायाचा आता नवे व आकर्षित करीअर क्षेत्र म्हणून प्राधान्याने विचार केला जाताना दिसतो. या क्षेत्राचा अभ्यासक्रमासह विचार करणे महत्त्वाचे ठरते. या व्यवसायामध्ये नावीन्य, वेगळेपण-विविधतेसह आकर्षकता या बाबी फार महत्त्वाच्या ठरतात. त्यातही कपड्यांच्या फॅशन पद्धतीला नेहमीच सर्वाधिक महत्त्व व पसंती देण्यात आली असल्याने त्याचा विविध अभ्यासक्रमांतर्गत प्रामुख्याने विचार करणे आवश्यक ठरते.

वर नमूद केल्याप्रमाणे फॅशन डिझाईन-टेक्नॉलॉजी व व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी-उमेदवारांना खालीलप्रमाणे करीअर पर्याय उपलब्ध असतात व त्यांच्या कामकाजाचे स्वरूप सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे असते :

**फॅशन व रिटेल मॅनेजर** : तयार कपड्यांच्या व्यवसायवाढीसाठी विक्री केंद्रांचे नियोजन करून विक्री व्यवस्थापनाला चालना देणे.

**ब्रॅण्ड मॅनेजर** : तयार कपड्यांच्या व्यवसाय क्षेत्रात नावीन्य, फॅशन व विविधता यांच्याच जोडीला विशिष्ट व्यावसायिक कंपनीच्या वैशिष्ट्यांची ग्राहकांकडून आवर्जून दखल घेण्यासाठी विशेष चिन्हासह व्यावसायिक पृष्ठभूमीची निर्मिती व जतन करणे आवश्यक असते. यामध्ये दर्जेदार सातत्य राखण्यासाठी 'ब्रॅण्ड मॅनेजमेंट'ची नेहमीच गरज असते.

**विक्री-नियोजन व्यवस्थापक** : विविध प्रसंग, सणवार एवढेच नव्हे, तर ऋतू-कालमानानुसार तयार कपड्यांचे उत्पादन व त्याच्या वितरण-विक्रीचे नियोजन करावे लागते.

**मागणी-पुरवठा विभाग व्यवस्थापक** : कपड्यांची प्रत्यक्षात होणारी विक्री, चोखंदळ ग्राहकांची पसंती, विशिष्ट प्रकारच्या मालाला मिळणारा प्रतिसाद या साऱ्यांचा अभ्यास करून, पुरवठाविषयक धोरण आखून, त्याची नियोजनबद्ध स्वरूपात अंमलबजावणी करणे.

**ऑनलाईन विक्री-व्यवस्थापन** : सध्याच्या परिस्थितीत भौगोलिकदृष्ट्या दूरवरच्या ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी 'ई-कॉमर्स' पद्धतीच्या माध्यमातून विक्री व्यवसायाचे नियोजन व व्यवस्थापन करणे.

**कलाकुसरीसह काम करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देणे** : तयार कपड्यांच्या उत्पादन-विक्री व व्यवस्थापनामध्ये नावीन्यपूर्ण व कलात्मकतेला सर्वाधिक वाव असतो. यामध्ये विविधता व सातत्य आणण्यासाठी छोटेखानी पद्धतीने, पण कलात्मक स्वरूपात कपडे तयार करणाऱ्या कारागीर-उद्योजकांना प्रोत्साहन व मार्गदर्शन करणे.

**आर्थिक विक्री व्यवस्थापन** : याशिवाय, तयार कपड्यांच्या वितरण-विक्री वाहतूक व व्यवस्थापनाद्वारे रोजगारनिर्मिती होऊ शकते.

तयार कपडे क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या विविध संधींचा करीअर-व्यवसाय वा उद्योजकता क्षेत्रात लाभ घेण्यासाठी विविध शैक्षणिक पात्रता व वयोगटांतील स्त्री-पुरुषांना संधी उपलब्ध होऊ शकते. उद्योजक म्हणून स्वतःचे वा आपल्या सहकाऱ्यांसह काम सुरू करायचे असल्याने मर्यादित भांडवलासह व्यवसाय सुरू करता येतो. मात्र, त्यासाठी संबंधितांनी आपल्या कौशल्याला कल्पक-कलात्मकतेची जोड दिल्यास प्रयत्नांती यश सहजशक्य होते. ■

**(लेखक एचआर व्यवस्थापन आणि सल्लागार आहेत.)**

९८२२८४७८८६

### पदपथ कोणासाठी?

आपणास प्रत्येक ठिकाणी पदपथावर अनेक विक्रेते दिसतात. फळ, भाज्या, इतर वस्तूंचे ठेले लावलेले असतात आणि त्याभोवती वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची असते. त्यामुळे पदपथावर चालणे अवघड होते. तसेच प्रत्येक ग्राहक पदपथावर आपले वाहन लावतो. रस्त्याच्या कडेला चारचाकी वाहने लागलेली असतात. चालणाऱ्या माणसाने रस्त्याने चालायचे कसे असा प्रश्न ज्येष्ठ नागरिकांना पडत आहे. चालताना दुसऱ्या माणसांचा किंवा वाहनाचा धक्काही ज्येष्ठ नागरिकाला लागतो. महानगरपालिकेने चालणाऱ्यासाठी पदपथ रिकामे ठेवण्याची सोय करावी. पदपथ हे वस्तू विक्रीसाठी नसून लोकांना चालण्यासाठी असतात हे सांगण्याची आता वेळ आलेली आहे. त्वरित महानगरपालिकेने दखल घेऊन पदपथावरील ठेले हटवावेत. तसेच वाहन पार्किंगची व्यवस्था नीट करावी. त्यासाठी फलक लावावेत. रस्त्यात कुठेही उभ्या असणाऱ्या वाहनचालकाला दंड करावा.

**व्यंकटेश देशमुख**/ ९७६२२६८८२२

### पुणे व्हावे हरित पुणे

पूर्वी पुणे पेन्शनरांचे जसे शहर होते, सायकलींचे शहर होते तसेच ते टेकड्यांचेही शहर होते. हवा शुद्ध होती. रहदारी कमी होती. प्रदूषण नावाला नव्हते. अनेक निवृत्तिधारकांचे स्वप्न असे की पुण्यात स्थायिक व्हावे. चतुःशृंगी टेकडी, हनुमान टेकडी, वेताळ टेकडी, पर्वती, तळजाई टेकडी या आणि अशा अनेक टेकड्यांनी पुणे शहर वेढलेले होते आणि आजही या टेकड्यांवरील वनराई संपूर्ण पुण्याला ऑक्सिजन पुरवते. लोकवस्ती वाढली आणि पुण्यातील या टेकड्यांच्या उतारावर बांधकामे वाढली. जुने पुणे ज्यांनी पाहिले आणि अनुभवलेले आहे त्या सर्वांना याची कल्पना येईल. पुण्यातील रस्त्यांवर व पुण्यातून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी मोठमोठाले वृक्ष होते. गणेशखिंड रस्ता, कात्रज रस्ता, सिंहगड रस्ता, पुणे-मुंबई रस्ता, नगर रस्ता या व अशा अनेक रस्त्यांवरील वृक्ष पांथस्थांना सावलीसोबतच ऑक्सिजनही देत होते. या रस्त्यांवरून जाताना अजिबात थकवा येत नसे. शेतकी महाविद्यालयाचा रस्ता आजही थंडावा देत आहे. मात्र अनेक रस्त्यांवर विकासाच्या नावावर पुण्यात प्रचंड वृक्षतोड झाली आहे. मे महिन्यात पुण्यावरून अहिल्यानगरकडे जाताना प्रकर्षाने जाणवले. या रस्त्यावर तर औषधालाही झाड दिसत नाही. सोलापूरकडे जाताना वडाचे मोठमोठे वृक्ष होते. अनेक चित्रपटात या रस्त्याची चित्रीकरणे झाली आहेत. अशीच स्थिती अनेक रस्त्यांवर आढळते. भर उन्हातून जाताना थोडा विसावा घ्यायचा म्हटले तरी साधी सावली मिळत नाही. नवीन रस्ता तयार करताना असो किंवा रस्ता रुंदीकरण करताना असो रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षारोपण बंधनकारक करावे. या पावसाळ्यात वृक्षलागवड योजना प्रभावीपणे राबवावी. अनेक सामाजिक संस्था झाडे लावण्याचे व त्यांचे संगोपन करण्याचे काम करीत आहे. या संस्थांना बळ देणे, त्यांच्या कामात सहभाग घेणे व आपलाही खारीचा वाटा उचलणे हे पुणेकरांचे कर्तव्य आहे. आपले पुणे स्वच्छ पुणे, सुंदर पुणे यासोबतच हरित पुणे अशी पुण्याची ओळख पुणेकरांना नक्कीच सुखावून जाईल.

**सुदाम कृष्णाजी विश्वे**/
पुणे. ९८६०५८६१४७

## वाचक पत्रे

■■■

### उद्धव ठाकरेंनी अन्य मंदिरांच्या मुक्ती आंदोलनात पुढाकार घ्यावा

रामनगर राममंदिरात रामरक्षा, भीमरूपी, गणपती, रामराय, मारुती यांच्या आरत्या झाल्या. शिवसैनिक मंदिरात पूर्णपणे शिस्तीत वागले. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे राममंदिरातील मूर्ती पाहून भारावून गेलेले दिसले. या मूर्ती शिवाजी महाराजांचे गुरू रामदास स्वामी यांच्या चाफळ मंदिरातील मूर्तींसारख्या आहेत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गोविंदराव पुराणिक जयपूरला गेले असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजी पण तेथेच होते. श्रीगुरुजींनी या मूर्तींची निवड केली होती. हे राम मंदिर १९५८ला धरमपेठेतील तेव्हाच्या रामभक्तांनी लहान स्वरूपात बांधले. आज केवळ लोकसहभागातून सध्याचे भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. स्थापन झाले तेव्हाच्या मूर्ती अच्युत महाराजांचे शिष्य रामनगरचे राजाभाऊ देशपांडे यांच्याकडे आहेत.

सध्याच्या मूर्ती १९६५ साली स्थापित करण्यात आल्या आहेत. एक रामभक्त म्हणून माझी तुमच्या शिवसेनेकडून वैयक्तिक अपेक्षा आहे की आपण काशी विश्वनाथ मंदिर, श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिर मुक्ती आंदोलनात पुढाकार घ्यावा. 'अयोध्या तो झाकी है, काशी, मथुरा बाकी है' हे सिद्ध करावे, अशी माझी विनंती आहे. ■

**रवि वाघमारे**/९९६००१८०३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### आषाढीनिमित्त दीपक कलढोणे यांचा शांतीब्रह्म कार्यक्रम

**सोलापूर, दि. २० जुलै-**



दीपक कलढोणे यांच्या या सेवाकार्याला यंदा २० वर्षे पूर्ण होत असून, या निमित्ताने आषाढी एकादशीच्या पर्वावर विशेष 'शांतीब्रह्म' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दुर्वांकुर चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित हा कार्यक्रम शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जुळे सोलापूर येथील गोविंदश्री मंगल कार्यालयात होणार आहे. कार्यक्रमात संत एकनाथ महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित निरूपण तसेच अभंग आणि गवळण गायनाचा सुरेल कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. ज्येष्ठ पत्रकार व संतसाहित्य अभ्यासक अरविंद जोशी हे संत एकनाथांच्या जीवनकार्याचे निरूपण करणार आहेत. या कार्यक्रमात दीपक कलढोणे यांच्यासह नीरज कलढोणे, वर्धराज मिर्जी, जयंत जोशी, डॉ. पं. सचिन कचोटे (कोल्हापूर), प्रसाद कुलकर्णी, दिलीप पोतदार, अनंत जोशी, नागराज शेट्टी, निरंजनी कलढोणे, महेश जाधव आणि परिणिता कुलकर्णी हे कलाकार साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्रचे झोनल मॅनेजर मिथिलेशकुमार पांडे, दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कुलकर्णी, रविंद्र देशमुख, शिवाजी सुरवसे, माजी स्थायी समिती सभापती शिवा बाटलीवाला, डॉ. सुरेश व्यवहारे, डॉ. नयना व्यवहारे, उद्योजक महावीर श्रीधर गुंडाळे, गिरीश माळवदे, संजय अजनसोंडकर तसेच ऑटोमोबाईल संशोधक राहुल बुऱ्हाणपुरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. आषाढी एकादशीच्या भक्तिमय वातावरणात आयोजित या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन दुर्वांकुर चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. जगदीश पाटील आणि उद्योजक वैभव सुरवसे यांनी केले आहे.

### सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे स्मृती वक्तृत्व स्पर्धा ८ ऑगस्टपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै -**
दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, जुळे सोलापूर आणि श्री. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठाण यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे अण्णा स्मृती सोहळ्यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ८ ते १७ ऑगस्ट २०२६ दरम्यान पार पडणाऱ्या या स्मृती सोहळ्याअंतर्गत शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमधील वक्तृत्वगुणाला प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. ही स्पर्धा १० ऑगस्ट २०२६ रोजी कॉलेज ऑफ फार्मसी जुळे सोलापूर येथे मराठी माध्यमातून होणार आहे. यामध्ये सोलापूर शहर, तसेच दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील इयत्ता ८ वी ते १० वी मधील शालेय विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. एका शाळेतून जास्तीत जास्त तीन विद्यार्थ्यांना यात भाग घेता येईल. स्पर्धेत वक्तृत्वासाठी ५ ते ७ मिनिटांचा कालावधी देण्यात आला असून 'सार्वजनिक स्वच्छता व माझे कर्तव्य', 'वाहतूक समस्या व नागरिकांची जबाबदारी', 'वाचन संस्कृतीचे महत्त्व', 'माझा आवडता शास्त्रज्ञ' आणि 'सोलापुरातील स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्म्यांचे योगदान' हे विषय निश्चित करण्यात आले आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शाळा मुख्याध्यापकांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी २ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रा. डॉ. योगेश थोरात (९८२२८२९४०४) किंवा प्रा. सोमनाथ पाटील (९२२५२४५५६६) यांच्याशी संपर्क साधावा.

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक दीक्षान्त् समारंभ -२०२६**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २५ वा दीक्षान्त् समारंभ, दिनांक २८/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक येथे आयोजित केला जाण्याचे प्रस्तावित आहे. यासंबंधी तपशीलवार परिपत्रक क्रं. ५१/२०२६ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.muhs.ac.in) उपलब्ध आहे.
नाशिक :२१/०७/२०२६
सही/-
डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
कुलसचिव

# पंढरपुरातील वाखरीत गुरुवारी श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा

## वारकऱ्यांसाठी अभिनव उपक्रम; भारूड व गवळणी स्पर्धाही होणार



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, २० जुलै-**
विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, २३ जुलै रोजी दुपारी १.३० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा आयोजित केली आहे.

ही स्पर्धा वाखरी, पंढरपूर येथील पालखी तळाच्या शेजारी विश्वशांती गुरुकुल परिसरात होणार आहे. ही स्पर्धा २५, ३५, ४५, ५५, ६५ वर्षेखालील आणि ७० वर्षांवरील गटात होईल. प्रथम तिघांना २ हजार ८ हजारापर्यंत रोख पारितोषिके देण्यात येतील १६ ते २५ वयोगटातील विजेत्यास 'कुमार वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार, ५६ ते ६५ वयोगटातील विजेत्यास 'वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार आणि ७० वर्षांच्या पुढील विजेत्यास 'ज्येष्ठ वारकरी कुस्ती महावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. विजेत्या कुस्ती महावीरांचा सन्मान-मानाचा फेटा, माऊलींची/जगद्गुरुंची प्रतिमा, शाल, स्मृतिचिन्ह, सुवर्ण/रौप्य/कांस्य पदक व रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरव करण्यात येणार आहे.

विशेष आकर्षण म्हणजे योगमहर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृति प्रित्यर्थ तंदुरूस्त अशा सत्तर (७०) वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी आगळी-वेगळी कुस्ती स्पर्धा होईल. महाराष्ट्रातील लोककलेला संजीवनी मिळावी म्हणून याच दिवशी रात्री ८ ते ११ वाजेपर्यंत, वारकऱ्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराजांचे प्रसिध्द असलेले नाथांचे भारूड व गवळणी यांच्या स्पर्धा घेण्यात येईल.

आयोजित स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वारकरी मल्लांनी २३ जुलै रोजी सकाळी ७.३० वा. विश्वशांती गुरूकुलच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ आपली नावे नोंदणी करावी. सोबत वयाचा पुरावा म्हणून आपले आधार कार्ड किंवा शासनमान्य ओळखपत्र ठेवावे. अधिक माहितीसाठी प्रा. विलास कथुरे मो. नं. ९८५०२११४०४ अथवा पै. राहुल बिराजदार मो. नं. ८००७५९३४३४ यांच्याशी संपर्क साधावा. वारकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड व वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे यांनी केले आहे.



### गांधी नाथा रंगजी विद्यालयात आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै -**
गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जन मंगल प्रतिष्ठान संचालित गांधी नाथा रंगजी विद्यालयात २० जुलै रोजी आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिवस संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला.

याचे उदघाटन प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिटी, माध्यमिक विभागाच्या स्मिता रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आंतरवर्गीय बुद्धिबळ स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी पंच म्हणून क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांनी काम पाहिले.विजेते खेळाडू धनश्री निकते, सनिदी उकी, अनुष्का सुपाते, प्राची लिंबितोटे, प्रियदर्शनी जगताप, अंश पुकाळे, तनय शहा, सिद्धार्थ कांबळे, बापू शिरखाने या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी अनुष्का सुपाते यांनी केले. प्रियदर्शनी जगताप यांनी आभार मानले.

**SHRI.A.P.D.JAIN PATHASHALA**
Ashok Chowk, Solapur.413006
Ph. 0217-2655222 Email id - witstore.solapur@gmail.com

**E- TENDER NOTICE**

**E- Tender for supply of Double Seater Desk**

The Details of Double Seater Desk are mentioned in the tender document. Tender form & Terms and Conditions are available on form with terms & Conditions may be downloaded from www.sapdjpathashala.com. Right to accept or reject any or all tender without giving any Reason is reserved with the Trust authority.

Hon. Secretary.
SHRI.A.P.D.JAIN PATHASHALA, SOLAPUR.
(Walchand Group of Education)

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी व आसपासचे लोकांना आमचे अशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व नोटीस देण्यास सांगितलेवरून या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की,

जि. सोलापूर सब जि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील प्लॉट जागा याचा जुना गट नं. ९२८ चा नविन गट नं. ९३४/१/५ पैकी प्लॉट नं. ५ याचे अकृषिक क्षेत्र बिनशेती ०२ आर ७८.६९ चौ.मी. (क्षेत्रफळ ३००० चौ.फुट), याचा बिनशेती आकार १३ रु. ९३ पैसे आहे. याची लांबी दक्षिण - उत्तर - मी. १८.२९ ( ६० फुट ) आहे व रुंदी पूर्व - पश्चिम मी. १५.२४ ( ५० फुट ) आहे. यांसी चतुःसिमा पुर्वेस - प्लॉट नं. ४, दक्षिणेस- बार्शी - परंडा रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं. ६ व उत्तरेस - प्लॉट नं. १३ आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक बांधकामासहीत प्लॉट जागा आतील खोल्या व सर्व तदंगभूत वस्तु व वहीवाटीचे हक्कासह.

वर नमूद बांधकामासहीत प्लॉट जागा ही अताऊर रहेमान सिकंदर हन्नुरे, वगैरे ६ त्यांना वारसाहक्काने मालकीस आलेली असून सदर प्लॉट जागेची प्रत्यक्ष कब्जे वहीवाट त्यांची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल आहे. सदर बांधकामासहीत प्लॉट जागा अताऊर रहेमान सिकंदर हन्नुरे, वगैरे ६ त्यांनी आमचे अशिलास खरेदी देणेचा ठराव केलेला आहे व आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट जागा मालकांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलास दिलेला आहे. या उपरही वर नमूद प्लॉट जागा मिळकतीशी इतर कोणाचाही खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा इजमेंटरी राईट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क, अधिकार, हिस्सा व हित संबंध असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधितांनी खालील नमूद पत्त्यावर संपर्क साधून त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करून द्यावी अथवा तक्रार वा हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार वा हरकत न आलेस आमचे अशिल कोणाची काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वर नमूद बांधकामासहीत प्लॉट जागा मिळकतीबाबत ठरावाप्रमाणे वर नमूद प्लॉट जागा मालकांशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून प्रस्तुत जाहीर नोटीस दिली. ता. २०/०७/२०२६

सही/-
अशिल

सही/-
ॲड. महंमद ए. लांडगे
ऑफिसः- महेंदी नगर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. नं. ८४४६४६१६६२
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे- बोरगांव (झाडी), ता.बार्शी येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की,

मौजे- बोरगांव (झाडी) येथील जमीन गट नं. ८९ पैकी उत्तरेकडील बाजूची जमीन क्षेत्र ०२ हे. १७ आर + पो.ख. ०० हे ०४ आर असे एकूण क्षेत्र ०२ हे २१ आर आकार ०२ रू. ९७ पैसे, ही जमीन, आमचे अशिलांचे वडिलांजित मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदर जमिनीबाबत लता रामेश्वर उर्फ रामभाऊ अडसूळ रा. म्हाडा कॉलनी, धाराशिव व त्यांच्या बहिणी कमल शहाजी जामदाडे आणि उमा गोविंद शिंदे वगैरे लोकांनी बार्शी येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ७५/२०१६ चा वाटपाचा दावा दाखल केला होता. सदर दाव्यातील हुकूमनाम्याचे दरखास्तीनुसार वर नमूद केलेले क्षेत्र वरील लोकांना वाटपाने गेलेले आहे.

सदर गटातच दक्षिणेकडील बाजूचे ०१ हे ३५ आर आकार ०१ रु. ८५ पैसे ही जमीन आमचे अशिलांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे. सदर लता अडसुळ वगैरे ३ लोकांनी सदरचे क्षेत्र विक्रीस काढले असल्याचे आमचे अशिलास नुकतेच समजले आहे.

सदरची जमीन आमचे अशिलांचे वडिलार्जीत मालकीची असल्याने, तसेच त्या गटात आमचे अशिलाचे वरील प्रमाणे क्षेत्र असल्याने, प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार, सदरची जमीन खरेदी घेण्याचा, आमचे अशिलास अग्रगण्य, प्रथम प्राधान्य, हक्क (Right of Pre-emption) होता व आहे.

सदरची जमीन आमचे अशिल हे चालू बाजार भावाप्रमाणे खरेदी घेणेस तयार होते व आहेत. परंतु वरील लोक मुद्दाम व खोडसाळपणाने आमचे अशिलास विक्री न करता, त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याबाबत अलहिदा आमचे अशिल कायदेशीर कारवाई करत आहेत. आमचे अशिलांनी बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डी. सो. यांचे कोर्टात त्यानुसार रे.मु.नं. २१०/२०२६ चा डिक्लेरेशन आज्ञार्थी ताकीद व निरंतर मनाईचा दावा दाखल केलेला आहे. सदरचे प्रकरण त्या मे. कोर्टात प्रलंबित आहे. सदरची माहिती लपवून ठेवून, दिशाभूल करून, सदरचे लोक सदर जमिनीची, विल्हेवाट लावण्याचे, विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत, त्यानुसार त्यांनी जोरदार खटाटोप चालु केलेला आहे.

तेव्हा सदर नोटीसेने कळविण्यात येते की, वर नमूद केलेली जमीन ही आमचे अशिलाचे वडिलाजीत मालकीची व कब्जे वहिवाटीची असल्याने, तसेच सदर गटात आमचे अशिलाचे मालकीचे क्षेत्र असल्याने, सदर जमीन खरेदी करण्याचा आमचे अशिलास अग्रगण्य हक्क असल्याने, तसेच सदर जमिनीबाबत वर नमूद केलेला दावा प्रलंबित असल्याने वरील लोकांशी, कोणीही गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, खरेदी, वहीवाटीचे हक्क, फेडपत्र, तसेच अन्य हस्तांतरणाचे स्वरूपाचे व्यवहार आणि कर्ज बोजाचे स्वरूपाचे व्यवहार करू नयेत, केलेस ते बेकायदेशीर व रद्दबातल होतील, तसेच आमचे आशिताचे हक्क हिश्सावर बंधनकारक राहणार नाहीत, तशा स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्यावर आमचे अशिल कायदेशीर कारवाई करतील मग खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच राहील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. कळावे ता. १८/०७/२०२६

सही/-
ॲड. श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)
ॲड. श्री. गुंड ए. एस. (लाडोळेकर)
ॲडव्होकेटस, बार्शी ''सदानंद'' ७३०/२/३७
विकास लक्ष्मण लंगोटे वगैरे
रा. झारेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
तर्फे ॲडव्होकेटस

**जाहीर नोटीस**

आमचे अशिल सौ. सायराबानू सलीम शेख, रा. ३६५, मारुती मंदीर जवळ, बापूजीनगर, उत्तर सदर बाजार, सोलापूर यांनी दिलेल्या अधिकारावरून या जाहीर नोटीशीने तमाम लोकांना विशेषतः ता. द. सोलापूर व ता. उ. सोलापूर येथील लोकांना कळविणेत येते की,

डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील ''कॉ. गोदूताई परुळेकर विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (क), ता. द. सोलापूर'' मधील सभासद नं. क-८९७ व क्लस्टर/घरकुल क्र. क-५७६/१ असे असून ही घरकुले या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदरहू संस्थेमध्ये शबनम सैफनसाब शेख यांना विडी कामगार म्हणून सभासद करून घेऊन रितसर सदर घरकूल अलॉट झालेला आहे, मात्र दरम्यान त्यांना म्हणजे शबनम सैफनसाब शेख यांना त्यांचे कौटुंबिक हॉस्पिटल खर्चाकरीता व इतर कारणासाठी रक्कमेची अति अत्यंत आवश्यकता होती, म्हणून वरील घरकूल त्यांनी विकण्यास काढलेला होता, त्यामुळे सदर घरकुल आमचे अशिलांनी शबनम सैफनसाब शेख यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेऊन त्याप्रमाणे आमचे अशिलांनी त्यांच्याकडून दि. २०/१०/२००३ रोजी स्टॅम्प अ.क्र. ६७४ ने घरकुल करारपत्र व दि. २०/१०/२००३ रोजी स्टॅम्प अ.क्र. ६७५ ने पोच पावती लिहून घेतलेली आहे. तेव्हापासून आजतागायत सदरची मिळकत आमचे अशिलांच्या मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून यावर इतर कोणाचेही मालकी हक्क व अधिकार नाही. सबब, सध्या आमचे अशिलांना सदर मिळकत रितसर संस्थेकडून दुसऱ्यांच्या नावाने ट्रान्सफर करून घ्यावयाचे आहे.

त्यामुळे त्यानंतर वरील सभासदांना म्हणजे शबनम सैफनसाब शेख यांना व त्यांचे कुटुंबियांना गेल्या अनेक वर्षापासून खूप शोधले असता ते अद्यापर्यंत मिळालेले नाही, तरी ते सोलापुरात नसून कुठे आहे याची कल्पना सुद्धा आमचे अशिलांना नाही. त्यामुळे आमचे अशिलांनी सदर संस्थेस असे हमीपत्र लिहून दिले आहे की, ''सदर मिळकत वर उल्लेख केल्याप्रमाणे करारपत्र व पोच पावती दस्ताद्वारे सदर संस्थेमध्ये त्यांनी सांगाल त्या व्यक्तीचे नावाने रितसर ट्रान्सफर करून मिळावी, त्यानंतर शबनम सैफनसाब शेख यांनी अथवा त्यांचे वालीवारसदार म्हणून कोणीही मिळकतीवर कायदेशीर मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध सांगण्यास वरील गृहनिर्माण संस्थेमध्ये आल्यास त्याची संपूर्णतः निवारणा आमचे अशिल हे स्वतःचे पदरखर्चाने दूर करून देणार आहेत'', अशा प्रकारचे हमीपत्राद्वारे व वरील परिस्थितीचा विचार करून वर नमूद संस्था / सोसायटी सदर मिळकत आमचे अशिल सांगाल त्या व्यक्तीचे नावाने रितसर संस्थेमध्ये ट्रान्सफर करण्यास तयार झाले आहे.

तेव्हा सदर आमचे अशिल सांगाल त्या व्यक्तीच्या नावाची नोंद वरील घरकुलच्या संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डला होण्यास कोणाचीही हरकती अथवा तक्रारी असल्यास त्याबद्दल त्यांनी खालील नमूद पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ८ (आठ) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत-तक्रार कळवावी. या मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास वर नमूद घरकुल आमचे अशिल सांगाल त्या व्यक्तीचे नावाने वरील संस्थेमध्ये रितसर ट्रान्सफर करण्यात येईल, त्यानंतर त्याबाबत कोणाचीही, कसलेही प्रकारचे तक्रार-हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिली. तारीख दि. १८/०७/२०२६

सही/-
ॲड. जगदीश व्ही. कोंडी
बी.एस.एल.,एलएल.बी,एम.एस.डब्ल्यू.
ॲडव्होकेट व नोटरी
रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर - ४१३००२
मो. नं. ९८६०२०५०७८
अशिल तर्फे ॲडव्होकेट

**बँक ऑफ महाराष्ट्र**
**आंचलिक कार्यालय, सोलापूर**
पहिला मजला, अग्रवाल पॅलेस, भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, पिन - ४१३००४

**कब्जा नोटीस - ब्रह्मपुरी शाखा**

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत आणि कलम १३ (१२) सह वाचित सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी यांनी कर्जदार श्री. अभिनंदन अमरसिंग राजपूत आणि सौ. योगिता अभिनंदन राजपूत यांना सदर कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत दिनांक ०४.०५.२०२६ रोजी मागणी नोटीस बजावली होती. त्याद्वारे नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु. ३१,३०,९९८.००/- (अक्षरी रु. एकतीस लाख तीस हजार नऊ शे अठ्याण्णव फक्त) अधिक मासिक आधारावरील अनाकलित व्याज, करारातील दरानुसार पुढील व्याज आणि दिनांक ०४.०५.२०२६ पासून प्रत्यक्ष भरणा होईपर्यंत होणारा इतर अनुषंगिक खर्च व शुल्क, नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे अवाहन करण्यात आले होते.

सदर कर्जदार व वर उल्लेख केलेले इतर व्यक्ती सदर रक्कम भरण्यास अपयशी ठरल्यामुळे, विशेषतः कर्जदार व वर नमूद इतर व्यक्तींना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली स्वाक्षरी करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) सह वाचित सदर नियमावलीच्या नियम ८ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १०.०७.२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार, इतर संबंधित व्यक्ती आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. असा कोणताही व्यवहार केल्यास तो बँक ऑफ महाराष्ट्र, ब्रह्मपुरी शाखेच्या रु. ३१,३०,९९८.००/- (अक्षरी रु. एकतीस लाख तीस हजार नऊ शे अठ्याण्णव फक्त) या रकमेच्या आणि त्यावर दिनांक ०४.०५.२०२६ पासून लागणाऱ्या करारातील दरानुसार पुढील व्याज व खर्चाच्या बोजाच्या अधीन राहील.

**मालमत्तेचे वर्णन**
श्री. अभिनंदन अमरसिंग राजपूत व सौ. योगिता अभिनंदन राजपूत यांच्या नावावरील गहाण मालमत्ताः प्लॉट नं. १२९/१/२/३/४/५, जुना सर्व्हे नं. ३०६/१ व ३०७/१, नवीन सर्व्हे नं. १५४/१ व १५३/१, विजयराज मनोर अपार्टमेंट, पहिला मजला, फ्लॅट नं. १०१, ज्याचे कार्पेट क्षेत्र ८४.४९ चौ. मीटर आणि बिल्ट-अप क्षेत्र १०१.३८ चौ. मीटर आहे, मौजे ग्रीन नगर, मजरेवाडी, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील मालमत्ता,

**ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेतः**
**उत्तर**: फ्लॅट नं. २०१, जिना आणि लिफ्ट
**दक्षिण**: मागची मार्जिन जागा आणि प्लॉट नं. १२६
**पूर्व**: बाजूची मार्जिन जागा आणि प्लॉट नं. १२८
**पश्चिम**: बाजूची मार्जिन जागा आणि प्लॉट नं. १३०

**दिनांकः १०.०७.२०२६**
**स्थळः सोलापूर**
शिक्का
सही/-
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ महाराष्ट्र

**CHANG IN NAME**

I hereby declare that in my school record my name recorded as Vashim Jafarsaheb Shaikh but in my birth certificate and adhaar card my name recorded as Vasim Jafar Shaik that the both names Vashim Jafarsaheb Shaikh & Vasim Jafar Shaikh both names are same and one person and both names are belongs to me.
Affi No. 2802/2026
Date -25/5/2026

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**पत्ता :- इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१**

जा. क्र.UCD/DAY-NULM/150 दिः- १६/०७/२०२६

**जाहीर प्रसिद्धीकरण ई - निविदा**

सोलापूर महानगरपालिका समाजविकास विभाग DAY-NULM/ अंतर्गत बेघरांना निवारा देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन कामाचे ई निविदा बाबत : TENDER ID: 2026_SMC_1318714_1 सदर कामाची निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईट वर दिः- २१/०७/२०२६ वेळ सकाळी १० पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

अुत्तम सेवा
मंगळवार
दि. २१ जुलै २०२६
## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **नॅशनल इंशोरन्स कं. लि., NICL** | | | |
| १ | सहाय्यक (५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०७/०८/२६ |
| **२)** | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १ | सेक्शन कंट्रोलर (११९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | १४/०८/२६ |
| **३)** | **इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन, IBPS** | | | |
| १ | प्रोबेशनरी ऑफिसर/ मॅनेजमेंट ट्रेनी (६७१५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | २१/०७/२६ |
| २ | आय.टी. ऑफिसर (३०१) | BE (कॉम्प्यु/आय.टी/इलेक्ट्रॉ/टेली) | ३० पर्यंत | |
| ३ | ॲग्री ऑफिसर (१९० पदे) | पदवी (कृषी/पशु/अन्न/डेअरी/मत्स्य) | ३० पर्यंत | |
| ४ | लॉ ऑफिसर (१०५ पदे) | पदवी (लॉ) उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| ५ | HR ऑफिसर (६० पदे) | पदवी व MSW/HR उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **४)** | **भारतीय रेल्वे, RRB** | | | |
| १ | टेक्निशियन III (६२३४ पदे) | दहावी व ITI (इले/इलेक्ट्रॉ/फिटर/ कार्पेंटर/पेंटर/प्लंबर/मोटार/वायरमन/ डिझेल/ट्रॅक्टर/मशिनिस्ट) उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २९/०७/२६ |
| २ | टेक्निशियन I (३२३ पदे) | BSc (इलेक्ट्रॉ/कॉम्प्यु/आय.टी) किंवा इंजिनियरींग डिप्लोमा उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | |
| **५)** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC (मुदतवाढ)** | | | |
| १ | लिपीक (१८६४ पदे) | पदवी व मराठी / इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | ३१/०७/२६ |
| २ | सहा. मोटार वाहन निरीक्षक गट - क (४६१ पदे) | पदवी / पदविका अभियांत्रिकी (ऑटो/मेकॅ) उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | |
| ३ | कर सहाय्यक (२८२ पदे) | पदवी व मराठी व इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ४ | तांत्रिक सहाय्यक (०३ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| ५ | उद्योग निरीक्षक (०९ पदे) | पदवी / पदविका (स्थापत्य) किंवा B.Sc. उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| **६)** | **भारतीय वायु सेना, IAF** | | | |
| १ | अग्निवीरवायु | बारावी (५०%) गणित विषयासह किंवा डिप्लोमा (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ/ ऑटो/कॉम्प्यु/आय.टी) उत्तीर्ण असावे. | २१ पर्यंत | २६/०७/२६ |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर.
वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org



# फेरान टोरेसचा विजयी गोल, स्पेनने जिंकला विश्वचषक



विश्वचषकासह विजयी गोल करणारा स्पेनचा फेरान टोरेस



स्पेनचा लॅमिन यामाल ट्रॉफीसह आनंद साजरा करताना

**न्यू यॉर्क, २० जुलै**

रविवारी न्यू यॉर्क न्यू जर्सी स्टेडियमवर झालेल्या फिफा २०२६ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात, स्पेनचा बदली खेळाडू फेरान टोरेसने १०६ व्या मिनिटाला गोल करून गतविजेत्या अर्जेंटिनावर १-० असा विजय मिळवून दिला.

सामन्याच्या बहुतांश भागात स्पेनचे वर्चस्व होते आणि अर्जेंटिनाचा खेळ सुमार दर्जाचा होता; अतिरिक्त वेळेत टोरेसने केलेल्या गोलमुळे स्पेनने १६ वर्षांनंतर आपला दुसरा विश्वचषक जिंकला. या पराभवामुळे अर्जेंटिनाचे सलग दुसऱ्यांदा व एकूण चौथ्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भंग झाले.

चेंडूवरील ताबा आणि गोल करण्याच्या प्रयत्नांच्या बाबतीत स्पेनचे पूर्ण वर्चस्व होते. सामन्याच्या ९३ व्या मिनिटाला एन्झो फर्नांडिसला रेड कार्ड मिळाल्यामुळे अर्जेंटिनाला १० खेळाडूंनिशी खळावे लागले. लिओनेल मेस्सी आणि अर्जेंटिनाने कसेबसे सामन्यात टिकून राहत सामना अतिरिक्त वेळेत नेला, पण त्यात अखेर १०६ व्या मिनिटाला टोरेसने गोल नोंदवून स्पेनला विजय मिळवून दिला. स्पेनने विश्वचषक जिंकला.

अतिरिक्त वेळेचा पूर्वार्धही गोलशून्यने बरोबरीत राहिल्यानतर टोरेसने स्पेनसाठी विजयी गोल केला आणि इथेच सांगता झाली.

**स्पेनचा विक्रम**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषकातील आठ सामन्यांमध्ये स्पेनने केवळ एक गोल स्वीकारला; विश्वचषक जिंकणाऱ्या कोणत्याही संघाचा हा सर्वात कमी गोल स्वीकारण्याचा विक्रम आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### पुढील फिफा विश्वचषक २०३० मध्ये


२०३० चा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेचे मुख्य यजमानपद स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्को भूषवतील. स्पर्धेच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त, उरुग्वे, अर्जेंटिना आणि पॅराग्वेमध्ये प्रत्येकी एक 'सुरुवातीच्या फेरीतील' सामना खेळविला जाईल आणि त्यानंतर उर्वरित सामने तीन मुख्य यजमान देशांमध्ये होतील. फिफाच्या प्रस्तावित वेळापत्रकानुसार, विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या शताब्दीनिमित्त ८ आणि ९ जून रोजी उरुग्वे, अर्जेंटिना आणि पॅराग्वेमध्ये विशेष सामने खेळविले जातील; त्यानंतर १३ आणि १४ जून रोजी मोरोक्को, पोर्तुगाल आणि स्पेनमध्ये स्पर्धेचे उद्घाटनपर सामने होतील. विश्वचषकाचा अंतिम सामना २१ जुलै रोजी होण्याची शक्यता आहे, मात्र फिफाने सामन्यांचे संपूर्ण वेळापत्रक अद्याप निश्चित केलेले नाही. फिफाच्या म्हणण्यानुसार, १९३० मधील पहिल्या विश्वचषकाचे यजमानपद भूषवल्याबद्दल उरुग्वेमध्ये एक सामना आयोजित केला जाईल, तर अर्जेंटिनामध्ये होणारा सामना त्या स्पर्धेतील उपविजेतेपदाची दखल घेणारा असेल. पॅराग्वेमध्येही एक सामना खेळविला जाईल, कारण तो 'कॉनमेबोल'चे मुख्यालय असलेला देश आहे; 'कॉनमेबोल' ही त्या काळी अस्तित्वात असलेली एकमेव खंडीय फुटबॉल महासंघ संस्था होती.



## एमबाप्पे - 'गोल्डन बूट', रॉड्री - 'गोल्डन बॉल'

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषकात फ्रान्सचा किलियन एमबाप्पे (१० गोल) 'गोल्डन बूट'चा, तर रॉड्री 'गोल्डन बॉल'चा मानकरी ठरला. गोलरक्षक उनाई सायमनने 'गोल्डन ग्लोव्ह'सह विश्वविक्रमही नोंदविला. पाऊ कुबारसीने 'सर्वोत्कृष्ट युवा खेळाडू'चा पुरस्कार जिंकला.

## मेस्सीचा गोल्डन बूटही गेला अन् बॉलही





**न्यू यॉर्क, २० जुलै**

दक्षिण अमेरिकन आणि युरोपियन चॅम्पियन्स यांच्यादरम्यानचा फिफा विशष्वचषकाचा हा एक 'ब्लॉकबस्टर' अंतिम सामना ठरेल अशी अपेक्षा होती, परंतु प्रत्यक्षात हा 'बचाव विरुद्ध आक्रमण' असा संघर्ष ठरला; यात गतविजेत्या अर्जेंटिनाने जिद्द दाखवली असली तरी त्यापलीकडे फारसे काही विशेष करता आले नाही. 'सुपर सब' फेरान टोरेसने स्पेनला आपला दुसरा विश्वचषक जिंकून दिला. लिओनेल मेस्सीचा हा कदाचित शेवटचा सामना ठरला, यात १० खेळाडू उरलेल्या अर्जेंटिनाला अतिरिक्त वेळेत १-० अशा निराशाजनक पराभवाचा सामना करावा लागला.

संघर्ष करणाऱ्या अर्जेंटिनाला ९० मिनिटांच्या खेळात एकही 'शॉट' मारता आला नाही आणि केवळ एमिलियानो मार्टिनेझच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे स्पेनला रोखणे शक्य झाले; या गोलकीपरने किशोरवयीन लॅमिन यामलची सामना जिंकून देणारी 'फ्री-किक' रोखून धरली. साखळी फेरीपासून ते उपांत्य फेरीच्या सामन्यापर्यंत अर्जेंटिनासाठी गोल करणाऱ्या स्टार लिओनेल मेस्सीला अंतिम सामन्यात एकही गोल करता आला नाही. स्पेनच्या बचाव फळीने ३९ वर्षीय स्टार मेस्सीला चांगलेच जखडून ठेवले. उपांत्य सामन्यात इंग्लंडचे हृदय तोडणाऱ्या संघाच्या तुलनेत अर्जेंटिनाचा खेळ अत्यंत सुमार दर्जाचा होता आणि त्यांना बरोबरी साधता आली नाही. ◂ (वृत्तसंस्था)

## कुशाग्र ओझाचे नाबाद शतक, भारत मजबूत स्थितीत

**कोलंबो, २० जुलै**

कोलंबो येथे सोमवारी सुरू झालेल्या दुसऱ्या 'युवा कसोटी'च्या पहिल्या दिवशी, वाईट प्रकाशामुळे खेळ लवकर थांबवावा लागला. त्याआधी, श्रीलंकेविरुद्ध अत्यंत वाईट सुरुवातीनंतर भारताच्या १९-वर्षांखालील संघाचा डाव सावरत कुशाग्र ओझाने संयमी नाबाद शतक झळकावले आणि संघाला मजबूत स्थितीत पोहोचविले.

पंचांनी वाईट प्रकाशामुळे दिवसाचा खेळ थांबविला, तेव्हा भारताची धावसंख्या ६५ षटकांत ३ बाद २५३ अशी होती.

डावखुरा फलंदाज ओझा १७७ चेंडूंत १०३ धावांवर नाबाद राहिला. त्याने सुरुवातीला नवीन चेंडूचा आत्मविश्वासाने सामना केला आणि नंतर मिळालेल्या संधीचे रूपांतर एका सुरेख शतकात करत भारताच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला.

कर्णधार यशवर्धन चौहानने ८९ चेंडूंत ७८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर दिवसाचा खेळ थांबला तेव्हा मानल चौहान १०८ चेंडूंत ५५ धावांवर नाबाद होता.

भारताची १९-वर्षांखालील संघाची दमदार पुनरागमत



नाबाद शतक झळकवणारा कुशाग्र ओझा

पहिल्या सामन्यात द्विशतक झळकावणारा लक्ष्य रायचंदानी आणि शतकवीर सागर विर्क हे दोघेही खाते न उघडताच बाद झाल्यामुळे भारताची अवस्था ० बाद २ अशी बिकट झाली होती.

अशा परिस्थितीत मधल्या फळीतील या तिन्ही फलंदाजांच्या कामगिरीमुळे भारताला सावरण्यास मदत झाली.

फलंदाजीचे निमंत्रण मिळाल्यानंतर, सुरुवातीचे दोन धक्के पचवून भारत सावरला. ओझाने यशवर्धन आणि मानल या दोन्ही चौहान बंधूंसोबत महत्त्वपूर्ण भागीदारी करत श्रीलंकेच्या गोलंदाजीचा समर्थपणे सामना केला. ◂ (वृत्तसंस्था)

### अर्जेंटिनाचे प्रशिक्षक स्कॅलोनी यांच्या भविष्याबाबत अनिश्चितता

**न्यू यॉर्क, २० जुलै**

सलग दोनदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचू शकणारा संघ पुन्हा उभारणे कठीण असल्याचे मत अर्जेंटिनाचे प्रशिक्षक लिओनेल स्कॅलोनी यांनी व्यक्त केले. १९५८-६२ नंतर सलग दोनदा विश्वचषक जिंकणारा पहिला संघ होण्याची संधी हुकल्यानंतर, भावूक झालेले स्कॅलोनी यांनी कबूल केले की भविष्यात काय होईल याबद्दल ते अनिश्चित आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## अर्जेंटिनाच्या चाहत्यांनी केली पोलिसांवर दगडफेक

**ब्यूनस आयर्स, २० जुलै**

फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात स्पेनकडून झालेल्या पराभवानंतर अर्जेंटिनाच्या चाहत्यांनी पोलिसांवर दगडफेक केलीविश्वचषकाच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचा पराभव झाल्यानंतर ब्यूनस आयर्समध्ये पोलिस आणि फुटबॉल चाहते यांच्यात संघर्ष झाला. १९६२ मधील ब्राझीलनंतर सलग दोनदा विश्वचषक जिंकणारा पहिला संघ होण्याची अर्जेंटिनाला आशा होती, परंतु अंतिम सामन्यात स्पेनकडून पराभव झाल्यामुळे अर्जेंटिना संघाचा स्वप्नभंग झाला.

**जल्लोषादरम्यान १३ वर्षीय मुलाचा मृत्यू**

स्पेन संघाने विश्वचषक जिंकल्यामुळे स्पेनमध्ये जल्लोष करण्यात आवला, मात्र या विश्वचषकाच्या जल्लोषादरम्यान कारंजे कोसळून १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.

**स्वागताची जय्यत तयारी सुरू**

माद्रिदमध्ये विश्वचषक विजेत्या स्पॅनिश संघाचे स्वागत करण्यासाठी लाखो लोकांची जोरदार तयारी सुरू आहे. ◂ (वृत्तसंस्था)



दगडफेक करताना अर्जेंटिनाचे चाहते

### स्पेनचा विश्वचषक विजय अमेरिका, इस्त्रायलच्या टीकाकारांसाठी आनंदाची बाब : इराण

**गाझा, २० जुलै**

गाझावरील इस्त्रायलचे 'नरसंहारसदृश' युद्ध आणि इराणविरुद्धच्या युद्धाबाबत स्पॅनिश सरकारने केलेल्या टीकेनंतर, इराणने अर्जेंटिनावर स्पेनने मिळविलेल्या विजयाचे कौतुक केले आहे. या विजयाबद्दल इराणने स्पेनचे अभिनंदन केले आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलला विरोध करणाऱ्या जगभरातील लोकांसाठी हा विजय आनंदाचा क्षण ठरला असल्याचे इराणने म्हटले आहे.

गाझावरील इस्त्रायलचे नरसंहारसदृश युद्ध आणि इराणविरुद्धच्या अमेरिका-इस्त्रायल युद्धावर स्पॅनिश सरकारने केलेल्या टीकेमुळे, जगभरातील लोकांचा पाठिंबा या विजयी संघाला मिळाल्याचे सोशल मीडियावर दिसून आले. ◂ (वृत्तसंस्था)

## भारत कोलंबोमध्ये चार दिवसांचा सराव सामना खेळणार

**नवी दिल्ली, २० जुलै**

आगामी १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी, भारतीय पुरुष क्रिकेट संघ ७ ऑगस्टपासून कोलंबोमध्ये चार दिवसांचा सराव सामना खेळणार आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ४ ऑगस्टला कोलंबोमध्ये दाखल होईल आणि 'नॉनडिस्क्रिप्ट्स क्रिकेट क्लब' (एनसीसी) मैदानावर सराव सामना खेळण्यापूर्वी काही सराव सत्रे पूर्ण करेल.

होय, भारतीय संघाचा सराव सामना ७ ते १० ऑगस्ट दरम्यान कोलंबोमधील एनसीसी मैदानावर होणार आहे. मुख्य मालिका सुरू होण्यापूर्वी स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेण्यास यामुळे सर्व खेळाडूंना मदत होईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्राने दिली.

चार दिवसांचा हा सराव सामना संपल्यानंतर भारतीय संघ गॅले येथे रवाना होईल. तिथे १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान निसर्गरम्य 'गॅले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम'वर मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळला जाईल. दुसरा व अंतिम कसोटी सामना कोलंबोमधील 'सिंहालीज स्पोर्ट्स क्लब' (एसएससी) मैदानावर २३ ते २७ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. दोन्ही सामने स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजता सुरू होतील. 'जागतिक कसोटी अजिंक्यपद' (डब्ल्यूटीसी) गुणतालिकेत वरच्या स्थानावर झेप घेण्याच्या दृष्टीने ही मालिका दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

सध्या, नऊ सामन्यांनंतर भारताची गुण टक्केवारी (पीसीटी) ४८.१५ इतकी असून संघ पाचव्या स्थानावर आहे. दुसरीकडे, श्रीलंकेची गुण टक्केवारी ४४.४४ असून ते सहाव्या स्थानावर आहेत. या मालिकेतील विजय दोन्ही संघांना गुणतालिकेत अव्वल दोनमध्ये स्थान मिळवून अंतिम सामन्यापर्यंत पोहोचण्याच्या शर्यतीत मोठी चालना देईल. या दौऱ्यामुळे २०१७ नंतर भारत पुन्हा एकदा कसोटी सामने खेळण्यासाठी श्रीलंकेत परतणार आहे; २०१७ च्या त्या दौऱ्यात विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली भारताने ३-० असा विजय मिळविला होता. ◂ (वृत्तसंस्था)

## रोहित शर्माने लॉर्ड्सवर शतक झळकावून 'सर्वांची तोंडे बंद केली'

### रवी शास्त्री यांचे मत

**नवी दिल्ली, २० जुलै**

लॉर्ड्सवर इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात शानदार शतक झळकावून रोहित शर्माने 'सर्वांची तोंडे बंद केली' आणि वन-डे फॉरमॅटमधील त्याच्या भविष्याबाबतच्या चर्चांना त्याने या खेळीद्वारे पूर्णविराम दिला आहे, असे मत भारतीय क्रिकेट संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले.

रोहितने उत्कृष्ट १३८ धावांची खेळी केली. लॉर्ड्सवर भारतीय फलंदाजाने झळकावलेली पहिली एकदिवसीय शतकी खेळी ठरली. या शानदार खेळीसह वन-डे





क्रिकेटमधील त्याच्या कारकिर्दीच्या समाप्तीबाबतच्या चर्चांना त्याने खोडून काढले. त्याने कर्णधार शुभमन गिल (७७) आणि विराट कोहली (७४) यांच्यासोबत अनुक्रमे १४७ आणि ११३ धावांची भागीदारी केली; मात्र भारताचा २७ धावांनी पराभव झाल्याने आणि मालिका १-२ अशी गमावल्याने ही खेळी व्यर्थ ठरली.

त्याला तसे करण्याची गरज नव्हती, पण त्याने सर्वांची तोंडे बंद केली; कारण जेव्हा अशा प्रकारच्या अफवा पसरतात, तेव्हा कधीकधी त्याची चीड येते. जेव्हा एखाद्या खेळाडूने इतके योगदान दिले असते, तेव्हा त्याला कोणालाही काहीही सिद्ध करण्याची गरज नसते. जर त्याला खेळण्याची आणि आपल्या खेळावर कठोर परिश्रम घेण्याची इच्छा असेल आणि तो अजूनही खेळाचा आनंद घेत असेल, तर मला वाटते की त्याला हवी तितका काळ संधी दिली पाहिजे, असेही ते म्हणाले.

रोहितला संघातून वगळण्याची चर्चा सुरू असताना त्याने केलेली ही कामगिरी एक विशेष खेळी ठरली, हे असे पहिल्यांदाच घडले आहे, असेही ते म्हणाले.

भारताच्या वरच्या फळीतील फलंदाजांनी चांगली कामगिरी केली असली, तरी गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात मात्र बरीच सुधारणा होणे गरजेचे आहे. रोहित व विराट मोठ्या धावसंख्येचे रूपांतर करण्यात तरबेज आहेत. भारताला सामन्यात टिकवून ठेवण्यासाठी मोठी धावसंख्या कशी उभी करायची, हे त्यांना आता चांगलेच ठाऊक आहे, असेही ते म्हणाले.

लॉर्ड्सवर आंतरराष्ट्रीय सामन्यात पहिले अर्धशतक झळकावणाऱ्या कोहलीबद्दल बोलताना, शास्त्रींनी त्याच्या अदम्य जिद्दीचे आणि संघासाठी असलेल्या त्याच्या अमूल्य योगदानाचे कौतुक केले. ◂ (वृत्तसंस्था)

## सात्त्विक-चिराग चायना ओपनमधून बाहेर

### सिंधू, लक्ष्य, आयुषकडे संघाचे नेतृत्व

**चांगझू, २० जुलै**

जपान ओपनमधील दमदार विजयासह दीर्घकाळापासूनचा विजेतेपदाचा दुष्काळ संपविल्यानंतर, दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू मंगळवारपासून सुरू होणाऱ्या 'बीडब्ल्यूएफ सुपर १०००' बॅडमिंटन स्पर्धेतील - चायना ओपन २०२६ - भारतीय मोहिमेचे नेतृत्व करण्यास सज्ज झाली आहे.

जपान ओपनच्या अंतिम फेरीत तीन वेळा जागतिक विजेती राहिलेल्या अकाने यामागुचीचा सरळ गेम्समध्ये पराभव करून जवळपास दोन वर्षांनंतर पहिले विजेतेपद पटकावल्यामुळे सिंधू प्रचंड आत्मविश्वासासह चीनमध्ये दाखल झाली आहे. या माजी जागतिक विजेतीने संपूर्ण स्पर्धेत एकही गेम गमावला नाही; यावरून तिने पुन्हा एकदा आपला जुना फॉर्म मिळवल्याचे स्पष्ट होते, ज्या जोरावर ती या खेळातील सर्वात सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी एक झाली होती.

३१ वर्षीय सिंधूच्या नावावर चायना ओपनमधील विजयाची (२०१६) सुखद आठवणही जमा आहे. आता ती आपल्या अलीकडील यशाची मालिका कायम राखत 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर'वर आणखी एक यशस्वी वाटचाल करण्याचा प्रयत्न करेल. महिला एकेरीच्या स्पर्धेत भारताचे तीन प्रतिनिधी असतील; मुख्य फेरीत सिंधूच्या सोबतीला देविका सिहाग आणि उदयोन्मुख युवा खेळाडू उन्नती हुड्डाचा समावेश असेल.



पुरुष एकेरीत, संमिश्र कामगिरीनंतर लक्ष्य सेन सातत्यपूर्ण खेळ पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करेल. त्याच्यासोबत जागतिक क्रमवारीत २४ व्या स्थानावर असलेला आयुष शेट्टी आणि अनुभवी एच. एस. प्रणॉय हे खेळाडू असतील. या स्पर्धेतील अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये भारत दमदार कामगिरी करण्यास उत्सुक आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेते सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने माघार घेतल्यामुळे, पुरुष दुहेरीत भारताच्या आशा आता पूर्णपणे एम. आर. अर्जुन आणि हरिहरन अमसाकरुणन यांच्या जोडीवर अवलंबून आहेत. खांद्याच्या दुखापतीतून सात्त्विकची सावरण्याची प्रक्रिया सुरू असल्याने या स्टार जोडीने स्पर्धेपूर्वीच माघार घेतली; याच दुखापतीमुळे त्यांना गेल्या आठवड्यात झालेल्या जपान ओपनमध्येही पुनरागमनासाठी अडथळ्यांचा सामना करावा लागला होता. मिश्र दुहेरीत भारत दोन जोड्या उतरवणार आहे. ऑलिम्पिकपटू तनिषा क्रास्टो हिच्यासोबत ध्रुव कपिला आणि रोहन कपूर. महिला दुहेरीच्या स्पर्धेत भारताचे कोणतेही प्रतिनिधित्व नसेल. सिंधू पुन्हा एकदा विजेतेपद मिळवण्याच्या लयीत परतली आहे आणि अनेक युवा भारतीय बॅडमिंटनपटू आपली छाप पाडण्यास सज्ज आहेत; अशा परिस्थितीत, 'चायना ओपन' ही स्पर्धा भारतीय खेळाडूंसाठी बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर हंगामाच्या उत्तरार्धात चांगली गती प्राप्त करण्याची आणखी एक महत्त्वपूर्ण संधी घेऊन आली आहे.

'चायना ओपन'साठी भारतीय संघः पुरुष एकेरीः लक्ष्य सेन, आयुष शेट्टी, एच. एस. प्रणॉय. पुरुष दुहेरीः एम. आर. अर्जुन - हरिहरन अमसाकरुणन. महिला एकेरीः पी. व्ही. सिंधू, उन्नती हुड्डा, देविका सिहाग. मिश्र दुहेरीः रोहन कपूर - रुत्विका शिवानी गद्दे, ध्रुव कपिला - तनिषा क्रास्टो. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सम्मेद शहा यांची प्रसिध्दी प्रमुखपदी निवड



**मोहोळ, दि.२० जुलै -**
तालक्यातील पापरी येथील सम्मेद शहा यांची फेडरेशन ऑफ ऑफ हुमड जैन समाज या आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या जैन संघटनेच्या म हाराष्ट्र-गोवा युवा प्रकोष्ट राज्य कार्यकारिणीत प्रसिद्धीप्रमुख म्हणून निवड झाली आहे. निवडीची माहिती महाराष्ट्र-गोवा युवा प्रकोष्टचे राज्य अध्यक्ष संदेश गांधी यांनी दिली. सम्मेद शहा यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजासाठी दिलेले योगदान, धार्मिक व सामाजिक कार्यांची दखल घेत ही निवड केली आहे. त्यांचा शपथविधी समारोह इंदोर येथे होणार आहे. ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संघटनेत निवड होऊन काम करण्याची संधी मिळाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे. निवडीबद्दल भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष व श्री सन्मती सेवा दलाचे संस्थापक मिहीर गांधी यांच्यासह सोलापूर, अकलूज, नातेपुते, करमाळा, बारामती येथील विविध जैन संघटनेचे पदाधिकारी, पापरी पंचक्रोशीतून शहा यांचे अभिनंदन होत आहे.



### महूदमध्ये स्मार्ट मीटरला ग्रामस्थांचा विरोध

**सांगोला, दि. २० जुलै-**
तालुक्यातील महूद येथील महावितरणकडून सक्तीने केल्या जाणाऱ्या स्मार्ट मीटरच्या बसवण्याच्या कामाला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात महूद ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ठराव मंजूर केला आहे. महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांना निवेदन देऊन, येत्या आठवड्यात मागण्या मान्य न झाल्यास लोकशाही म ार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा अभिजीत कांबळे, नवनाथ सरतापे, सागर साबळे, अर्जुन घाडगे, महेंद्र खांडेकर यांनी दिला आहे. निवेदनात स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा, भगीरथ योजना पूर्ववत करा अशी मागणी करत लोडशेडिंगमुळे शेती व सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत आहे. प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे, असे नमूद केले आहे.

### खूनाचा प्रयत्न, मारहाण प्रकरणी सर्व आरोपींना जामीन

**सोलापूर, दि. २० जुलै -**
खुनाचा प्रयत्न, मारहाण प्रकरणी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी ५ आरोपींची जामिनावर मुक्तता केली आहे. वरकटणे, ता. करमाळा येथील आरोपी पिंटू मनसाराम बंजारा (वय २६), राहुल बापूसाहेब हजारे (वय ३२) , किरण सतिश पाटील (वय ३२), आकाश रमेश पाटील (वय २६), शुभम पांडूरंग तनपुरे (वय २४) अशी आरोपींची नावे आहेत. दि. १२ एप्रिल २०२६ रोजी वरकटणे गावातील रस्त्यावरुन मेंढपाळ, त्याचे कुटूंबिय व इतर लोक जात असतांना कांही मेंढ्या शेजारील शेतात घूसल्या. त्यावरुन आरोपींनी काठीने, दगडाने मारहाण करुन खूनाचा प्रयत्न केला, अशा आशयाची फिर्याद दाखल केली होती. यातील आरोपींनी ॲड. भारत कट्टे यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकुन कोर्टाने सर्व आरोपींची जामिनावर मुक्तता केली. आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे, ॲड. गणेश जगताप (बार्शी), ॲड. नवनाथ राखुंडे, ॲड. सुनिल घोलप (करमाळा) यांनी काम पाहिले.



### माऊलीच्या पालखीचे झोपाळू हनुमानाच्या नगरीत आगमन

**माळशिरस, दि. २० जुलै -**
संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे झोपाळू हनुमानाच्या नगरीत (माळशिरस) स्वागत करण्यात आले. नगरपंचायतीच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी केली. पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण उरकून पालखी सोहळा सायंकाळी सातच्या सुमारास पालखी सोहळ्यातील मानाच्या दिंड्याचे पुष्पहार व श्रीफळ देऊन स्वागत केले. यावेळी नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण, माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, नगरसेवक कैलास वामन, महादेव कोळेकर, जगन्नाथ गेजागे, रावसाहेब देशमुख, मतीन बिद्रे, प्रकाश होनराव, धनजी देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर देवकर, मंजुळे कुटुंबाच्या वतीने माउलीच्या रथावर पुष्पवृष्टी तसेच फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. मारुती मंदिरासमोर अनिल पंचवाघ कुटुंबाच्यावतीने नैवेद्य दाखविण्यात आला. यावेळी दिंडीत शरण शरण हनुमंता हा अभंग सुरु होता. त्यानंतर पालखी सोहळा मुक्काम ाच्या ठिकाणी विसावला.

## निधन वृत्त...

### पद्माकर जाधव



**सोलापूर, दि. २० जुलै-**
येथील पद्माकर रामचंद्र जाधव (वय ८०) यांचे आज दि. २० जुलै रोजी आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

# वैरागसह बार्शी तालुक्यात पाऊस

**तब्बल दीड महिन्याच्या प्रतीक्षेनंतर वरुणराजाची कृपा**

**नागरिकांना दिलासा; बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधान**



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० जुलै -**
दीड महिन्यापासून संपूर्ण वैराग शहर आणि बार्शी तालुक्याला चातकासारखी प्रतीक्षा लावून ठेवलेल्या पावसाचे अखेर आज सायंकाळी आगमन झाले. दुपारपासूनच आकाशात काळ्याकुट्ट ढगांनी गर्दी केली होती, त्यानंतर सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. समाधानकारक पावसामुळे उकाड्याने त्रस्त नागरिकांना आणि खोळंबलेल्या पेरण्यांमुळे चिंतेत असलेल्या बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

जून महिना पूर्ण कोरडा गेला आणि जुलै महिन्याचा पंधरवडा उलटूनही पावसाचा पत्ता नसल्याने वैराग भागातील शेतकरी पुरता हवालदिल झाला होता. अनेक शेतकऱ्यांच्या पेरण्या लांबल्या होत्या, तर काहींनी धूळपेरणी केल्यामुळे पिके करपून जाण्याच्या मार्गावर होती.

कडक ऊन आणि उकाड्यामुळे पिकांना पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले होते. मात्र, आज झालेल्या पावसामुळे पिकांना नवसंजीवनीच मिळाली आहे. वैराग शहरात गेल्या दोन-तीन म हिन्यांपासून पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता होती. आजच्या पावसामुळे जलसंकट टळणार आहे.

> **बार्शी तालुक्यात सर्वदूर पाऊस**
>
> सायंकाळी ४ ते ५ दरम्यान ढगांच्या गडगडाटासह पावसाची सुरुवात झाली. नंतर हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरु झाला. हा पाऊस केवळ वैराग शहरापुरता मर्यादित नसून बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातही सर्वत्र हलक्या ते मध्यम स्वरूपात कोसळल्याची माहिती आहे. येत्या १५ दिवसांत अशीच दमदार व मोठी हजेरी राहिल्यास जनावरांच्या चाऱ्याचा आणि विहिरींच्या पाणीपातळीचा प्रश्न कायमचा सुटेल.

# उभ्या एसटीला भरधाव दुचाकीची धडक

**दुचाकीस्वार गंभीर जखमी**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २० जुलै -**
बार्शी-धाराशिव मार्गावरील शेलगांव (मा.) येथील मातोश्री हॉटेलसमोर रस्त्याच्या कडेला उभ्या एसटी बसला पाठीमागून भरधाव वेगातील दुचाकीने जोरदार धडक दिल्याची घटना शनिवारी १८ जुलै रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.

याप्रकरणी चालक शिवाजी वारे यांच्या फिर्यादीवरुन दिपक झिंगे याच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौंड आगाराचे चालक शिवाजी वारे हे एसटी बस (क्र. एमएच ४० एन ९३५९) घेऊन दौंड-तुळजापूर मार्गावर कर्तव्य बजावत होते. बार्शीहून धाराशिवकडे जात असताना शेलगांव (मा.) परिसरात बस समोरील काचेवर चिखल उडाल्याने व वायपर अचानक बंद पडल्यामुळे चालकाने बस रस्त्याच्या कडेला उभी केली. चालक काच स्वच्छ करत असतानाच पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या दुचाकीने बसच्या मागील उजव्या बाजूस जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्यावर गंभीर जखमी अवस्थेत पडला. परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. जखमीची ओळख दिपक भागवत झिंगे (रा. तांदळवाडी, ता. बार्शी) अशी पटली. नातेवाईकांनी त्याला तातडीने उपचारासाठी बार्शी येथील रुग्णालयात दाखल केले.



# 'फॅबटेक'मधील ५ विद्यार्थ्यांची विज्डम स्प्राऊट्स कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० जुलै -**
फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागातील सोनाली साखरे, वैष्णवी कुंभार, मृदुला शास्त्रे, शिवशंकर बेलुंखी आणि सोहम कदम या विद्यार्थ्यांची पुणे येथील विज्डम स्प्राऊट्स प्रा.लि. या नामांकित आयटी कंपनीमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली. सदर कंपनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्यपूर्ण सॉफ्टवेअर सोल्युशन्स, वेब प्लिकेशन डेव्हलपमेंट, मोबाईल विकास, क्लाऊड तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सेवा पुरवणारी प्रगत आयटी कंपनी म्हणून ओळखली जाते. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. धनंजय शिवपुजे, कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.तानाजी धायगुडे यांनी अभिनंदन केले.

# 'ओन्ली समाजसेवा'तर्फे वारकरी भाविकांना महाप्रसाद वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२० जुलै -**
श्री गजानन महाराज संस्थान शिवनी पिसा ता. लोणार जि. बुलढाणा येथील पंढरपूर येथे पायी जाणाऱ्या वारकऱ्यांना ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शीचे अध्यक्ष राहुल यांच्या घरी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

वारकऱ्यांचे रांगोळी काढून फुलांच्या वर्षावात केले. त्यानंतर दिंडीतील टाळकरी आणि विणेकरी यांची पाद्य पूजा करुन दिंडीचे मालक चालक ह.भ.प गजानन पिसे महाराज व ह.भ.प.पिसे तसेच पाटील महाराज यांचेही संस्थेकडून स्वागत करण्यात आले. ज्ञानेश्वर माऊली तुकाराम या जयघोषात अवघा संपूर्ण परिसर दुम दुमला होता.

यावेळी अभंग व भारुड झाल्यानंतर महाआरती कोहिनूर ज्वेलर्सचे मालक आनंद भोसले व सुवर्णा भोसले यांच्या हस्ते झाली. यावेळी सर्वांनी म हाआरतीचा लाभ घेतला. त्यानंतर सर्वांना महाप्रसाद (जेवण) देण्यात आले.

जेवणानंतर ज्ञानोबा माऊली तुकाराम यांच्या जयघोषात व टाळ मृदुंगाच्या तालात पालखी पुढील प्रवासास मार्गस्थ करण्यात आली. यावेळी दिंडीचे मानकरी यांनी संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांना तसेच ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेतील सर्वांना सेवा दिल्याबद्दल आभार व्यक्त करुन आशीर्वाद दिले.

कार्यक्रमास दिंडीसाठी ज्यांनी आर्थिक सहाय्य दिले तसेच या वारकरी सेवेसाठी उपस्थित राहून वारकरी यांची सेवा केली अशा सर्वांचे पत्रकारांचे आभार संस्थेतर्फे मानण्यात आले.

# ५०हून अधिक सीसीटीव्ही अन् २३० किमीपर्यंत पाठलाग

**बार्शी तालुका पोलिसांनी तीन दिवसांत शोधला अपघातातील आरोपी**




**तसा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २० जुलै-**
बार्शी-कुर्डूवाडी मार्गावरील शेंद्री फाट्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर वाहनासह पसार झालेल्या चालकाचा तीन दिवसांत शोध घेण्यात बार्शी तालुका पोलिसांना यश आले आहे.

अपघातस्थळापासून सुरू झालेल्या या तपासात पोलिसांनी ५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले, सहा टोलनाक्यांवरील वाहनांची माहिती पडताळली आणि सुमारे २३० किलोमीटरपर्यंत तपासाची साखळी जोडत पुण्यात पोहोचून संशयित चालक धर्मा बाबा जाधव याला ताब्यात घेतले. याबाबत बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. राजाभाऊ शिंदे (वय ४८, रा. कामखेडा, ता. रेणापूर, जि. लातूर) हे बार्शी कुर्डूवाडी म ार्गावरील शेंद्री फाट्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडले होते. अपघातानंतर संबंधित वाहनचालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाल्याने सुरुवातीला आरोपी आणि वाहनाबाबत पोलिसांकडे कोणताही ठोस धागा नव्हता.

बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. पोलिसांनी अपघातस्थळाच्या चारही दिशांमधील सीसीटीव्ही फुटेज तपासली. सलग तीन दिवसांच्या तपासात ५०हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केल्यानंतर अपघाताशी संबंधित वाहन एमएच १२ एक्सएच ३१९८ क्रमांकाची वॅगनार असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर पोलिसांनी सहा टोलनाक्यांवरील वाहनांच्या हालचालींची माहिती तसेच विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित चालक पुण्यातील कोंढवा परिसरात असल्याचे समजले. अपघातानंतर वॅगनार चालक धर्मा बाबा जाधव हा पुण्याच्या दिशेने गेला होता. अपघातग्रस्त वाहन दुरुस्तीसाठी पुण्यातील कात्रज परिसरातील एका गॅरेजमध्ये सोडले होते. त्यानंतर पोलिसांनी संबंधित गॅरेज परिसरात सापळा रचून जाधवला ताब्यात घेतले. तीन दिवसांचा अथक तपास, ५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज, सहा टोलनाके आणि सुमारे २३० किलोमीटरपर्यंत केलेल्या पाठपुराव्यानंतर आरोपी पोलिसांच्या जाळ्यात सापडला.

ही कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अ.पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स.पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय भालेराव, पोलीस अंमलदार राजेंद्र मंगरूळे, हनुमंत काळे, अतुल बाकले, युवराज गायकवाड, शिवशंकर खराडे आणि सागर वाकळे यांच्या पथकाने केली.

# श्री शिवाजी महाविद्यालयात मोबाईल वापरावर निर्बंध

**विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही लागू**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जुलै-**
विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक शिस्त, एकाग्रता आणि गुणवत्तापूर्ण अध्यापणाला चालना देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत महाविद्यालयाच्या परिसरात प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या मोबाईल फोन वापरावर निर्बंध लागू केले आहेत.

निर्णयानुसार अध्यापनाच्या वेळेत तसेच वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि इतर शैक्षणिक परिसरात मोबाईलचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. अत्यावश्यक परिस्थितीत महाविद्यालयातील दूरध्वनी वापरण्याची परवानगी दिली आहे. प्राचार्यांनी सांगितले की, मोबाईलच्या अतिरेकामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो, एकाग्रता कमी होते आणि शैक्षणिक वातावरणावर परिणाम होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

महाविद्यालय प्रशासनाने सर्व प्राध्यापक , विद्यार्थी व पालकांनी या निर्णयाला सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाविद्यालयीन नियमानुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

# संत दामाजीपंतांच्या पालखी सोहळ्याला ११० वर्षांची परंपरा

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. २० जुलै -**
मंगळवेढ्यातील श्री संत दामाजीपंत यांच्या पालखी सोहळ्याला सुमारे ११० वर्षांची अखंड परंपरा लाभली आहे. आषाढ शुद्ध सप्तमी १९१६ पासून ह.भ.प. पांडुरंग माळी आणि ह.भ.प. शंभूदेव मेटकरी यांनी दिंडी सोहळ्याची सुरुवात केली होती. तेव्हापासून हा सोहळा श्रद्धा, शिस्त, भक्ती आणि वारकरी परंपरेचा जिवंत वारसा म्हणून अखंड सुरू आहे.

सोहळ्याने शतकभरात मंगळवेढा आणि पंढरपूरच्या भक्ति परंपरेत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. संत दामाजीपंत हे विठ्ठलभक्तीचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे त्यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान हे केवळ धार्मिक यात्रेचे स्वरूप न राहता, सामाजिक ऐक्य, वारकरी संप्रदायाची शिस्त आणि ग्रामीण भक्तिभावाचे दर्शन घडवणारे मोठे अधिष्ठान बनले आहे. २००७ पर्यंत ह.भ.प. सिद्धेश्वर माळी यांनी ही परंपरा अखंड जपली. त्यानंतर ह.भ.प. बजरंग माळी आणि ह.भ.प. शंभू सिद्धेश्वर माळी यांनी या दिंडी-पालखी सोहळ्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली आहे.

पालखी सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे चांदीच्या पादुका, पितळी मूर्ती आणि त्यासोबत चालणारा शिस्तबद्ध वारकरी समुदाय. चार चोपदार, विणेकरी, मृदंगवादक, टाळकरी, पताकाधारी वारकरी तसेच महिला वारकरी असे १५० वारकरी सहभागी होतात. मंगळवार दि. २१ जुलै रोजी दुपारी ४ वाजता श्री संत दामाजी मंदिरातून पालखी-दिंडी सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. मेटकरी गल्ली येथील हनुमान आणि श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे पहिला मुक्काम होणार आहे. वारकरी परंपरेनुसार पहिल्या दिवसापासूनच अभंग, पाऊलखेळ, टाळ-मृदंग आणि विणेच्या गजरात संपूर्ण वातावरण भक्तिमय होणार आहे.

दुसऱ्या दिवशी बुधवार दि. २२ जुलै रोजी सकाळी पालखीचा प्रवास श्रीकृष्ण तलाव, शनिवार पेठ, मारुती मंदिर, शिवाजी तालीम आणि दैनिक दामाजी एक्स्प्रेस कार्यालयासमोरून होणार आहे. भगरे परिवाराच्या वतीने खारीक-खोबरे उधळण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. मुरलीधर चौक, संत चोखामेळा चौक, जुनी कासेगाव वेस आणि डॉ. कुंभारे हॉस्पिटलसमोरून पालखी पुढे जाऊन श्री संत दामाजी चौकात मंदिरासमोर कळसाचा अभंग गात पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. मंगळवेढा-पंढरपूर मार्गावर सुमारे ३ किलोमीटर अंतरापर्यंत श्री महादेव मंदिरापर्यंत मोठ्या संख्येने भाविक पालखीसोबत राहतात. या ठिकाणी पुरुष आणि महिला मिळून सुमारे एक हजार भाविकांची उपस्थिती राहते. पुढे पालखी एकलासपूरकडे जाते



आणि तेथे रात्रीचा मुक्काम असतो. गुरुवार दि. २३ जुलै रोजी पहाटे ५ वाजता कासेगाव सिद्धेश्वर वस्ती येथे दुपारचे भोजन होणार आहे. त्यानंतर कासेगाव येथे पालखीचे स्वागत व पूजा केली जाईल. वसंत देशमुख यांच्या हस्ते पालखी आणि पादुकांची पूजा होणार आहे. सायंकाळी वाखरीतळ येथे पालखीचा मुक्काम असेल. शुक्रवारी २४ जुलै रोजी वाखरी येथून पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे. वाखरी पालखी तळावर पालखी सोहळा प्रमुख माळी परिवाराकडून वारकऱ्यांना भोजन दिले जाते.

शनिवार दि. २५ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या पहाटे ५ वाजता पंढरपुरात नगरप्रदक्षिणा पूर्ण केली जाणार आहे. बुधवार दि. २९ जुलै रोजी सकाळी गोपाळकाल्यासाठी श्री संत दामाजीपंतांची पालखी गोपाळपूरला जाणार आहे. गोपाळकाला आटोपल्यानंतर परतीचा प्रवास सुरू होईल.

अनवली, एकलासपूर आणि सिद्धेवाडी मार्गे रात्री उशिरा मंगळवेढ्यातील मेटकरी गल्ली येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पालखीचा मुक्काम असेल. गुरुवार दि. ३० जुलै रोजी दुपारी १ वाजता भोजनानंतर पालखी श्री संत दामाजी मंदिरात विसावणार आहे. सोहळ्यास श्री दामाजी संस्था अध्यक्ष विष्णुपंत आवताडे आणि अखिल भाविक वारकरी मंडळाचे पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर भगरे यांचे सातत्याने सहकार्य लाभत आहे.

# चेसी क्रॅक बसेस प्रकरणी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय

**महापालिका सर्वसाधारण सभेत विक्रमी १७० विषयांना मान्यता**

## बी २ निर्णयाचे सभागृहात स्वागत अन् अभिनंदन ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

सोमवारी महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विविध विषयांच्या कोट्यवधींच्या कामांना मंजुरी देण्यात आली. या सभेत महापालिकेच्या इतिहासात प्रथमच विक्रमी १७० विषयांना मान्यता देण्यात आली. दरम्यान, चेसी क्रॅक बस प्रकरणात सोलापूर महापालिकेला ४९ कोटींचा फटका बसला आहे. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचा निर्णय सभागृहात घेण्यात आला.

सोलापूर महापालिकेची सर्वसाधारण सभा महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी प्रधान्याचे विषय स्पष्ट केले. जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या बसेस्च्या चेसी क्रॅकसंदर्भात संपूर्ण कार्यवाही बाबत महापौर यांनी महापालिकेच्या बजेट सभेत दिलेल्या आदेशानुसार परिवहन विभागाकडील प्रकरणात तपशीलवार माहिती सादर करण्यात आली.

जेएनएनयुआरएम बस चेसी क्रॅक प्रकरणी किती नुकसान झाले? याचा आकडा नगरसेवक अमोल शिंदे यांनी विचारला. यावर नियंत्रण अधिकारी नीलकंठ मठपती यांनी व्याजासह ४९ कोटी नुकसान झाले असल्याचे सांगितले. दरम्यान, या प्रकरणात अभिप्राय आणि सल्ला देणाऱ्या सल्लागार यांच्यासह संबंधित दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी केली.

दरम्यान, तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांच्यावरही कारवाई करण्यात यावी अशी मागणी नगरसेवकांनी केली. याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश महापौर कोंड्याल यांनी दिले. यावेळी काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे, भाजपच्या नगरसेविका रोहिणी तडवळकर, यांनीही चर्चेत सहभाग नोंदवला. आजच्या सभेत परिवहन बसेस्च्या चेसी क्रॅकचा मुद्दा चांगलाच गाजला.

सोलापूर शहरातील बी २ जमिनीचा प्रश्न अनेक दशकापासून प्रलंबित होता. हा प्रश्न सोडविण्यात आला. याकामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सकारात्मक भूमिका घेतली. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांचे यावेळी अभिनंदन करून तसा ठराव मंजूर करण्यात आला.

माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांनीही यासंदर्भात यापूर्वी पाठपुरावा केला असून त्यांचाही उल्लेख करण्याची मागणी काँग्रेसचे चेतन नरोटे यांनी केली. या चर्चेत नगरसेवक विनोद भोसले, मनीष केत, प्रा.नारायण बनसोडे, श्रीदेवी फुलारे, अजहर हुंडेकरी, भारत बडूरवाले, अक्षय अंजिखाने, चेतन नरोटे, संगीता जाधव, अर्चना वडनाल आदींनी भाग घेतले.



### शहरात पुतळे उभारण्यासाठी ५ कोटी रुपये

महिला व बालकल्याण विभागांतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणीबरोबरच छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज तलाव विकास यांसह विविध कामांचे प्रस्ताव अजेंड्यावर होता. शहरात विविध ठिकाणी पुतळे उभारण्यासाठी ५ कोटी रुपये, सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्रातील पंप हाऊस उभारणीसाठी ८ कोटी रुपये खर्चास मंजुरी मागण्यात आली होती; त्यास मंजुरी देण्यात आली आहे.

### विकास कामांचा मार्ग झाला मोकळा

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान २०२६-२७ अंतर्गत प्रभाग क्रमांक १२, १४, ८, १५, ५, ७, १० व २४ मध्ये २८ कोटी रुपयांची विकासकामे तर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत प्रभाग ११, १६, १७, ५, १५ व १४ मध्ये २३ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना मंजुरी मिळाल्याने या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

### अंगणवाड्या, कचरा संकलन, क्रीडांगण

शहरातील १५ अंगणवाड्यांच्या इमारतींसाठी १.५० कोटी रुपये, तर पंधरावा वित्त आयोगाच्या निधीतून कचरा संकलन व वाहतूक व्यवस्थेसाठी १३.२३ कोटी रुपये खर्चाचा प्रस्तावही सभागृहासमोर होता. क्रीडांगण विकासासाठी ६३ लाख रुपयांची कामे या सर्व प्रस्तावांवर महासभेत सविस्तर चर्चा होत, मंजुरी मिळाल्याने शहरातील विविध भागांतील विकास कामे मार्गी लागणार आहेत.

### तुमचा जन्म झाला नव्हता...

बी २ मंजुरीबाबत अभिनंदन प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान बोलताना भाजपाचे स्वीकृत नगरसेवक अक्षय अंजिखाने यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, राष्ट्रवादी पक्षाचे नेते शरद पवार आणि खासदार प्रणिती शिंदे यांचे नाव घेऊ नये व श्रेय लाटू नये, असे म्हणताच काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांनी अंजिखाने यांना उद्देशून अजून तुमचा जन्म झाला नव्हता, तुम्हाला याबद्दल काही माहीत नाही, असा टोला लगावला.

### महापौर व सभागृह नेत्यांचा सत्कार

आजच्या सभेत विक्रमी १७० विषयांना मान्यता देण्यात आली. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच एवढ्या विषयांना मंजुरी दिल्याने महापौर विनायक कोंड्याल आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांचा सदस्यांनी सत्कार केला.

## बोगस बिले दाखवून महापालिकेची दीड कोटींची फसवणूक

**लक्षवेधीद्वारे अनंत जाधव यांचे गंभीर आरोप**

**बिले चुकली असल्याचे आयुक्तांचे स्पष्टीकरण**

**रणजीत टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या बिलांवरुन अधिकारी धारेवर**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

सोलापूर महापालिकेच्या नालेसफाई कंत्राटातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत चांगलाच गाजला. भाजप नगरसेवक अनंत जाधव यांनी लक्षवेधीद्वारे हा विषय उपस्थित करत बनवाबनवी, गोलमाल आणि बोगस बिले सादर करुन सुमारे दीड कोटी रुपयांची महापालिकेची फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप केला.

महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी संबंधित बिले चुकीने अदा झाल्याचे स्पष्ट केले. महापौर विनायक कोंड्याल यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले. रणजीत टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या बिलांवरुनही अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले. या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत नगरअभियंता सारिका आकुलवार यांना पदावरुन दूर करण्याची आग्रही मागणी करण्यात आली.

महापौर विनायक कुंडल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेच्या सुरुवातीलाच भाजप नगरसेवक अनंत जाधव यांनी नालेसफाई कंत्राटात भ्रष्टाचार प्रकरणी लक्षवेधी मांडली. विविध कागदपत्र आणि पुरावे यांची पिशवी घेऊनच ते सभागृहात आले. नाले खोलीकरण व रुंदीकरणासाठी रणजीत टूर्स अँड ट्रॅव्हल्स या मक्तेदाराला दिलेल्या कामाच्या बिलांवरून जोरदार खडाजंगी झाली.

ताशी ४,८०० रुपये दराने करण्यात आलेल्या देयकांवर सत्ताधारी अनंत जाधव यांनी आक्षेप घेत महापालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप केला. या चर्चे दरम्यान जाधव यांनी नगरअभियंता विभागाला झोननिहाय मंजूर मक्तेदारांच्या दराची आणि रणजीत टूर अँड ट्रॅव्हल्सला दिलेल्या दराची तुलना करण्यास भाग पाडले.

नगरअभियंता सारिका आकुलवार यांनी यांनी रणजीत टूर अँड ट्रॅव्हल्सचा करार हा आयटम बेस्ड टेंडर असल्याने त्याची तुलना वार्षिक टक्केवारीच्या मक्तेदारांशी होऊ शकत नाही. हा दर तत्कालीन आयुक्तांच्या मंजुरीनंतर खुल्या निविदा प्रक्रियेत निश्चित झाले आहे. एकही पैसा जास्त मक्तेदाराला दिला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कर्मचारी ते आयुक्त यांनी यावर सह्या करत बिले निघाली. डोळे झाकून बिल दिले का? असा संतप्त सवाल नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी उपस्थित केला. या विषयावरील चर्चेत नगरसेवक संजय कोळी, शिवानंद पाटील, राजू पाटील यांनी सहभाग नोंदवत कारवाईची मागणी केली.

## महत्वाचे...



### शेतकरी पायी दिंडीचे करण्यात आले स्वागत

**सोलापूर, दि.२० जुलै-**

सोलापूर, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यातून गेलेल्या शक्तिपीठ महामार्गला विरोध दर्शविण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील इसबावी येथील संतराज मंगल कार्यालय महाविकास आघाडीच्या वतीने शेतकऱ्यांचा महामेळावा घेण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील, राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर, खा.धैर्यशील मोहिते-पाटील, आ.अमित देशमुख, आ.अभिजीत पाटील, कैलास पाटील यांची उपस्थिती होती. यानिमित्ताने काढण्यात आलेल्या पायी दिंडीचे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी स्वागत केले. यावेळी पंढरपूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संदीप पाटील, किसान सेलचे माजी जिल्हाध्यक्ष राहुल पाटील, सचिन खैरे-पाटील, प्रा.अशोक डोळे, बाळासाहेब आसबे, हेमंत देशमुख, शंकर गायकवाड, उत्तमकुमार वाघमारे, करण गहिलवार सहभागी झाले होते.

### बुधवार पेठेतील तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि.२० जुलै-**

बुधवार पेठेतील एका ३५ वर्षीय तरुणाने दारुच्या नशेत घरातील छताच्या पत्र्याच्या लोखंडी अँगलला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली. प्रशांत प्रभाकर पवार (रा.जवळकर वस्ती, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. घरामधील छताच्या अँगलला तो गळफास घेतल्याचे आढळून आला. जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे हवालदार आर.पी.वाघमारे यांनी नातेवाईकांच्या साह्याने सदरचा मृतदेह खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### गुरुवार पेठेत तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि.२० जुलै-**

अज्ञात कारणावरुन एका तरुणाने घरातील छताच्या लाकडी वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवार पेठ येथे शनिवार, दि१८ जुलै रोजी उघडकीस आली. रमण अंबादास श्रीगण (वय-३०, रा.गुरुवार पेठ, गणेश शॉपिंगच्या मागे, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह घरच्यांना आढळून आला. वडील अंबादास श्रीगण यांनी नातेवाईकांच्या साह्याने गळफास सोडवून त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबीर

**भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात 'महारक्तदान संकल्प' आणि 'सेवा सप्ताह' उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील ४० ते ४५ ठिकाणी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष (पूर्व) शशिकांत चव्हाण यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोणत्याही प्रकारचा अवास्तव खर्च न करता, समाजोपयोगी आणि विधायक कामांना प्राधान्य देण्याचे आवाहन भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले आहे. त्यानुसार जिल्ह्यात महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप आणि गोरगरिबांना मदत होणारे विविध उपक्रमही राबविले जाणार आहेत, असेही जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गतवर्षी राज्यभरात तब्बल १०८८ ठिकाणी महारक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. एकाच दिवशी ७८ हजार ३१३ युनिट्स रक्ताचे विक्रमी संकलन करण्यात आले होते. या महाकाय उपक्रमाची नोंद 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये झाली आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

## संभाजी ब्रिगेडतर्फे मूक आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै -**

नीट, यूजी टीईटी यांसह विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गंभीर परिणाम झाला असून याकडे लक्ष वेधण्यासाठी पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी दिल्ली येथे आंदोलन करीत आहेत. त्यांच्या या आंदोलनच्या समर्थनार्थ संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापुरात मूक आंदोलन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आलेल्या या आंदोलनात शाम कदम, संभाजी भोसले, मीनल दास, अरविंद शेळके, फिरोज सय्यद, संतोष सुरवसे, इशरद नागरे, प्रकाश डोंगरे, अनिता वाघमारे, रमेश भंडारी, दिलीप निंबाळकर, बाळासाहेब वाघमारे, अरविंद कांबळे, प्रदीप वाघमारे आदी सामील झाले होते.

## सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनकडून पोलिस प्रशासनास आषाढीसाठी अत्यावश्यक साहित्य सुपूर्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै -**



आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांच्या सुरक्षितता, वाहतूक नियंत्रण व सुविधा व्यवस्थापनासाठी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या वतीने पोलीस प्रशासनाला अत्यावश्यक साहित्याचे योगदान करण्यात आले.

असोसिएशनतर्फे देण्यात आलेले साहित्य मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्याकडे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आले. या साहित्यामुळे वारीदरम्यान पोलीस यंत्रणेला गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करता येणार आहे. या प्रसंगी असोसिएशनच्या वतीने सेफ्टी रिफ्लेक्टिव्ह जॅकेट्स, बॅटन, टॉर्च, बॅटऱ्या, मेगाफोन्स आदी आवश्यक साहित्य मदतस्वरूपात प्रदान करण्यात आले.

ही मदत सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत बालाजी अमाईन्स, वामसी लॅब्स, बंग डाटा फॉर्म्स, लक्ष्मी हायड्रोलिक्स, प्रभू रॉकशेप मशिनरी, ओसी स्पेशालिटी, क्रॉस इंटरनॅशनल, आर. एम. अप्लाइड इंजिनिअर्स, वेंकीज, लिनीत एक्सपोर्ट्स, शक्ती प्रिसिजन कास्टिंग, सृजन फूड्स आणि आय. एम. सी. या उद्योगांनी दिलेल्या आर्थिक सहकार्य व उदार योगदानातून उभारण्यात आली. सर्व योगदानकर्त्या उद्योगांचे असोसिएशनने मनःपूर्वक आभार मानले. साहित्य हस्तांतरणावेळी असोसिएशनचे सचिव वासुदेव बंग, किसन दाडगे, सागर चिट्टे, नागराज अलवाल, सचिन मरे, कुमार सगुमळे, सुनील गिरे, शुद्धोधन गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी पोलिस प्रशासनाने सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## जि.प. पेन्शनर्सच्या हक्कांसाठी स्वतंत्र संघटना स्थापन

**राजेश देशपांडे अध्यक्ष; निवृत्तीवेतन, प्रलंबित प्रश्न व पेन्शनर्सच्या हक्कांसाठी लढा देण्याचा निर्धार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**



सोलापूर जिल्हा परिषदेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या, निवृत्तीवेतनाशी संबंधित प्रलंबित प्रश्न आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी जिल्हा परिषद पेन्शनर्स असोसिएशन, सोलापूर या स्वतंत्र संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी राजेश देशपांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

संघटनेच्या स्थापनेसाठी आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पेन्शनर्स अरुण क्षीरसागर आणि बाळासाहेब नकाते होते. बैठकीत जिल्हा परिषदेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, निवृत्तीवेतनातील प्रलंबित बाबी, वैद्यकीय सुविधा तसेच शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा आदींविषयी चर्चा करण्यात आली.

यावेळी बाळासाहेब देशमुख यांची कार्याध्यक्षपदी, एम. ए. लोंढे आणि दिगंबर भगरे यांची उपाध्यक्षपदी, तर नूतन पिसे व अलका पुराणिक यांची महिला उपाध्यक्षपदी निवड झाली. संदीपान चाबुकस्वार यांच्याकडे सरचिटणीसपदाची, नागनाथ धोत्रे यांच्याकडे सहचिटणीसपदाची, अविनाश भोसले यांच्याकडे खजिनदारपदाची, तर एन. पी. चव्हाण यांच्याकडे मुख्य संघटकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

नव्या संघटनेच्या माध्यमातून पेन्शनर्सच्या प्रलंबित प्रश्नांचा शासन आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचे आणि निवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्क, सन्मान आणि कल्याण यासाठी ही संघटना प्रभावी व्यासपीठ ठरेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. सभेत एन. पी. चव्हाण, सुनंदा सुरवसे, नूतन पिसे, बाळासाहेब नकाते, प्रकाश माने आणि अलका पुराणिक यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सुरेश मुद्दगल, नवनाथ सलवदे, शोभा कुलकर्णी, शीला सोमवंशी, तानाजी काळे, गोविंद पाटील, सिंधुताई म्हेत्रे यांच्यासह मोठ्या संख्येने पेन्शनर्स उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब नकाते आणि सुनंदा सुरवसे यांनी केले, तर अविनाश भोसले यांनी आभार मानले.

## लोकशाही मुल्यांचे संरक्षण, मतांचा आदर, शिक्षण व्यवस्थेवरील प्रश्नांवर सकारात्मक संवाद करा

**सजग नागरिकांच्या वतीने अन्नत्याग आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्यावरील कारवाईचा निषेध नोंदवत आणि त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या समर्थनार्थ सोलापूर शहरातील सजग नागरिकांच्या वतीने सोमवारी जिल्हा परिषद परिसरातील पूनम गेट येथे एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. लोकशाही मूल्यांचे संरक्षण, नागरिकांच्या मतांचा आदर आणि शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांवर सकारात्मक संवाद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी, युवक, महिला तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी आंदोलकांनी शांततापूर्ण पद्धतीने घोषणाबाजी करत आपली भूमिका मांडली. लोकशाही व्यवस्थेत नागरिकांचा आवाज ऐकला जावा आणि मतभिन्नतेचा सन्मान राखला जावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

सदर आंदोलन यशस्वी करण्यासाठी निलेश संगेपाग, निरंजन बोध्दूल, शेखर बंगाळे, मल्लिकार्जुन पिलगेरी, रोबर्ट गौडर यांच्यासह अनेक नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


## ‘संत तुकाराम महाराज की जय’च्या जयघोषाने दुमदुमला वैष्णवांचा मेळा
# जगद्गुरुंच्या पालखी सोहळ्यावर पुष्पवृष्टी





### सराटी येथे स्वागत; अकलूजमध्ये रिंगण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर/अकलूज, दि.२० जुलै -**

‘आषाढी वारी’च्या अनुषंगाने श्रीक्षेत्र देहू येथून प्रस्थान ठेवलेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे सोमवार, दि.२० जुलै २०२६ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. ‘जगद्गुरु संत तुकाराम महाराज की जय’च्या घोषात सराटी येथे पालखी सोहळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्या हस्ते पादुका पूजन व अश्व पूजन करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, माळशिरस पंचायत समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, उपजिल्हाधिकारी विजया पांगारकर, अमित माळी, सुमित शिंदे, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.सतीश कोपूरवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ आदी उपस्थित होते.

#### सोयीसुविधांची देण्यात आली माहिती

पालखी सोहळा स्वागत ठिकाणी वारकऱ्यांसाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या सोयी-सुविधांची माहिती यावेळी पालखी सोहळा प्रमुखांना देण्यात आली. पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छतागृहे व निवारा केंद्रांबाबत अधिकाऱ्यांनी पाहणी करण्यात आली.

#### जिल्हाधिकाऱ्यांनी केले रथाचे सारथ्य

जिल्हाधिकारी एसकार्तिकेयन यांनी श्री संत तुकाराम महाराज पादुका पूजन व पालखी स्वागत केल्यानंतर महाराजांच्या पालखीचे सारथ्यही केले. यावेळी कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी हेही उपस्थित होते. सोहळा पाहण्यासाठी अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री शिवानी परब, संजना काळे उपस्थित होते.

नीरा नदीचा पूल ओलांडून सोलापूर जिल्ह्यात पालखी रथाचे आगमन होत असताना जिल्हा प्रशासनातर्फे जेसीबीमधून रथावर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी सर्व अधिकारी, पदाधिकारी, भाविकांनी विठ्ठल नामाचा, तुकाराम महाराजांचा नामघोष केला. तत्पूर्वी पुण्याचे उपजिल्हाधिकारी उत्तम दिघे यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्याकडे पालखीची सुत्रे सुपूर्द केली. दरम्यान, संध्या तिवाडी व त्यांच्या पथकाचे भारुड गायन झाले.अकलूज येथील सदाशिव माने विद्यालयाच्या भव्य मैदानावर पालखी सोहळ्यातील पारंपरिक रिंगण सोहळा अत्यंत भक्तिभावात पार पडला. अश्वांनी घातलेल्या रिंगणाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. टाळ-मृदंगाच्या गजरात व ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

## वारकऱ्यांच्या सेवेत डिजीटल सेवेसह ‘आरोग्यसंपन्न वारी’

### आवश्यक आरोग्य सुविधा आता एका क्लिकवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकरी आणि भाविकांना आरोग्यविषयक सुविधा जलद, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ’आरोग्यसंपन्न वारी’ हा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आलेल्या या पोर्टलमुळे वारीतील आवश्यक आरोग्य सेवा आता मोबाईलवर एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत.

वारी.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वारकऱ्यांना रुग्णवाहिका सेवा, जवळील आरोग्य केंद्र, उपलब्ध डॉक्टरांची माहिती, आपला दवाखाना, महत्त्वाचे हेल्पलाइन क्रमांक, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, महिलांसाठी हिरकणी कक्ष, चरण सेवा केंद्र तसेच मुक्काम आणि विश्रांती स्थळांची माहिती सहज मिळणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळण्यासाठी १०८ रुग्णवाहिका आणि ११२ आपत्कालीन सेवांचे पर्यायही पोर्टलवर उपलब्ध आहेत. या उपक्रमामुळे वारी मार्गावरील आरोग्य व्यवस्थेचे डिजिटल एकत्रीकरण झाले असून वारकऱ्यांना आवश्यक सुविधा शोधण्यासाठी होणारी धावपळ कमी होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या भाविकांसाठी ही सेवा अधिक उपयुक्त ठरणार आहे.

## ‘आरएसएस १०० एक सदी संकल्प की’ या पुस्तकाचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रकाशन

### उपराष्ट्रपती भवनात पोहचला सोलापूरचा नॅपकिन बुके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

श्याम जाजू यांनी लिहिलेल्या ‘आरएसएस १०० एक सदी संकल्प की’ या हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकाचे प्रकाशन उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते दिल्ली येथील उपराष्ट्रपती भवनात करण्यात आले. उपराष्ट्रपती भवन येथे झालेल्या या कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांना सोलापूरचा नॅपकिन बुके देऊन स्वागत-सत्कार करण्यात आले.




यावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, ज्येष्ठ पत्रकार तथा पद्मश्री रावबहादूर राय, पंचायत निरंजन आखाड्याचे महामंडलेश्वर श्री कैलाशा नंदजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रिय संघचालक पवन जिंदल यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला यंदा १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल श्याम जाजू यांनी हे पुस्तक लिहिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या वाटचालीचा, आव्हानांचा आणि संकल्पांचा आढावा याबरोबरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वयंसेवकत्वाचा अध्याय समाविष्ट करण्यात आला आहे.

### महत्वाचे...




#### आठवडी बाजारात पाणी समजून ॲसिड पिलेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.२० जुलै-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हेच्या आठवडी बाजारात पाणी समजून ॲसिड पिलेल्या एका ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. अंबाबाई मोहन शिंदे (रा.तिऱ्हे, ता.उत्तर सोलापूर, मूळ रा.अशोक चौक, सोलापूर) असे मयत महिलेचे नाव आहे. शुक्रवार, दि.१७ जुलै रोजी त्या तिऱ्हे येथील आठवडी बाजारात गेल्या होत्या. तेथे नजरचुकीने पाणी समजून ॲसिड पिले होते. त्यांना त्रास होऊ लागल्याने रोहित शिंदे यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले होते. याठिकाणी उपचारादरम्यान रविवार, दि.१९ जुलै रोजी त्यांचा मृत्यू झाला.

#### कासेगाव येथे टमटम चालकाची आत्महत्या

**सोलापूर, दि.२० जुलै-**



एका टमटम चालकाने घराजवळील झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे उघडकीस आली. प्रभाकर बाळू बरडे (वय-३७, रा.कासेगाव) असे त्याचे नाव आहे. प्रभाकर बरडे हा विवाहित असून तो टमटम वाहन चालवून उदरनिर्वाह चालवायचा. सोमवार, दि.२० जुलै रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह घराजवळील झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. नातेवाईकांच्या सहाय्याने सदरचा मृतदेह खाली उतरवून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मामेभाऊ भरत जाधव यांनी दाखल केला असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## महिला आरक्षण, जनगणना, परिसिमन संदर्भात ‘जनवादी’च्या वतीने आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या कायद्याची कोणत्याही अटींशिवाय तात्काळ अंमलबजावणी करावी, जनगणना आणि मतदारसंघ परिसीमनाची अट रद्द करण्यासाठी संविधान (१०६ वी दुरुस्ती) अधिनियमात आवश्यक सुधारणा कराव्यात या प्रमुख मागणीसाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने सोमवारी सोलापुरात जोरदार आंदोलन करण्यात आले.

संघटनेच्या राज्याध्यक्षा नसीमा शेख याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, महिला आरक्षण विधेयक मंजूर होऊन दोन वर्षांहून अधिक कालावधी झाला असला, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. जनगणना आणि परिसीमनाशी अंमलबजावणी जोडल्यामुळे महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा मार्ग आणखी लांबला आहे. त्यामुळे ही अट तातडीने रद्द करून आगामी विधानसभा निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण लागू करणे आवश्यक आहे.

या आंदोलनात शकुंतला पाणीभाते, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, लिंगव्वा सोलापूरे, गीता वासम, अफसाना बेग, जलाबाबी शेख, मीनाक्षी चलवादी, सावित्री गुंडला, लक्ष्मीबाई पाथरुट यांच्यासह अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते सामील झाले होते.

### बिर्याणी विकण्यावरुन वाद; तरुणास मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

रेल्वे प्लॅटफॉर्मवर बिर्याणी विकण्याच्या कारणावरुन एका तरुणाला लाकडाने मारहाण करण्यात आल्याची घटना सोलापूर रेल्वे स्टेशन येथे सोमवार, दि.२० जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता घडली. गौस शहजादा सय्यद (वय-२५, रा.रामवाडी, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी तो रेल्वे प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर बिर्याणी विकत होता. त्यावेळी वाद झाल्याने सोहेल शेख याने लाकडाने मारहाण केली. यात जखमी झाल्याने उपचाराकरिता मित्र अब्दुल याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्यांची शिष्यवृत्ती बंद केल्याच्या निषेधार्थ आंदोलन



**सोलापूर, दि.२० जुलै-**

राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांना मिळणारी शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना बंद करण्याच्या शासन निर्णयाच्या विरोधात सोलापूर जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले.

नोंदणी, नूतनीकरण व अर्जदार संख्येवरील मर्यादा शिथिल कराव्यात यांसह अन्य मागण्या करण्यात आल्या. यावेळी बशीर अहमद, सिध्दार्थ बोराडे, सायबन्ना तेगेळी, छगन पंढरे, एजाज शेख, अश्पाक शेख, अंगत जाधव, अशोक कांबळे, शरणू गुडियवरु, ज्ञानेश्वर देशमुख, मिलिंद गायकवाड, जब्बार पटेल, राजकुमार स्वामी, बाबा बागवान, झहीर शेख, चंद्रशेखर बदलापुरे उपस्थित होते.

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी ९ हजार पोलिसांचा फौजफाटा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै -**

लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना विठ्ठलाचे दर्शन सुलभ व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाने यंदा अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. तब्बल ९ हजार ०३६ पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा अवाढव्य फौजफाटा २२ जुलै ते २६ जुलै या ५ दिवसांच्या कालावधीत दिवस-रात्र सुरक्षेसाठी सज्ज राहणार आहे.

आषाढी एकादशीच्या महापर्वासाठी पंढरपूर नगरी सज्ज झाली असून, विठ्ठलनामाच्या जयघोषाने अवघी पंढरी दुमदुमली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या वारकऱ्यांची प्रचंड गर्दी लक्षात घेता, प्रशासनाने यंदा सुरक्षेचे जाळे अधिक भक्कम केले आहे. पोलीस अधीक्षक दर्जाच्या १ उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.



या महाबंदोबस्तामध्ये ५ अप्पर पोलिस अधीक्षक, २९ उपअधीक्षक, ७२ पोलिस निरीक्षक आणि २८९ सहाय्यक पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या मोठ्या फळीमुळे संपूर्ण बंदोबस्तावर चोख नजर राहणार असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल पूर्णपणे सज्ज आहे.

#### ५०७ महिला पोलिसांचा समावेश

आषाढी वारीमध्ये महिला वारकऱ्यांची संख्या लक्षात घेता यंदाच्या वारीत ५०७ महिला पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. महिला वारकऱ्यांच्या मदतीसाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी हे विशेष पथक अहोरात्र कार्यरत राहणार आहे. यासोबतच, वारी काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि शांतता राखली जावी, यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. महिला वारकऱ्यांना निर्धास्तपणे विठूरायाचे दर्शन घेता यावे, यासाठी प्रशासनाने संपूर्ण वारी मार्गावर चोख सुरक्षा व्यवस्था सज्ज केली आहे.

#### अत्याधुनिक ड्रोन तैनात

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून पालखी सोहळ्यावर लक्ष ठेवण्यासाठी अत्याधुनिक ड्रोनची तैनाती करण्यात आलेली आहे. यामध्ये धर्मपुरी बॉर्डर ते नातेपुते या पालखीच्या मार्गावर अत्याधुनिक ड्रोन पालखी सोहळ्यावर लक्ष ठेवून होते. या ड्रोनच्या माध्यमातून पालखी सोहळ्यावर निगराणी ठेवून वारकऱ्यांची सुरक्षा करण्यात आली. तसेच पालखी मार्गावरील वाहनांची होणारी वाहतूक कोंडी योग्य दिशेने वळवण्यासाठी ड्रोन चा वापर करून त्यांना वेळीच मार्गस्थ करून पालखी सोहळा सुखकर व आरामदायी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न पोलीस दलाकडून करण्यात आला.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी ३,६८३ पोलिस अंमलदार तैनात असणार आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून एसआरपीएफच्या १०० जवानांची एक विशेष तुकडी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आली आहे. या कालावधीत सुरक्षेच्या निकषांचे पालन करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाकडून वारकऱ्यांना करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ज्ञानामृत आनंदलहरी - १५०८

**आतां भजू कोणे परी । देव सबाह्य अंतरी ।।**

सर्व जीवमात्र हेच ईश्वराचे स्थान होय. या संत वचनावर आपला विश्वास असेल तर आपणही या जीवमात्राचा एक भाग असल्याने आपणही ईश्वराचेच स्थान आहोत, यावरही आपला विश्वास असायला हवा. आपल्यात ईश्वराला पाहायचे असेल तर आपल्या मनातील, वर्तनातील मीपणाची व अहंकार, माया-मोह, द्वेष-मत्सर आदीची पट्टी बाजूला सारावी लागेल. ही पट्टी आपल्या डोळ्यावर घट्ट बसली असेल तर स्वत:तही व इतरांतही आपणाला ईश्वर दिसणार नाही. आपल्यातील मीपणा जाऊन आपणाला आपल्यात ईश्वर दिसणे व आपल्यात मीपणा राहून आपणाला आपल्यात ईश्वर दिसणे यात फार मोठा फरक आहे. मीपणा निघून जाऊन जर आपणास आपल्यात ईश्वर दिसला तर सर्व जीवमात्रातही आपोआप तो दिसेल. ईश्वराची ही प्रचिती आपणाला आपण आपल्यासाठीच कांहीतरी करीत असल्याचे जाणवून देईल. कारण सबाह्यंतरी त्याची प्रचिती आल्याने त्याच्यासाठी आपण वेगळे कांही करणार नाही. अर्थात, आपण जे करू ते आपल्यासाठीच करू.



तुकाराम महाराजांना सबाह्यांतरी ईश्वराची प्रचिती आल्याने आपण ईश्वराला वेगळ्या अंगाने कसे भजावे? हा प्रश्न पडला. अर्थात, आपल्या आंत बाहेर देवच भरल्याने त्याच्यासाठी कांही वेगळे करावे लागणार नसल्याने त्यांना जाणवले. त्यांचे असे जाणवणे ते आपणाला सांगतांना म्हणतात,

**आतां भजू कोणे परी । देव सबाह्य अंतरी ।।**

तुकाराम महाराजांच्या या अभंगाचा गर्भितार्थ आपण विचारात घ्यावा. आपल्या वाट्याला आलेले कर्म, कर्तव्य नीतीनियमपूर्वक पार पाडणाऱ्याला ईश्वरासाठी कांही करावे लागत नाही. त्याचे कर्तव्य, कर्म त्याच्यासाठीच असले तरी ते नीतीनियमपूर्वक असल्याने ईश्वरस्वरूप असतात. म्हणून ईश्वरभक्ती म्हणून वेगळे भजन-पूजन करावे लागत नाही. खरे म्हणजे ही ईश्वरस्वरुपता ज्याच्याकडे मी नाही, त्याच्यासाठी आहे. पण जो मीपणा, अहंकार, गर्व आदिमुळे स्वत:ला ईश्वर समजतो, त्याच्याकडून खरी ईश्वरभक्ती होत नाही. समाजात मीपणामुळे स्वत:ला ईश्वर समजणारे कांही कमी नाहीत. अहंकार किंवा अज्ञानापोटी का असेना अनेक ढोंगी लोक लोकांना स्वत:चे नांव घ्यायला लावतात. आपणच ईश्वर असल्याने आपल्या छायाचित्राची पूजा करा, आपल्या नांवाचा जप करा, अडी अडचणीच्या वेळी आपल्या नांवाने हाक मारा, असा विचित्र सल्ला देतात. अशा ढोंगी लोकांत आंधळेपणाने ईश्वर पाहण्यापेक्षा, जाणतेपणाने स्वत:त ईश्वर पाहणे जास्त योग्य होईल असे मला वाटते. आपल्यात ईश्वर आहे, हे संत वचन असल्याने यावर आपला विश्वास असावा. सर्वस्व विश्वासा ठेवल्याशीवाय भगवंताची प्रचिती येणार नाही. जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

# सुप्रभात

## आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. २१ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - आषाढ शु. अष्टमी
ऋतु - वर्षा ।
नक्षत्र- चित्रा (२०.२८)
योग - सिद्ध (१८.२४)
करण - विष्टी (१६.३४)
राहू काल : मंगळवार
स. ०३.०० ते ०४.३०

दिनविशेष : १९३४ : भारताचे माजी क्रिकेटपटू आणि निवड समितीचे माजी अध्यक्ष चंदू बोर्डे यांचा जन्म.
१९४७ : भारताचे माजी धडाकेबाज सलामीवीर फलंदाज चेतन चौहान यांचा जन्म.
२०२२: द्रौपदी मुर्मू यांची भारताच्या १५व्या आणि पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती म्हणून निवड झाली.
२००१: दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते शिवाजी गणेशन यांचा जन्म.

# महायात्रिक श्री आर्वीकर संत साहित्य पुरस्कार प्रा. डॉ. पाटंगणकर यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै -**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा-सोलापूर आणि संत श्री बाबामहाराज आर्वीकर यांच्या भक्तांच्या वतीने सुरू करण्यात आलेला 'सद्धम चे उद्गाते व महायात्रिक श्री बाबामहाराज आर्वीकर संत साहित्य पुरस्कार-२०२६' यंदा बीडचे ज्येष्ठ साहित्यिक व संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांना जाहीर केल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूरचे अध्यक्ष डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



हा पुरस्कार गुरुपौर्णिमेनिमित्त बुधवार दि. २९ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता लोकमान्य टिळक सभागृह, श्री हिराचंद नेमचंद वाचनालय येथे प्रदान करण्यात येईल. याचे पुरस्काराचे वितरण ह.भ.प. श्री दीपकजी महाराज तेर-ढोकी यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रुती वडगबाळकर आहेत. यंदापासून प्रथमच सुरू केलेल्या या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रुपये रोख, सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ असे आहे. संत श्री बाबामहाराज आर्वीकर यांच्या संत साहित्याचा वारसा जतन व संवर्धन करणाऱ्या अभ्यासकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार सुरू केला आहे. या कार्यक्रमास साहित्यप्रेमी, संत साहित्याचे अभ्यासक तसेच बाबामहाराज आर्वीकर यांचे भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष दत्ता सुरवसे, कार्याध्यक्ष किशोर चंडक यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस कोषाध्यक्ष बदिऊज्जमा बिराजदार, गोविंद काळे, फैयाज शेख उपस्थित होते.

**संत साहित्याचे गाढे अभ्यासक**

प्रा. डॉ. पाटंगणकर हे संत साहित्याचे गाढे अभ्यासक, संशोधक व लेखक आहेत. मराठी व संस्कृत विषयातील उच्च शिक्षण घेतलेल्या डॉ. पाटंगणकर यांनी संत साहित्यावर व्यापक संशोधन केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली २१ संशोधकांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे. मराठी संत कवयित्रींचा इतिहास, एक विठ्ठल नाम : वारकरी संप्रदाय साहित्य व तत्त्वज्ञान, संत जनी-जनार्दन साहित्य व परंपरा, त्रिपुटी यांसारखे त्यांचे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. सध्या ते दासोपंत यांच्या 'गीतार्णवा'च्या संशोधित समग्र संहितेच्या प्रकल्पावर कार्यरत आहेत. माचणूर येथील संत श्री बाबामहाराज आर्वीकर यांनी ईश्वरनिष्ठा, विश्वप्रेम आणि मानवसेवेचा संदेश आपल्या साहित्य व प्रवचनांतून दिला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे ५६ सेवा उपक्रम

● उद्या शहरभर एकाच वेळी विविध कल्याणकारी कार्यक्रम
● सेवा कार्याचा संकल्प पूर्ण केला जाणार : रोहिणी तडवळकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहरच्या वतीने बुधवार २२ जुलै रोजी शहरभर एकाच वेळी ५६ लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आरोग्य, शिक्षण, सामाजिक सेवा, पर्यावरण, क्रीडा, धार्मिक आणि जनकल्याणाशी संबंधित विविध कार्यक्रम द्वारे सेवा कार्याचा संकल्प पूर्ण केला जाणार असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या व्यतिरिक्त शहरातील भारतीय जनता पार्टीचे सर्व मंडल अध्यक्ष यांनी प्रत्येक मंडलात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात केले आहे. सर्व कार्यक्रमांचे नियोजन नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल आणि शशी थोरात यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेता नरेंद्र काळे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल , सुधा अळळीमोरे आदी उपस्थित होते.



## श्री मार्कंडेय मंदिर येथे महाआरती

देवेंद्र फडणवीस यांना दिर्घायुष्य लाभावे, आलेल्या संकटांना सामना करण्याची शक्ती प्राप्त व्हावी यासाठी श्री मार्कंडेय मंदीर येथे महाआरती सिध्देश्वर पेठ, सोलापूर सकाळी ८ वाजता. कार्यक्रम वेळेवर सुरू करण्यात येणार आहे.श्रीराम मंदीर, दाजी पेठ, सोलापूर सायंकाळी ७ वाजता महाआरती व प्रसाद वाटप होणार आहे. सर्व नागरीकांनी व भाजपा लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी केले आहे.

## विविध ५६ उपक्रम असे

**प्रभाग १:** -१. शालेय साहित्य वाटप, आयोजक - श्रीनिवास दायमा, २. साहित्य वाटप आयोजक गौतम कसबे. **प्रभाग २:** ३. लाभार्थी यांचा सत्कार आयोजक धरीराज रमणशेट्टी, ४. शालेय साहित्य वाटप आयोजक - प्रा. नारायण बनसोडे, हृदयरोग तपासणी शिबीर आयोजक संजय साळुंके. **प्रभाग ३ :** ५ -भाजी विक्रेते यांना छत्री वाटप आयोजक रंजीता चाकोते, ६. वृक्षारोपण आयोजक स्वाती दत्तात्रेय बडगु, ७. प्रसाद वाटप आयोजक राजकुमार पाटील. **प्रभाग ४:** - ८. एसटी पास वाटप आयोजक अनंत जाधव, ९. खाऊ वाटप आयोजक विनायक विटकर. **प्रभाग ५ :** १०. आरोग्य शिबिर आयोजक बिजू प्रधाने, ११. आरोग्य शिबिर आयोजक समाधान आवळे, महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजक सुधा अळळीमोरे, १२. दिव्यांग व्यक्तींना चादर व ब्लँकेट वाटप, १३. महिलांना गॅस वाटप आयोजक मंदाकिनी तोडकर, १४. वृक्षारोपण आयोजक मनोज लोंढे. **प्रभाग ६:** १५. महाआरती, स्वच्छता अभियान आणि खाऊ वाटप आयोजक गणेश वानकर, मनपा शाळेत वृक्षारोपण आयोजक ऋषिकेश मेट्रे, अमर पुदे. **प्रभाग ७ :** १६. ५६ महिलांचा लाटी काटी ५६ मिनिटाचा प्रयोग आयोजक यशवंत पाथ्रुट, १७. ५६ वृक्षारोपण आयोजक शेखर फंड, १८. आरोग्य शिबिर आयोजक श्रद्धा किरण पवार, रामरक्षा पुस्तक वाटप आयोजक श्रद्धा किरण पवार. **प्रभाग ८ :** १९. ज्येष्ठ नागरिकांसाठी शुगर व बीपी तपासणी शिबिर तसेच सर्व नागरिकांसाठी दंत तपासणी आणि आरोग्य शिबिर आयोजक ज्ञानेश्वर म्याकल, १९. रक्तदान शिबिर आयोजक अमर पुदाले. **प्रभाग ९ :** २०. श्री राम मंदिर दाजी पेठ येथे महाआरती व प्रसाद वाटप आयोजक ज्ञानेश्वर म्याकल. **प्रभाग ११:** २२. प्रसाद वाटप आयोजक अजय पोन्नम, २३. खाऊ वाटप आयोजक अप्पू कडगंची, प्रभाग १२-२४. शेतकरी महिलांना शेतीपूरक साहित्य वाटप आयोजक अर्चना वडनाल, २५. शालेय साहित्य वाटप महापौर विनायक कोंड्याल. **प्रभाग १३:** २६.भारत माता प्रतिमा वाटप आयोजक सुनीता कामाठी, २७. भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या वतीने रक्तदान शिबिर संयोजक विजय कुलते, **प्रभाग १४ :** २८. एस टी पास वाटप आयोजक चेतन पडळकर. **प्रभाग १५:** २९. श्री मार्कंडये मंदिर येथे सकाळी आठ वाजता महाआरती आयोजक श्री-सत्यनारायण गुर्रम, ३०. आयुष्मान कार्ड वाटप, एसटी कार्ड वाटप रेशन कार्ड वाटप, आयोजक विजया खरात. **प्रभाग १६ :** ३१. एसटी कार्ड वाटप आयोजक संतोष कदम, **प्रभाग १७ :** ३२. महिलांना तुळशी रोप वाटप आयोजक निर्मला जंगम,.**प्रभाग १८:** ३३. कुष्ठरोग व्यक्तींना अन्नदान वाटप ३४. अनाथ मुलांना अन्नदान वाटप संयोजक जय साळुंखे, ३५. रांगोळी स्पर्धा संयोजक राजश्री दोडमणी, ३६. जिल्हा परिषद शाळेतील मुलांना शालेय साहित्य व क्रीडा साहित्य वाटप संयोजक शिवानंद पाटील, आरोग्य शिबीर आयोजन प्रशांत पल्ली. **प्रभाग १९ :** ३७. एसटी पास वाटप ३८. शालेय गणवेश वाटप आयोजक वेंकटेश कोंडी, **प्रभाग २० :** ३९. वार्ता फलक उद्घाटन ४०. नेत्र तपासणी शिबिर आयोजक डॉक्टर रफिक सय्यद, ४१. पंचशील शाळेत क्रीडा साहित्य वाटप, ४२. वृक्षारोपण ४३. मंत्री चांडक गणपती मंदिर येथे महाआरती, **प्रभाग २१ :** ४४. जय भवानी सोसायटी येथील विरंगळा केंद्र जवळ वृक्षारोपण संयोजक सात्विक बडवे, ४५. मोफत आरोग्य शिबिर संयोजक संगीता जाधव, प्रभाग २२ - ४६. महाप्रसाद वाटप आयोजक किसन जाधव, **प्रभाग २३ :** ४७. वृक्षारोपण आयोजक ज्ञानेश्वरी महेश देवकर ४८. सलगर वस्ती स्मशानभूमी येथे वृक्षारोपण आयोजक अक्षय वाकसे, ४९. ज्येष्ठ नागरिकांना पर्यटन व देवदर्शन आयोजक राजशेखर पाटील, **प्रभाग २४ :** ५०. गो मातांना चारा वाटप आयोजक वृषाली चालुक्य, ५१. निबंध स्पर्धा आयोजक अश्विनी जाधव, ५२. शालेय साहित्य वाटप आयोजक जयकुमार माने, **प्रभाग २५:** ५३. ज्येष्ठ नागरिक यांचेसाठी विविध गुण दर्शन कार्यक्रम आयोजक नरेंद्र काळे, हत्तुरे वस्ती येथे मूकबधिर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आणि खाऊवाटप आयोजक सुमन चाबुकस्वार, ५४. देवा भाऊ चषक बक्षीस वितरण समारंभ आयोजक परमेश्वर माळगे. **प्रभाग २६:** ५५. दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप आयोजक रामभाऊ तळवळकर, ५६. नेत्र तपासणी व चष्मा वाटप आयोजक संगीता जाधव.

# आषाढी एकादशीनिमित्त ८५ नृत्यांगनांचे 'अभंग मार्गम्' भरतनाट्यम् नृत्य संकीर्तन

**संत ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, तुकाराम व जनाबाई यांच्या अभंगांवर शनिवारी रंगणार भक्तिरसाचा सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै -**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्रीनिअंबा नृत्यालयाच्या वतीने 'अभंग मार्गम् - नाचू संताच्या संगी, अभंगांच्या रंगी' या आगळ्यावेगळ्या भरतनाट्यम् नृत्य संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक २५ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे हा कार्यक्रम होणार असून, तब्बल ८५ नृत्यांगना संतांच्या अभंगांवर भरतनाट्यम् सादर करणार असल्याची माहिती श्रीनिवास काटवे आणि अंबिका काटवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमात संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत तुकाराम आणि संत जनाबाई यांच्या अभंगांवर आधारित नृत्यरचना सादर करण्यात येणार आहेत. श्रीनिवास काटवे व अंबिका काटवे यांच्या मार्गदर्शनाखाली ८५ नृत्यांगना संतांच्या जीवनातील निवडक प्रसंग आणि अभंगांचा भावार्थ नृत्याच्या माध्यमातून रसिकांसमोर उलगडणार आहेत. श्रीनिअंबा नृत्यालयाने यापूर्वी सादर केलेले 'श्री सिद्धेश्वर वैभवम्', 'दशावतार कीर्ती धवलम्', 'पंच महाभूतांचा रुद्रावतार' आणि 'प्रकृती मार्गम्' हे नृत्याविष्कार सोलापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हाऊसफुल केले होते. यंदाही संतांच्या अभंगातून भक्ती, अध्यात्म आणि संस्कृतीचा संगम घडविणारा हा कार्यक्रम रसिकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध तबलावादक पं. आनंद बदामीकर , प्रख्यात भरतनाट्यम् नर्तक व पुणे विद्यापीठ ललित कला केंद्राचे सहायक प्राध्यापक डॉ. परिमल फडके , ख्यातनाम गायक व संगीतकार डॉ. अतींद्र सरवडीकर तसेच

सुप्रसिद्ध गायिका प्रिया सोहळे-सरवडीकर उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, प्रवेशिकांसाठी ७४१००७२८३३ व ७४१००७२६९९ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस भावना कल्पवृक्ष , श्रद्धा पांढरे, पृथ्वीराज काटवे आदी उपस्थित होते.



# कार चालक गोळीबार प्रकरण; आणखी आरोपी अटकेत

**अटकेतील आरोपींची संख्या सातवर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

हैदराबाद रस्त्यावरील मुळेगावजवळ रोकड लुटून नेण्यासाठी कार अडवून चालकावर गोळीबार करून त्याच्याजवळील रोकड लुटून नेण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी सोलापूर तालुका पोलिसांनी रविवार रोजी आणखी दोघा आरोपींना अटक केली आहे. त्या दोघांना येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना २३ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आतापर्यंत ८ पैकी ७ आरोपींना अटक करण्यात सोलापूर तालुका पोलीस स्टेशनला यश आले आहे. ८व्या आरोपीचा शोध घेण्यासाठी ३ पथके विविध ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. याबाबत कार चालक एजाज नबीलाल तांबोळी (वय ३७, रा. कर्णिकनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल आहे. एजाज हे स्टील व्यापारी इब्राहिम मोतीवाला यांच्याकडे चालक म्हणून काम ला आहेत. दिवसभरातील रक्कम गोळा करून रात्री साडेनऊच्या सुमारास ते मुळेगाव येथे आपल्या मालकाला देण्यासाठी कारमधून निघाले होते. पाठीमागून कारमधून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या होत्या. पोलिसांनी या गंभीर घटनेनंतर तपासाची चक्रे वेगाने फिरवून शुक्रवारी चार आरोपींना अटक केली आहे. त्यानंतर आणखी एकाला अटक केली आहे.

ही कामगिरी सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, पोलीस उपनिरीक्षक महेश घोडके, सहायक फौजदार विवेक सांजेकर, पोलीस अंमलदार राहुल महिंद्रकर, शशिकांत कोळेकर, महेश कटकधोंड, धनराज गायकवाड, अनंत चमके यांनी पार पाडली आहे.

# अलका काकडे यांच्या पुस्तकाला राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. २० जुलै-**

मराठी भाषा संवर्धन संस्था वणी, (जि. यवतमाळ) यांच्या वतीने देण्यात येणारे मानाचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये सोलापूर येथील मूळ रहिवासी असलेल्या व सध्या पुणे येथे स्थायिक ज्येष्ठ व प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ आणि समुपदेशक अलका काकडे यांच्या जीवनसाथीचा वियोग आणि विवेकनिष्ठ विचारसरणी या ललित लेख संग्रहाला राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




साहित्य क्षेत्रातील योगदानाला दाद देण्यासाठी आयोजित या दिमाखदार समारंभात विविध आठ साहित्य प्रकारांमधील उत्कृष्ट १६ पुस्तकांची निवड करण्यात आली होती. यामध्ये मानसशास्त्रज्ञ अलका काकडे यांच्यासह निवडक लेखकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे, सन्मानपत्र, रोख रक्कम, शाल-श्रीफळ आणि बुके (पुष्पगुच्छ) देऊन अतिशय थाटामाटात गौरविण्यात आले. सोहळ्याचे संचालन मराठी भाषा संवर्धन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पेंढरवाड यांनी केले तर आभार प्रवीण ठेंगणे यांनी मानले.

# सोलापूरचे जैन मुनी सुप्रभसागरजी यांचे सोळा वर्षानंतर आगमन

## भव्य स्वागत व शोभायात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

तब्बल १६ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर परम पूज्य श्रमण मुनिश्री १०८ सुप्रभसागरजी महाराज यांचे ससंघ सोलापूरमध्ये ऐतिहासिक मंगल आगमन झाले. मातृभूमी पावसयोग २०२६ अंतर्गत आयोजित भव्य अगवाणी, मंगल प्रवेश व शोभायात्रेला सकल जैन समाजासह हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अविस्मरणीय वातावरण निर्माण केले.



सकाळी आचार्य शांतिसागर महाराज चौक (रंगभवन) येथे ध्वजारोहणाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. राजकुमार अमृतलाल दोशी (भांबुर्डीकर) व परिवार, नूतन कस्तुरचंद गांधी (साखरवाले) व परिवार तसेच संतोष जयकुमार शहा (भूमकर) व परिवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर अगवाणीला प्रारंभ झाला.

रंगभवन चौक ते श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर या संपूर्ण मार्गावर आमदार विजयकुमार देशमुख, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, विविध सामाजिक संस्था, जैन मंदिर ट्रस्ट, शैक्षणिक संस्था तसेच असंख्य नागरिकांनी मुनिसंघाचे पुष्पवृष्टी, पादप्रक्षालन व जयघोषाने स्वागत केले. संपूर्ण शहर ''जय जिनेंद्र'' आणि ''गुरुदेवांचा जयजयकार'' ''नमोस्तु शासन जयवंत हो'' अशा घोषणांनी दुमदुमून गेले.

सोलापूरच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा हा मंगल प्रवेश सोहळा ठरला. अनेक वर्षांनंतर लाभलेल्या या ऐतिहासिक गुरुदर्शनाचा आनंद भाविकांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. हा भव्य मंगल प्रवेश सोहळा श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सकल जैन समाजाच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात संपन्न झाला. अगवाणी मुनीश्रींचे मंगल प्रवचन झाले. प्रवचन नंतर श्री आदिनाथ ट्रस्टच्या वतीने सकल समाजासाठी वात्सल्य भोजची सोय केली होती. या भव्य मंगल अगवाणी मध्ये सकल जैन समाज श्रावक,सर्व मंदिर ट्रस्टी व पदाधिकारी, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे पदाधिकारी, सभासद, विद्यार्थी तसेच भारतातील विविध राज्यातून महाराजांचे भक्त आले होते.

## शोभायात्रेत सोळा अंकाचे आकर्षण

सुप्रभसागरजी महाराज यांचा संघाचे सोळा वर्षानंतर सोलापुरात आल्यामुळे हत्ती, १६ अश्व, १६ बैलगाड्यामध्ये मागील १६ चातुर्मास स्थळीचे चित्र फलक, १६ सायकली, १६ दुचाकी, नाशिक ढोल, हळदे बँड, झांज पथक, लेझीम पथक, डीजे साऊंड तसेच ट्रॉलीवर साकारण्यात आलेल्या तीन आचार्यांच्या भव्य दर्शनाने शोभायात्रेचे आकर्षण वाढविले. मार्गातील प्रत्येक चौकात विविध बँड, ढोल-ताशा, झांज, लेझीम पथके, विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेतील महिला मंडळे आणि आकर्षक झांक्यांनी उपस्थितांची मने जिंकली. गांधी नाथा रंगजी जैन बोर्डिंग, जैन महिला विकास मंडळ, जय जिनेंद्र ग्रुप, बाहुबली जैन मंदिर, श्राविका आश्रम, ज्ञानदीप महिला मंडळ, सहेली ग्रुप, कासार जैन मंदिर, आयुर्वेदिक कॉलेज यांसह विविध महिला मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भारतीय जैन संघटना, आयुर्वेदिक कॉलेज स्टाफ, वालचंद शिक्षण समूह, जैन जागरण आदी संस्थांचे पुरुष गटही ड्रेस कोडमध्ये सहभागी झाले होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# माढेश्वरीच्या नगरीत मुक्ताईंचे आगमन

## नगराध्यक्षा मीनल साठे यांच्याकडून भक्तीपूर्ण स्वागत

### फुलांची उधळण, घरोघरी रांगोळीच्या पायघड्या





**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २० जुलै -**

आदिशक्ती मुक्ताबाई पालखीचे माढ्यात सोमवारी दुपारी ४ वाजता आगमन झाले. माढेश्वरी मंदिराजवळ पालखीचे नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांनी भक्तीपुर्ण वातावरणात पालखीचे स्वागत केले. यावेळी जेसीबीच्या सहाय्याने पालखीवर फुलांची उधळण करण्यात आली.

३१४ वर्षांची मोठी परंपरा असणारी मानाची मुक्ताईनगर (जळगाव) ते पंढरपूर साधारण ५५० कि.मीचा मोठा प्रवास करणारी पालखी आहे. यावर्षी सर्वत्र पावसाने ओढ दिली असून साडेपाचशे किलोमीटरच्या या प्रवासात काही ठिकाणी ऊन, वारा, पाऊस, थंडी याची तमा न बाळगता आपल्या विठुरायाच्या दर्शनासाठी वारकरी विठ्ठल रूखमाईचा जयघोष करत टाळ मृदंगाच्या गजरात आनंदाने पंढरीची वाट चालतात. तेवढ्याच उत्साहात गावोगावी नागरिक त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत व व्यवस्था करतात.

माढ्यात जागोजागी संत मुक्ताबाई पालखीच्या स्वागताचे फलक व दारासमोर व शहराच्या चौकामध्ये रांगोळ्या काढून व फुलाचे उधळण करून मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात करण्यात आली. माढेकर नागरिकांनी केलेल्या पुष्पवृष्टिला वरूणराजानेही साथ दिली. पालखी माढ्यात येताच सुखद पावसाचा शिडकावा झाल्याने मोठा पल्ला गाठून आलेल्या वारकऱ्यांना मोठा आनंद प्राप्त करुन दिला. पालखी स्वागतप्रसंगी नगराध्यक्षा मिनल साठे, तहसीलदार संजय भोसले, मुख्याधिकारी नेहा कंठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगरसेविका संजीवनी भांगे, आमदार अभिजीत पाटील यांचे बंधू आनंद पाटील, अमर कदम, शहाजी साठे, गुरुराज कानडे, माढा नगरपंचायतचे नगरसेवक, माढ्यातील वारकरी संप्रदायाचे मंडळी आदी उपस्थित होते.

माढ्यात बाजार पटांगण हनुमान मंदिरात पालखीच्या मुक्कामाची व्यवस्था होती. मंदिरात भजन, कीर्तनाचे आयोजन केले होते. माढा नगरपंचायतच्या वतीने स्वच्छता मोहीम, माढा मेडिकल असोसिएशनने मोफत औषधे वाटप केले. आरोग्य विभागानेही योग्य व्यवस्था केली होती. शहरातील भाविक ांकडून वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था केली होती. माढा पोलिसांनी पालखी मार्गावर वाहतूक कोंडी होऊन अनुचित प्रकार घडू नये यासाठी खबरदारी घेतली होती. मुक्ताईनगर ते माढा २७ दिवसांचा प्रवास असुन माढ्यात १ दिवसाचा मुक्काम व पाहुणचार घेऊन पालखी मंगळवारी पंढरपूरला मार्गस्थ होईल. माढ्यातील सचिन मोरे, मुबारक बागवान, सिकंदर शेख या भक्तांकडून पालखीला फुलांची आकर्षक सजावट केली होती. दरवर्षी त्यांच्याकडून पालखीला फुलांनी सजावट करण्यात येते.

### ग्लोबल वारीचेही माढ्यात आगमन

माढ्याच्या ऐतिहासिक विठ्ठल मंदिरात लंडन ते पंढरपूरला ११ देशाचा प्रवास करून निघालेल्या ग्लोबल दंडीचे आगमनही सोमवारी सायंकाळी पाच वाजता श्री विठ्ठल मंदिरात झाले. यावेळी विठ्ठल मंदिर भजनी मंडळ भाविक भक्त व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ग्लोबल दिंडीचे उत्साहात स्वागत केले.

### दादासाहेब साठेंकडून वडशिंगेत भोजन व्यवस्था

संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांच्याकडून वडशिंगे येथे वारकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी ११ वाजता वडशिंगे येथे माजी आमदार धनाजीराव साठे दादासाहेब साठे व नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांनी पालखीचे स्वागत करून पूजन केले.

## महत्वाचे...



### विस्तार अधिकाऱ्यांनी केला गुणवंतांचा सन्मान

**बार्शी दि. २० जुलै -**

विविध उपक्रमांच्या माध्यमातून तालुक्यात अग्रेसर असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) येथील शिक्षिका श्रीमती दिपाली गोरे यांनी यावर्षी शिष्यवृत्ती, नवोदय व विविध स्पर्धा परीक्षेसाठी उल्लेखनीय कार्य करीत तालुक्यात सर्वाधिक निकाल दिला आहे. यात त्यांचा चि. सर्वज्ञ सतीश वाघ हा एकमेव विध्यार्थी तालुक्यातून नवोदयासाठी निवडला गेला आहे तर ६ विध्यार्थी शिष्यवृ०त्तीधारक ठरले आहेत. तसेच याच शाळेतील उपक्रमशील शिक्षक आनंद घाडगे यांची विध्यार्थीनीं कु.अन्वी शशिकांत चव्हाण हिची नवोदय विद्यालयसाठी निवड झाली आहे. या दोन्ही गुणवंत शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी देवगाव केंद्राचे केंद्रप्रमुख तथा आगळगाव बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री धनाजी जाधवर शाळेत आले होते. त्यांनी या दोन्ही गुणवंतांचा तसेच शिष्यवृत्तीधारक विध्यार्थी व नवोदयसाठी निवड झालेल्या विध्यार्थ्यांचा सन्मान केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे, रामचंद्र बरचे हरिभाऊ दळवी, श्रीमती वैशाली खुने,श्रीमती बेबीनंदा खडबडे,श्रीमती सुवर्णगौरी शिंदे,श्रीमती मीरा गरड, आमचे पालक भाऊसाहेब माळी, सचिन ठोगे उपस्थित होते.

### लोकसहभागाद्वारे गावात स्वच्छता, आरोग्य संपन्नता : शिंदे

**सोलापूर, दि.२० जुलै-**

स्वच्छता, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, वैयक्तिक स्वच्छता व लोकसहभाग महत्त्वाचा असून यामुळे गावात स्वच्छता व आरोग्य संपन्नता नांदते, असे प्रतिपादन आयुक्त प्रांजल शिंदे यांनी केले. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील नरोटेवाडी व करमाळा तालुक्यातील उंदरगाव ग्रामपंचायतीची विभागस्तरीय तपासणी केली. यावेळी त्या बोलत होत्या. नरोटेवाडी ग्रामपंचायतीने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात व समृध्द गाव अभियानात केलेले काम कौतुकास्पद आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी सहाय्यक आयुक्त रवींद्र कणसे, सहाय्यक प्रशासन अधिकारी शैलेश सराफ, विभागीय आयुक्त विशाल भुरकुंडे, कनिष्ठ सहाय्यक आयुक्त अविनाश लोखंडे, गटविकास अधिकारी राजाराम बोंग, महादेव शिंदे, विस्तार अधिकारी सोमनाथ शिंदे, सरपंच उमेश भगत, उपसरपंच महेंद्र खटके, ग्रामसेविका सुवर्णा घोडके, भीमाशंकर उंबरे, अर्जुन दुर्लेकर, ज्ञानेश्वर आतकरे आदी उपस्थित होते.



### न्यासाची अविरत सेवा कौतुकास्पद : पटोले

**अक्कलकोट, दि २० जुलै -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांना ३९ वर्षे देत असलेली अविरत सेवा कौतुकास्पद असल्याचे काँग्रेसचे जेष्ठ नेते- नाना पटोले यांनी सांगितले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांची सुंदर, सुबक, रेखीव प्रतिमा देण्यात आली. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार, तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, नगरसेवक मुस्तफा बळोरगी, मल्लिनाथ बंडगर, संजय प्रचंडे, हर्षदीप गायकवाड, विजय स्वामी, दत्तात्रय कवठे, सुरेश पाटील, राहुल पाटील, गजानन जक्कीकोरे आदींसह यासाचे संतोष भोसले, सौरभ मोरे, ज्ञानेश्वर भोसले, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, दत्ता मोरे, दत्ता माने, पिंटू साठे, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, किरण साठे, असद फुलारी, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, संतोष माने, महांतेश स्वामी, राहुल इंडे, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी व सेवेकरी, भक्त उपस्थित होते.

# इंग्रजी संशोधक मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. राहुल पालके यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २० जुलै -**

पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाने श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. राहुल पालके यांना इंग्रजी विषयातील पीएच.डी. संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता प्रदान केली आहे. या मान्यतेमुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकाच वेळी चार विद्यार्थ्यांना पीएच.डी. संशोधनाची संधी उपलब्ध होणार आहे.

इंग्रजी साहित्य, संशोधन आणि अध्यापन क्षेत्रातील सुमारे १४ वर्षांच्या अनुभवासह संशोधनपर लेखन, शैक्षणिक कार्य आणि विद्यार्थीकेंद्रित मार्गदर्शनाची दखल घेत विद्यापीठाने त्यांची निवड केली आहे. डॉ. पालके यांनी आजपर्यंत युजीसी-नेट, सेट व गेट परीक्षा एकूण २१ वेळा उत्तीर्ण होण्याचा विक्रम केला आहे. त्यांनी इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, महिला अभ्यास, भाषाविज्ञान, तुलनात्मक साहित्य तसेच आदिवासी व प्रादेशिक भाषा-साहित्य या आठ विषयांमध्ये नेट पात्रता मिळवली आहे. तसेच इंग्रजी व मराठी या दोन विषयांमध्ये सेट परीक्षा उत्तीर्ण केली असून जीटीई परीक्षाही उत्तीर्ण केली आहे.



राज्यातील विविध महाविद्यालये, विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांनी युजीसी-नेट, सेट आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विषयावर व्याख्याने दिली आहेत. आकाशवाणी सोलापूर आणि आकाशवाणी धाराशिव केंद्रांवरुन 'सेट-नेट परीक्षांचे विश्व' तसेच 'स्पर्धा परीक्षांचे विश्व' या विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रम सादर केले आहेत. ते लेखक आणि कवी म्हणूनही कार्यरत असून त्यांची पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

# चारा, पाणी, वीज व रोजगारासाठी उपाययोजना करा

### अनिल सावंत यांची उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी




**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.२० जुलै -**

मंगळवेढा तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. राज्य सरकारने तालुक्यात चारा, पाणी, वीज व रोजगारासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात असे निवेदन शिवसेना नेते अनिल सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले.

आषाढी वारी सोहळ्यानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पाहणीसाठी आले असता हे निवेदन दिले. तालुक्यात खरीप पेरणी केवळ ११ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिली आहे. सुमारे ३५ हजार हेक्टर क्षेत्रावरील पेरणी धोक्यात आली आहे. दमदार पावसाअभावी शेतकरी चिंताग्रस्त असून शेतीसह पशुधनावरही संकट ओढावले आहे. तालुक्यात सुमारे ९४ हजारांहून अधिक पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. नदीकाठच्या उसाचा चारा म्हणून वापर केला जात असून त्यासाठी सुमारे चार हजार रुपये प्रति टन खर्च करावा लागत आहे. त्यामुळे दूध व्यवसायातून मिळणारे उत्पन्न वैरणीवर खर्च होत आहे. पशुपालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशनची कामे अपूर्ण अथवा निकृष्ट दर्जाची असल्याने नियमित पाणीपुरवठा होत नसही. भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून सर्व गावांना पाणी मिळत नाही. आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होऊनही अनेक गावांना अद्याप पाणी उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे गावनिहाय पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावी. सर्व साठवण तलाव तातडीने भरून शेतीसाठी पाणी द्यावे, मजुरांना तातडीने रोजगार उपलब्ध करून द्यावेत, आदी मागण्या निवेदनात केल्या आहेत. यावेळी मंगळवेढा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष मुजफ्फर काझी, माजी उपनगराध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी, संतोष रंदवे, सिताराम भगरे, संजय लेंडवे, सुनील चेळेकर, दीपक मुसळे उपस्थित होते.

# नवीन शेती पंपाचे वीज कनेक्शन चालू करा; भाजप किसान मोर्चाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २० जुलै-**

सोलापूर जिल्ह्यामध्ये नवीन शेती पंपाचे वीज कनेक्शन चालू करण्यात यावे, अशी मागणी भाजप किसान मोर्चा माढा तालुकाध्यक्ष नंदकुमार मोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, भाजप नेते रणजितसिंह शिंदे, तालुकाध्यक्ष योगेश पाटील, राज्य परिषद सदस्य दत्तात्रय जाधव, राहुल केदार यांच्या पुढाकाराने निवेदन दिले. सोलापूर जिल्ह्यात नेहमी पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. सरकारने मागील ३ वर्षांपासून शेतीपंपाचे नवीन वीज कनेक्शन बंद केले आहेत. पारंपरिक ऊर्जा स्रोताला प्राधान्य देत मागेल त्याला सोलर पंप मिळत आहे. मात्र सोलर पंपांमुळे खोल भूजलपातळी असल्यास पाणी काढण्यासाठी अडचणी येत आहेत. सिंचनासाठी एका पेक्षा जास्त बोअरवेल घ्यावे लागतात. पावसाळ्यात ढगाळ वातावरणामुळे पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे सोलर पंप आहे फक्त त्यांनाच नवीन वीज कनेक्शन चालू करावे. परिणामी अडचणीच्या काळात वीजेचा व सोलरचाही वापर चालू राहील, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, डिगंबर माळी, नंदकुमार मोरे, सचिन कदम, पांडुरंग राऊत, शहाजी भांगे, नवनाथ जाधव आदी उपस्थित होते.

# 'एसआयआर'मध्ये नागरिकांचा सहभाग लोकशाहीसाठी मोलाचा : करुणा शिवशरण

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २० जुलै-**

आपली भारतीय लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार यादीतील नोंद अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे विशेष मतदार नोंदणी (एसआयआर') अभियान अंतर्गत प्रत्येक नागरिकाचा छोटासा सहभाग लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी अतिशय मोलाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्या करुणा शिवशरण यांनी केले आहे.

पलक्ष्मी दहिवडी जिल्हा परिषद गटातील नागरिकांना आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली एसआयआर' अभियान अंतर्गत मार्गदर्शन व संवाद साधताना त्यांनी सांगितले आहे की, या अभियानात सक्रिय सहभाग घ्या,



आवश्यक माहिती इतरांपर्यंत पोहोचवा आणि पात्र लाभार्थ्यांना फॉर्म भरण्यास सहकार्य करा तसेच मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे शिवशरण म्हणाल्या.

यावेळी उपस्थित नागरिकांना त्यांनी एसआयआर अभियानाचे महत्त्व, आवश्यक कागदपत्रे, माहिती भरण्याची प्रक्रिया तसेच बीएलओ व इसीआय नेट ॲपच्या माध्यमातून मतदार यादी अद्ययावत करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# सत्तेच्या शिखरावरही दरवळला ३५ वर्षांच्या मैत्रीचा सुगंध

### गोव्याच्या मंत्र्यांची सांगोला विद्यामंदिरला सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० जुलै -**

राजकारणाच्या धकाधकीत आणि सत्तेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचल्यानंतर माणसांनी आपली नाती कशी जपावीत याचा आदर्श गोव्याचे कॅबिनेट मंत्री रमेश तवडकर यांनी घालून दिला. सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य चारुदत्त जगताप आणि रमेश तवडकर हे वर्गमित्र. त्यांच्या आग्रहामुळे त्यांनी सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजला नुकतीच सदिच्छा भेट दिली.

तब्बल ३५ वर्षांपूर्वी क्रीडा मैदानावर आणि एकाच बाकावर बसून वर्गात फुललेली जीवाभावाची मैत्री आज मंत्रीपदाच्या वलयातही तितकीच घट्ट आणि नितळ आहे. शाळेत त्यांच्या स्वागत प्रसंगी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे हस्ते ना.रमेश तवडकर यांचा सत्कार केला. सत्काराचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी आपला मोठेपणा जपत प्रा.प्रबुद्धचंद्र झपके व आपले मित्र चारुदत्त जगताप यांची प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल सत्कार केला. मनोगतात ना.रमेश तवडकर यांनी आपला २५ वर्षांचा प्रदीर्घ राजकीय प्रवास उलगडला. त्यांनी स्थापन केलेल्या बलराम शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी महाराष्ट्राचे ०माजी क्रीडा संचालक जनक टेकाळे, प्राचार्य अशोक काळे, प्राचार्य संजय हिरेकर, प्राचार्य दीपक अमोणकर, प्राचार्य विजयकुमार बोराडे, संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सदस्य दिगंबर जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण यांनी केले.


# पानगावच्या सरपंचपदी मोरे यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २० जुलै-**

पानगाव ता.बार्शी येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अंकुश मोरे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच निवडीनंतर ग्राम पंचायत परिसरात कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. कार्यकर्त्यांकडून गुलालाची मुक्त उधळण करत फटाक्यांची आतषबाजी केली.

जयसिंगराव देशमुख यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. त्यानुसार सोमवार (दि.२०) रोजी सरपंच निवडीची प्रक्रिया पार पडली. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत मोरे यांचा एकच अर्ज दाखल झाला होता. निवडणुक प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर अध्यासी अधिकारी तथा पानगाव मंडलाधिकारी एस.बी.ढोणे यांनी मोरे यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली. याकामी त्यांना पानगावचे ग्राम महसूल अधिकारी धनंजय जाधव, ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप यांच्यासह कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या या निवडीबद्दल आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.








# संत गोरोबा काकांच्या पालखीचे अकलूजमध्ये स्वागत



## कुंभार समाजातर्फे पालखी रथ व अश्वाचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० जुलै -**

प्रतिनिधी) संत गोरोबा काका पालखी सोहळ्याचे आगमन अकलूजमध्ये झाले. अकलूज कुंभार समाज व सुरेश कुंभार यांनी व परिवाराने पालखीचे भव्य स्वागत केले. यावेळी कुंभार समाजाध्यक्ष अमित कुंभार, संदीप कुंभार, विनायक कुंभार, सुधाकर कुंभार,रोहित कुंभार आदींनी पालखी रथाचे व अश्वाचे पूजन केले. गोरोबाकाकांच्या पादुकांचे पूजन करुन प्रसादाचे वाटप केले.

पालखी सोहळा सोळा वर्षापासून सुरू असून ह.भ.प. सुरेश बांगारे, ह.भ.प. मुरलीधर दळवी, ह.भ.प. ज्ञानोबा रिसवडकर यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आला. भोर, वेल्हे, राजगड, बनेश्वर आदी परिसरातून या पालखी सोहळ्यामध्ये १५० भाविक सहभागी झाले आहे आहेत. बैलगाडी, बैलजोडी व सोहळ्यासोबत अश्व व दोन श्वान चालत आहेत, अशी माहिती गणेश दळवी यांनी दिली. सोहळ्याचे प्रमुख महेश दळवी, ह.भ.प.भाववादाचार्य कैलास महाराज खंडागळे, दत्तात्रय दिघे पाटील, सुनील गावडे, चोपदार राजेंद्र कुंभार, ह.भ.प. सुरेश रसाळ, आदी यामध्ये सहभागी आहेत. अकलूजमध्ये आगमन होताच पावसाने सुरुवात केल्याने थोडीशी तारांबळ उडाली. माळीनगर रस्त्यावरील राम मंदिरात पालखीचा आज मुक्काम आहे. सकाळी ती मार्गस्थ होईल.

# 'यात्रा कालावधीत सर्व खासगी दवाखाने, रुग्णालये सुरू ठेवा'

**पंढरपूर,दि.२० जुलै -**

आषाढी यात्रा कालावधीत सर्व खाजगी दवाखाने रुग्णालय क्लिनिक सुरू ठेवण्याचे आदेश उपविभाग दंडाधिकारी सचिन इथापे यांनी जारी केले आहेत.

पंढरपूर शहर व परिसरातील सर्व खाजगी दवाखाने, रुग्णालये, क्लिनिक व नर्सिंग होम यांनी यात्रा कालावधीत नियमित वेळेत सेवा सुरू ठेवावीत. कोणत्याही कारणास्तव दवाखाना,रुग्णालय बंद ठेवू नयेत. आपत्कालीन रुग्णांना तात्काळ वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावेत. आवश्यकतेनुसार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध ठेवून औषधसाठा व आपत्कालीन सुविधा कार्यरत ठेवाव्यात. यात्रा संपेपर्यंत डॉक्टर, परिचर यांनी पंढरपूर शहर सोडू नये असे निर्देश दिले आहेत. कारवाईचाही इशारा दिला आहे.




# भान हरपून खेळ खेळतो वैष्णवांचा मेळा



**अवघाचि संसार सुखाचा करीन (संसार वियोग) अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ।।** या काव्यरचनेचा प्रत्यय आणून देणाऱ्या सोहळ्यात टाळ मृदंगाचा गजर आणि विठ्ठल नामाचा जयघोष झाला.

## पुरंदावडेत माऊलींच्या पालखी सोहळ्यात उत्साह

## हुतुतू, हमामा खेळांनी वारकऱ्यांमध्ये नवचैतन्य

**तभा वृत्तसेवा**
**माळशिरस, दि. २० जुलै -**

माऊली माऊली आणि हरीनामाच्या गजरात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पहिले रिंगण पुरंदावडे येथे पार पडले संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण याची देही याची डोळा अनुभवताना भाविक व वारकऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

रिंगण सोहळा यावर्षीही वारकऱ्यांसाठी वारीचा आनंद द्विगुणीत करणारा ठरला. नातेपुते येथे पहाटे पालखी सोहळाप्रमुख राजेंद्र ऊमाब यांच्या हस्ते माऊलींची नैमित्तिक पूजा व आरती झाल्यानंतर सकाळी ६.३० वाजता माऊलींसह लाखो वैष्णवांनी नातेपुते नगरीचा निरोप घेतला. नातेपुतेपासून म ाळशिरसपर्यंत सुसज्ज असा चार पदरी पालखी मार्ग झाल्याने वारकऱ्यांची चांगली सोय झाली होती. आल्हाददायक वातावरणांत सुमारे दोन ते अडीच लाखांच्या पायदळासह भागवत धर्माची पताका फडकावित श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळा पहिल्या रिंगण सोहळ्यासाठी पुरंदावडेकडे मार्गस्थ झाला. दुपारचा नैवेद्य व विश्रांतीसाठी हा सोहळा मांडवे ओढा येथे पोहोचला. येथे माऊलींना दुपारचा नैवेद्य दाखवून व वारकऱ्यांनीही प्रसाद घेतला. आज सकाळपासूनच पहिले गोल रिंगण सोहळा पाहण्यासाठी वारकऱ्यांमध्ये चैतन्याचे वातावरण दिसून आले. पुरंदावडेच्या रिंगण सोहळ्याची सर्वांना ओढ लागून राहिली होती. भोजनानंतर सोहळा सदाशिवनगरकडे मार्गस्थ झाला. दुपारी दोन वाजता पुरंदावडे येथील मैदानावर पोहोचला .

**आखीव रेखीव रिंगण**

पुरंदावडे येथील प्रांगणात गोल रिंगणासाठी मैदान तयार केले होते. रिंगणाचे मैदान सुसज्ज केले होते. यावेळी रिंगणाच्या मध्यभागी व गोलाकार नेत्रदिपक रांगोळी काढली होती. अश्वांच्या रिंगणाच्या मार्गावर रांगोळ्याच्या पायघड्या घातल्या होत्या. सुरूवातीला रथापुढील १ ते २७ दिंड्या अश्वासह रिंगणात आल्या. त्यापाठोपाठ माऊलींची पालखी खांद्यावर घेवून रिंगणात आणली. रथापाठीमागील सुमारे २० दिंड्या रिंगणसोहळ्यासाठी आत आणल्या. चोपदारांनी पताकाधारी वारकऱ्यांना रिंगणाच्या म ध्यभागी घेतले. त्यानंतर रिंगणाला एक प्रदक्षिणा पूर्ण करून माऊलींची पालखी रिंगणाच्या मध्यभागी उभारलेल्या शामियानात आणली.

पुरंदावडे येथील हा नेत्रदिपक रिंगण सोहळा आपल्या डोळ्यात साठविण्यासाठी लाखो भाविक उपस्थित झाले होते. अश्वांची पूजा झाल्यानंतर जरीपटक्याच्या भोपळे दिंडीच्या ध्वजाने रिंगणाला प्रदक्षिणा मारली .. त्यानंतर चोपदारांनी अश्वांना रिंगण दाखविले. त्यानंतर स्वाराचा अश्व रिंगणासाठी सोडण्यात आला. त्याच्या पाठोपाठ माऊलींचा अश्व धावला आणि लाखो भाविकांनी माऊलीऽ माऊलीऽऽ नामाचा एकच जयघोष सुरू केला आणि या जयजयकारातच दोन्ही अश्वांनी नेत्रदिपक दौड करीत हा रिंगण सोहळा मोठ्या उत्साही व भक्तीमय वातावरणात पार पडला.दोन्ही अश्वांनी तीन फेऱ्या पूर्ण केल्या . यावेळी अश्वांच्या टापाखालील माती कपाळी लावण्यासाठी भाविकांनी एकच गर्दी केली.

रिंगण व उडीच्या कार्यक्रमानंतर श्री ज्ञानेश्वर म ाऊलींचा पालखी सोहळा येळीव फाटा येथे विश्रांती घेवून माळशिरसकडे मार्गस्थ झाला. सोहळ्यासाठी पंचायत समितीच्या माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते पाटील, योगी निरंजन, चैतन्य कबीर, बाळासाहेब चोपदार, भाजप संघटन महामंत्री शिवप्रसाद, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, सरपंच राणी मोहिते, उपसरपंच देविदास ढोपे उपस्थित होते.

### एकात्म भक्तीभावाचा, शाश्वत सुखाचा सोहळा

रिंगण सोहळ्यानंतर दिंड्या दिंड्यामध्ये विविध खेळ रंगले. हुतुतू, गड्यास गडी, हमामा, सुरपाट, कबड्डी, खो-खो, फुगडी अशा खेळांनी वारकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. चोपदारांच्या निमंत्रणानंतर उडीच्या कार्यक्रमासाठी सर्व दिंड्या पालखीच्या सभोवती गोलाकार बसल्या. टाळ, मृदुंगाच्या साथीने आसमंत व्यापून टाकणारा नादब्रह्म सुरू झाला. सर्व वारकरी श्वास रोखून या नादब्रह्मात तल्लीन होऊन गेले होते. एकात्म भक्तिभावाचा हा शाश्वत सुखाचा सोहळा लाखो भाविकांनी अनुभवला.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी निधी कमी पडणार नाही

## उपमुख्यमंत्री शिंदे; पंढरपुरात वारीच्या व्यवस्थेची केली पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जुलै-**

आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणेने पांडुरंगाचा वारकरी समाधानी होईल अशा पद्धतीच्या सुविधा त्यांना उपलब्ध करून द्याव्यात. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सरकार निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

शासकीय विश्रामगृहा आयोजित आषाढी वारी आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री शिंदे म ार्गदर्शन करत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, आमदार तानाजी सावंत, आम दार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजेंद्र खरे, आमदार उत्तम जानकर, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, नगराध्यक्षा प्रणिता भालके, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आषाढी वारीत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. दर्शन रांग, वाळवंट, भक्ती सागर आणि चंद्रभागा नदीपात्रातील स्वच्छतेची पाहणी केली, त्यावेळी आणखी स्वच्छता नियमितपणे होणे आवश्यक असून, सफाई कर्मचाऱ्यांची संख्या ही वाढवावी.

पालखी मार्ग तसेच पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आरोग्य विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने उपलब्ध केलेल्या विविध सुविधांची माहिती दिली. यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता शाम कुंभार, गट विकास अधिकारी अमोल जाधव आणि मंदिर समितीचे मुख्याधिकारी राजेंद्र शेळके यांनी आषाढी वारीत आपापल्या विभागाने केलेल्या कामाची माहिती सादर केली.

# संत दामाजीपंतांच्या पालखीचे उद्या प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २० जुलै-**

श्री संत दामाजीपंतांच्या पालखीचे बुधवार दि.२२ जुलै रोजी पंढरपुरकडे प्रस्थान होणार आहे. पालखी सोहळाप्रमुख ह.भ.प.बजरंग सिध्देश्वर माळी व ह.भ.प.शंभू सिद्धेश्वर माळी यांनी ही माहिती दिली.

सोमवारी दि. २० जुलै रोजी ते पत्रकारांशी बोलत होते. सायंकाळी ४.०० वा. श्री संत दामाजीपंत मंदिर येथून चोखामेळा चौक, मुरलीधर चौक, शनिवार पेठेतील श्री विठ्ठल रूक्मिणी हनुमान मंदिर मेटकरी गल्ली येथे पहिला मुक्काम होणार आहे. बुधवार दि.२२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता मेटकरी गल्ली येथील श्री विठ्ठल रूक्मिणी हनुमान मंदिर येथून श्रीकृष्ण तलाव, शनिवार




पेठ येथून मुरलीधर चौक मार्गे, चोखामेळा चौक, शिवप्रेमी चौक, जावळे-मुंढे गल्ली मार्गे डॉ.कुंभारे हॉस्पिटल समोरून दामाजी चौक येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. टाळ, मृदुंग, विणा, ध्वज व ३२५ भाविकांच्या उपस्थितीत हरिनामाचा जयघोषात करीत मार्गस्थ होणार आहे.

मुक्काम एकलासपूर येथे होणार आहे. गुरूवार दि.२३ रोजी कासेगाव, सिकंदर टाकळी, विसावामार्गे वाखरी येथे दिंडी पोहोचणार आहे. शुक्रवार दि.२४ जुलै दशमी दिवशी दुपारी एक वाजता वाखरी येथून पंढरपूरकडे दिंडी मार्गस्थ होणार आहे. दरम्यान श्री संत दामाजीपंत यांच्या दिंडीत जेष्ठ महिला, पुरूष, बाल वारकरी यांचा मोठा सहभाग होणार आहे. वाखरी येथून श्री संत दामाजी पंत मठ येथे दिंडी विसावणार आहे.

शनिवार दि.२५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे पहाटे ५.०० वा.नगरप्रदक्षणा होणार आहे.

### संत गजानन महाराज दिंडीच्या स्वागताची तयारी

दरम्यान, बुधवार दि.२२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता बोराळे नाका येथे श्री संत गजानन महाराज दिंडीचे आगमन होणार आहे. कर्नाटकातून मंगळवेढयात येणाऱ्या भाविकांना श्री संत दामाजीपंत मंदिरामध्ये दोन वेळच्या महाप्रसादाची सोय केली आहे. यासाठी संस्थेचे अध्यक्ष विष्णूपंत आवताडे, चिटणीस सतिश पाटील, अन्नछत्र विभाग प्रमुख धनाजी देवकर, पट्टणशेट्टी, बिरूदेव हजारे, शिरीष भेंकी आदी परिश्रम घेत आहेत.

# ४१ खिसेकापूंना पोलिसांचा दणका

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २० जुलै -**



श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील नातेपुते ते शिंगणापूर पाटी दरम्यान २० पुरुष व २१ महिला खिसे कापू व मोबाईल चोरांना ताब्यात घेतल्याची माहिती सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

माळशिरसमध्ये पत्रकारांशी कुलकर्णी बोलत होते. यावेळी एलसीबीचे पोलीस निरीक्षक जी बी जगताप, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे उपस्थित होते. या वर्षी प्रथमच ५ जी मोबाईलचा वापर केला आहे. या मुळे अनेक अधिकारी ग्रुपला जोडले असल्याने सर्व माहिती तत्काळ मिळणे सुलभ झाले आहे. तसेच रिंगण ठिकाणी व मुक्काम ठिकाणी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस मदत केंद्र व वॉच टॉवर उभा केले आहेत.

यावर्षी वारीमध्ये वाहनांची संख्या जास्त असून अनेक वाहने रस्त्यावर उभा केल्याने वाहतुकीस अडथला होत आहे.वाहतुकीचा अडथला होऊ नये यासाठी वाहनाचा मार्ग बदलण्यात आला आहे.नागरिकांनी चोरापासून सावध राहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

# १८० आपदा मित्र,१७ बोटी तैनात

## पहिल्यांदाच महिलांचे बचाव पथक; जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण दक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जुलै -**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदी व पालखी मार्गावर भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने व्यापक आपत्कालीन यंत्रणा सज्ज केली आहे. यंदा पहिल्यांदाच सोलापूर जिल्ह्याचे स्वतःचे महिलांचे बचाव पथक वारीत सहभागी होणार आहे. १८० आपदा मित्र, १७ बोटी तैनात आहेत.

आपत्कालीन व्यवस्थेकरिता सहा अग्निशमन वाहने आणि एक रेस्क्यू व्हॅन तैनात केली आहे. रेस्क्यू व्हॅनचे इनचार्ज पंढरपूर नगरपालिकेचे अग्निशमन अधिकारी संभाजी कारले आहेत. प्रवासी वाहतूक करणाऱ्या होड्यांसाठी एक हजार पंचेचाळीस लाईफ जॅकेट उपलब्ध केले आहेत. यासाठी जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता जेडे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अकरा, पुणे जिल्ह्यातील दोन आणि एनडीआरएफच्या चार अशा एकूण सतरा रेस्क्यू बोटी तैनात आहेत. संपूर्ण यंत्रणेचे इनचार्ज जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले आहेत.

चंद्रभागा नदीत गस्त व बचाव कामासाठी एकूण एकशे ऐंशी आपदा मित्रांचे नियोजन आहे. यामध्ये एनडीआरएफचे तीस जवान, सारथी फाउंडेशन सोलापूरचे दहा, चंद्रभागा रेस्क्यू फाउंडेशन कान्हापुरी जि. सोलापूरचे दहा, पंढरपूर शहरातील आदिवासी रेस्क्यू कोळी समाज होडीवाल्यांचे तीस, रेड फेरी ग्रुप सोलापूर या महिला रेस्क्यू पथकातील पंधरा, महाराष्ट्र रेस्क्यू फाउंडेशन पंढरपूरचे पाच आणि सोलापूर जिल्ह्यातील वीस पोलिस पाटील, ठाणे आपदा मित्रचे दोन, वाशीम जिल्हा आपदा मित्रचे दहा, आपत्ती संघ पिंपरी-चिंचवडचे दहा, वन्यजीव रेस्क्यू पुणेचे दहा, मुळशी आपत्ती समिती पुणेचे दहा, हेल्पिंग हँड शिरोळ कोल्हापूरचे वीस, यांचा समावेश आहे. यासोबतच वारी कालावधीसाठी दोन मेकॅनिक पंढरपूरमध्ये तैनात आहेत.




आषाढी वारीत पहिल्यांदाच महिलांचे बचाव पथक सोलापूर जिल्ह्याचे स्वतः चे असणार आहे. या पूर्वी या पथकाने २०२५ मधील सीना नदीच्या पुरात दक्षिण सोलापूर तालुक्यातील ३०० नागरिकांच्या बचाव कार्यात सिंहाचा वाटा उचलला होता. तसेच कार्तिक वारी, २०२५ मधील चैत्र व माघ वारीतही या पथकाने बचाव कार्य केले आहे.

### १०० लाईफ जॅकेट, ३० लाईफ रिंग

रेस्क्यू बोटीसाठी शंभर लाईफ जॅकेट, तीस लाईफ रिंग, नऊ वॉकी-टॉकी, पाच मेगाफोन, चार इन्फ्लेटेबल टेंट, सहा मिमी स्टॅटिक रेस्क्यू रोप, पाच टॉर्च, दोन लेजर पॉइंटर व दोन लाईट बॅटन अशी सामग्री सज्ज ठेवण्यात आली आहे.

### बोट ॲम्ब्युलन्सचेही नियोजन

रेडक्रॉसच्या माध्यमातून वैद्यकीय पथक उपलब्ध झाल्यास बोट ॲम्ब्युलन्स तयार असेल. चंद्रभागा नदीपात्र व घाट परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी यंत्रणा २४ तास दक्ष राहणार आहे.

**- शक्तीसागर ढोले,**
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी.